
शब्द

# रुची

जुलै २०१४
मूल्य १० रुपये

४०

## माणसं घडवणारी माणसं



राम पटवर्धन



गोपीनाथ मुंडे




# जगद्व्यापी जालकाच्या जाळ्यात

॥ग्रंथाली॥✲॥ द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali01@gmail.com

ग्रंथाली

## ग्रामीण बोलीचा शब्दकोश डॉ. द.ता. भोसले



मराठीच्या सर्व बोली समृद्ध आहेत. त्यांचा वापर व्हावा, त्यातून मराठी समृद्ध व्हावी, नव्या पिढीला ज्ञात व्हावी या भावनेने साकारलेला ग्रामीण बोलीचा हा शब्दकोश...

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## माझ्या काळजाची गोष्ट सुनीता संगवई




ही कहाणी आहे आधुनिक काळातील, 'ऱ्हुमॅटिक हार्ट डिसिज' या एखाद्याला होणाऱ्या दुर्धर रोगावर चालू असलेले ॲलोपॅथी उपचार सोडून, फक्त निसर्गोपचार करून जीवदान मिळवणाऱ्या एका वीस वर्षांच्या मुलीची!

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

ग्रंथाली


## मंदिर-शिल्पे डॉ. माया पाटील



मराठवाड्यातील उस्मानाबाद, लातूर या भागांत मंदिर-शिल्पांचे प्राचीन वैभव आहे. त्याची चित्रांसह सर्वंकष माहिती देणारा हा ग्रंथ.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## लेणी महाराष्ट्राची डॉ. दाऊद दळवी




महाराष्ट्रातील लेणीवैभव मोठे आहे. या लेण्यांचा माहिती-चित्रे व नकाशे मांडणारा हा संग्राह्य दस्तावेज आहे.

**मूल्य १२०० रु. सवलतीत ७५० रु.**

## *डॉ. नरेंद्र जाधव अनुवादित आणि संपादित पुस्तके*

ग्रंथाली




**बोल महामानवाचे** (एक ते तीन खंड)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे**

१. आत्मनिवेदन आणि मार्गदर्शन; २. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कायदा-संविधान; ३. राजकीय


**जनाआवृत्ती संच मूल्य १२०० रु. सवलतीत ८०० रु.**



**प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर**

समग्र वैचारिक चरित्र

**मूल्य ७५० रु. सवलतीत ६०० रु.**



**प्रज्ञा महामानवाची** (भाग १ ते ४)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखनकार्य**

१. राजकीय, २. अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय लेखन, ३. मानववंशशास्त्रीय लेखन, ४. बुद्ध आणि त्याचा धम्म

**जनाआवृत्ती संच मूल्य ८५० रु. सवलतीत ५०० रु.**

**टपाल खर्च प्रत्येकी ५० रु.**

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**जुलै २०१४, वर्ष दुसरे**
**अंक तिसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ व आतील मांडणी : **सतीश खानविलकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

## संपादकीय...

गेल्या महिन्याभरात दोन दिग्गजांचे निधन झाले. एकाचे चटका लावणारे होते आणि दुसऱ्याचे धक्कादायक आणि सुन्न करणारे.

ज्यांच्या संपादनाची किमया अनेक लेखकांनी अनुभवली ते राम पटवर्धन गेले आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींनी वृत्तपत्रांचे रकाने भरले. वाचत राहा, लिहीत राहा असा आश्वासक हात त्यांनी अनेकांना दिला. त्या त्या लेखकाला, त्याच्या पोताला जाणून उत्तम ते प्रसवण्यासाठी प्रोत्साहन देताना त्या त्या विषयावर अभ्यासोनि प्रकटत राहिले. व्यक्ती आणि संपादक म्हणून त्यांच्यातील गुणविशेष सांगणारे लेख यशवंत पाठक आणि ज्योत्स्ना कदम यांनी लिहिले आहेत.


गोपीनाथ मुंडे यांच्या अपघाती निधनाने महाराष्ट्रातील भाजपाची स्थिती निर्नायकी झाली हे खरेच, पण महाराष्ट्राने सर्वसमावेशक दृष्टी असलेला लढाऊ नेता गमावला आहे. संघर्षमय जीवनातून पुढे येत वंचितांसाठी संघर्षयात्रेचा नेता हा त्यांचा प्रवास एक झंझावात होता. उपमुख्यमंत्री म्हणून असेल वा विरोधी पक्षनेता म्हणून असेल गोपीनाथ मुंडे यांनी पोटतिडकीने काम केले, हे त्या त्या वेळच्या घटना आठवल्यावर लक्षात येते. लोकांमध्ये राहणारा, त्यांना त्यांच्यातला वाटणारा, त्यांच्यासाठी झटणारा हा लढवय्या हजरजबाबी, नर्मविनोदी व माणूसपण जपणारा कसा होता हे प्रवीण बर्दापूरकर आणि सुभाषचंद्र मयेकर यांच्या लेखांतून प्रकट होते.

सोशल मीडिया किती प्रभावी आहे हे 'अब की बार' समजले. त्याच्या पगड्याने, तंत्र-विज्ञानाने जग व्यापले आहे. त्यातून 'अच्छे दिन' आले असा भास किती आणि भविष्यातील त्रास किती हे विविध 'ॲप'बद्दल सुधीर थत्ते सांगत आहेत.

**– अरुण जोशी**

# व्रतस्थ संपादक

**यशवंत पाठक**




राम पटवर्धनांचे जाणे संवेदनेला हलवणारे आहे. यात वयाचा संबंध नाही. पटवर्धन आणि ‘सत्यकथा’-‘मौज’ यांचे अढळ नाते होते. या साऱ्यात राहूनही त्यांनी आपला ‘पटवर्धनी बाणा’ स्वतंत्र राखला. कोणताही लेखक त्यांच्या संपर्कात आला की, ते त्याला नीट वाचत. नाना प्रश्न करत. कधी कधी तो सांगायला लागला की, आज्ञाधारक मनाने त्याचे सारे ऐकत. एखाद्या जागी बारीक किलकिल्या डोळ्यांनी ‘हुं’ची दाद देत. त्यांच्या दाद देण्यातही वेगळी मौज असे. त्याने लेखक बिचके. त्याला पुढे सांगावे, की न सांगावे असे वाटे. तो थोडा गप्प होई. त्याला पटवर्धन बोलते करत. सांगता सांगता तो थांबे. मग पटवर्धन त्याला हळुहळू आपल्या प्रश्नांमधून पुन्हा बोलते करत. त्याच्या अनुभवाच्या कक्षा विस्तारत. त्यातल्या काही जागा वेगळ्या कशा ठरतात यावर बोलत. बोलता बोलता त्याला त्याचा अनुभव नव्याने उलगडे.

पटवर्धनांच्या या कौशल्याला तोड नव्हती. ते त्यांनाच जमू जाणे. अनुभवाचे पदर कसे उकलावेत ते त्याला पटवर्धनांच्या बोलण्यातून समजे. त्या संदर्भात पटवर्धन लेखकाला काही संदर्भ देत. लेखकाने काय वाचावे याची यादी देत. अनुभवातली सहजता पटवर्धन मोलाची मानत. अनुभव बोलला पाहिजे. त्यातही लेखकाने लुडबूड करायची नाही. उगाचच आपण तयार केलेली आवडती वाक्ये पेरायची नाहीत. उपदेशाचा आव आणायचा नाही. जे काही सांगायचे ते त्या पात्राच्या तोंडी सहज यावे. थोडा धीर धरला तर तसे येते. त्यासाठी सोशिकता हवी. तसे ते सोपे नाही. वेळखाऊ प्रकरण आहे. सुचते म्हणून खरडायचे हे पटवर्धनांना मान्यच नव्हते. मिळून सारा अनुभव जेव्हा प्रतिभेच्या मुशीतून सहज येतो, ते लेखन असते. हे पटवर्धन न थकता सांगत. बोलत. पत्रातून लिहीत.

पटवर्धनांपाशी जुना लेखक-नवा लेखक असा भेद नसे. तो कुणीही असो, कोणत्याही प्रांतातला असो. त्याच्यातला अस्सल साहित्यानुभव काढून त्यावर बोलण्यात पटवर्धनांचा हातखंडा असे. या साऱ्यात त्यांचा संपादनाचा डोळा नेहमी तयार असे. ते लेखकाला जे काय वाटते, ते सारे लिहायला लावत. मग कात्री-डिंक आणि तांबडी पेन्सिल घेऊन बसत. अनावश्यक सारे काढत. याने लेखनात सुसूत्रता येई. अनुभव मांडण्यात नेमकेपणा दिसे. एखादी जागा कलात्म अंगाने कशी मांडता येईल हे ते सांगत. अतिव्याप्त वर्णने कितीही प्रभावी वाटली; तरी ते त्यावर काट मारत. नेमके सांगावे. नेमके बोलावे. हा पटवर्धनी बाणा असे. याचा प्रत्यय अनेक लेखकांना आपापल्या परीने आलेला आहे. नेमकेपणासाठी मोजके कसे लिहावे याचा ते आराखडा देत. विचार करायला भाग पाडत. लिहिता लिहिता त्यातून लेखकाला वेगळे नवीन सुचे. त्याला लिहायला हुरूप येई.

पटवर्धनांना विविध विषयांत रस होता. त्यामुळे ते एकाक्ष नव्हते. त्यांची जिज्ञासा हीच त्यांच्या अभ्यासाचे द्वार होती. याची काही उदाहरणे सांगायची झाली तर फार छान आहेत. त्यांनी ‘मौज’ दिवाळी अंकांची केलेली संपादने याची साक्ष आहेत. ‘भारताचे एकराष्ट्रीयत्व’ या वसंत पळशीकरांनी लिहिलेल्या मौज दिवाळी ८४ च्या लेखाबद्दल ज्या काही चर्चा झाल्यात, त्या आठवतात किंवा मौज दिवाळी ८४ च्या अंकात विश्वनाथ खैरे यांचा ‘भारतीय संस्कृतिकथा : एक मागोवा’ या लेखाविषयी असेच आहे. मौज ८३ च्या दिवाळी अंकातील ‘मार्क्सची क्रांतिकल्पना आणि उद्याचा भारत’ हा वसंत पळशीकरांनी लिहिलेला लेख चर्चेतून आला. ‘वारकरी संप्रदायाचे दोन अर्वाचीन संजीवक’ हा माझा लेख ८३ च्या ‘मौज’ दिवाळीत आला. त्यासाठी पटवर्धनांनी खूप मेहनत घेतली. विष्णुबुवा जोगमहाराजांचे प्राचार्य सोनोपंत


मौज प्रकाशन गृह
'सत्यकथा', 'मौज वार्षिक' व ग्रंथप्रकाशन
५/१/१९८०
फोन ३५४९३० ३८६९७७ खटाववाडी, मुंबई ४००००४

प्रा० डॉ० यशवंत पाठक
यांस स०न०
'लयीचं घर'चा पहिला वाचक मला भेटला, तो माझा मुलगा अनिरुद्ध. त्याला लेख फार आवडला. पुनर्रचना पुनर्लेखन करण्यात तुम्ही जी निरलस तत्परता दाखवली, तिच्याबद्दल अभिनंदन. अंतरंगाच्या मसुद्यातही अधिक चित्रमयता, रेखीवपणा व ओघ आणण्यासाठी काय संस्कार करावे लागतील, त्याची कल्पना यावी, म्हणून दोन्ही हस्त-

लिखिते कोणाच्या हस्ताने तुमच्याकडे पाठवीत आहे. पाहून निकालात काढावी आणि दफ्तरदाखल करावी. नवीन लेखन? नव्या वर्षाच्या तुम्हा सर्वांना शुभेच्छा. — राम पटवर्धन

प्रा. डॉ. यशवंत पाठक
[illegible] कॉलनी
भगतसिंग मैदान
मनमाड
(जि. नाशिक)
पिन. ४२३१०४

दांडेकरांनी लिहिलेले चरित्र वाचले. वारकरी संप्रदायावरील पुस्तके वाचली. सारी दिलेली प्रमाणे तपासली. परंपरांचा अभ्यास केला. एका लेखासाठी एवढे सारे स्वत:हून करणे ही मन:पूत जिज्ञासा पटवर्धनांपाशी होती. ते संस्कृती आणि परंपरा यांचा पूल कसा जपावा या धडपडीत होते. परिवर्तनाच्या प्रवालाही त्यांची दाद होती. या साऱ्या जगण्याच्या वाटा त्यांनी वारकरी होऊन धुंडाळल्या. जे विश्व मराठी साहित्यात कधीही आले नाही, ते पटवर्धनांनी साहित्यात आणले. डॉ. स.ह. देशपांडे यांचा 'युवकाची समाजसेवा' हा अप्रतिम लेख पटवर्धनांमुळे झाला. आजही या लेखांचे संदर्भ अभ्यासक देतात. स.ह. देशपांडे यांचा मौज दिवाळी ८१ तील 'युवकांचे ग्रामीण कार्य : काही अनुभव, काही विचार' हा लेखही मननीय आहे. गिरीश प्रभुणे यांचे लेखनही स्मरते. मौज दिवाळी १९७९ मधील गंगाधर पाटील यांचा 'क्राइम पॅशन' व य.दि. फडके यांचा 'दुसरे पर्व' हे लेख महत्त्वपूर्ण ठरले.

ज्ञानेश्वरीच्या सप्तजन्मशताब्दीनिमित्ताने मुंबई विद्यापीठाने डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या संपादकत्वाखाली ज्ञानदेवीचे तीन खंड प्रसिद्ध केले. या संपादक मंडळात राम पटवर्धन होते. केळकर-मंगरूळकरांनी लावलेल्या ज्ञानेश्वरीच्या सार्थ ओव्यांची चिकित्सा यात केली असून राजवाडे प्रत प्रमाण मानली आहे. या निमित्ताने पटवर्धनांशी ज्ञानेश्वरीबाबतीत झालेल्या चर्चा आठवतात. मौजेच्या कार्यालयातल्या त्यांच्या खोलीत या चर्चा चालत. पटवर्धनांना अध्यात्माविषयी कुतूहल होते. तसे ते बोलून दाखवत. तितक्याच आपुलकीने ते डॉ. जयंत नारळीकरांच्या 'यक्षाची देणगी' या विज्ञानकथांवर बोलत. 'वामन परत न आला' या डॉ. नारळीकरांच्या कादंबरीविषयी सांगत. मारुती चितमपल्लींच्या निसर्ग लेखनाविषयी त्यांनी निर्माण केलेले प्रश्न ते समासात नोंदवत. सखा कलालांच्या 'ढग'वर ते बोलत. सुरेश मथुरे यांच्या 'चंद्रकांत राजाची कन्या'मधील लेखनाचे मर्म सांगत. विंदा करंदीकरांच्या 'अमृतानुभव: अर्वाचीनीकरण' या पुस्तकाची प्रस्तावना त्यांना आवडली. ती त्यांनी सत्यकथेत आवर्जून छापली. याबद्दल त्यांना अनेक अभ्यासकांची पत्रे आली.

परंपरेतले चांगले आणि नवतेतले मननशील असे दोन्हीही पटवर्धनांना आवडे. त्यांनी केलेली पुस्तकांची संपादने याची साक्ष आहेत. पुस्तक कसे असावे याबद्दल पटवर्धनांनी वेगळे पुस्तक लिहायला हवे होते. पुस्तकातले बारकावे ते सूक्ष्मपणे टिपत. वाक्यरचना नीटस असलीच पाहिजे हा त्यांचा ध्यास होता. मुखपृष्ठ कसे असावे याबद्दल त्यांच्या काही कल्पना होत्या. पुस्तकातून लेखकमनाचा अवकाश स्वच्छ दिसायला हवा. हे ते प्रत्येक लेखकास बजावत. त्यांच्याकडे बऱ्याच लेखकांचे लेखन पडून असे. ते त्यांच्या सवडीतून वाचत. त्यांच्या शंका स्वतंत्र कागदावर उतरवत.

प्रकरणांची मांडणी कशी हवी तेही सुचवत. ‘गारंबीची राधा’ ही श्री.ना. पेंडसे यांची कादंबरी प्रसिद्ध झाली. एका भेटीत पटवर्धनांना विचारले, ‘‘कशी वाटली कादंबरी?’’ पटवर्धन शांतपणे म्हणाले, ‘‘ठीकंय. बापू छान झालाय.’’

आपल्याला सारेच काही कळते असा पटवर्धनांचा आग्रह नसे. परंतु कोणतीही गोष्ट जाणून घेतानाचे त्यांचे प्रश्नोपनिषद विलक्षण असे. अनेक नामवंतांना त्यांच्या प्रश्नांनी ते अवाक् करत नि आपले लेखन सत्यकथेत का छापले नाही याची ते सुस्पष्ट छाननी करत. त्यांना सर्वात शेवटी लिहीत, ‘नवीन लेखन जरूर पाठवावे.’ पटवर्धनांनी लेखननिष्ठा हीच पूजा मानली. त्यांनी सुरू केलेल्या ‘परिक्रमे’तून भारतीय साहित्य आणि ललित कलांचा रमणीय अवकाश दिसला. त्यांनी अनुवादित केलेली ‘पाडस’ कादंबरी आजही वाचनीय आहे. ‘त्यांच्या दृष्टीतून गेलेले पुस्तक देखणे असते,’ असे श्री. पु. भागवत नेहमी म्हणत. त्यांच्या चिंतनाला कशाचाही अडसर नव्हता. त्यांचा साधेपणा विराट होता. त्यांच्या कापडी पिशवीत सारा वाङ्मयखजिना असे. इंग्रजी कात्रणे असत. जगात काय चाललंय, यातही त्यांना रस होता. आपण लेखकाला वाढवतोय, असा अहं नव्हता. तरीही सुंदर वेचण्याचा त्यांचा वसा अखेरपर्यंत होता. सर्व अंगांनी लेखक समृद्ध झाला पाहिजे असे त्यांना मनापासून वाटे. तसा लेखक होण्यात त्यांना आनंद होई. त्यांनी कशाचेही श्रेय आपल्याकडे कधीही ओढले नाही नि श्रेयनामावलीत माझे नाव छापा असे सांगितले नाही. ‘मी जे केले ते स्वान्त:सुखाय नि स्वच्छ केले’ असे ते म्हणत.

राम पटवर्धन तसे पटकन कळणारे नाहीत. त्यांच्या संपादनातल्या तऱ्हा विचक्षण आणि विलक्षण होत्या. पटवर्धन किती जणांना कितपत कळले हे गूढ आहे. दोन वाक्ये बोलून झाल्यानंतरच्या, त्यांच्यामधल्या शांततेला बराच सूच्यार्थ असे. ते धाडकन कधीही बोलत नसत. त्यांच्या नकारात गोड निरागस हसू असे. त्यांचा मार्ग त्यांचाच होता. ते कुणाच्याही प्रभावात अडकले नाहीत. कसल्याही कोंडाळ्यात रमले नाहीत. पण जे लक्षणीय आहे, ते त्यांनी जपले. जो आपला संपादनाचा श्वास आहे, तोही ‘इदं न मम’ म्हणून सहज सोडणे सोपे नाही. ही आध्यात्मिक ताकद त्यांच्यात होती. इतके सांगूनही पटवर्धन खूप बाकी राहतात. ओंजळ भरून घेऊन फुलांना म्हणावे, ‘‘हा नमस्कार पटवर्धनांना द्या.’’ असा देवदुर्लभ ‘राम’ आम्ही अनुभवला हे भाग्य असे म्हणायचे नि पटवर्धनांचे शब्द आठवायचे, ‘‘नवीन लिहा. नवीन वाचा. नवे राहा.’’

**– प्रा. डॉ. यशवंत पाठक**

राम-जानकी संकुल,

ए-२०१, चैतन्यनगर, गंगापूर रोड,

निर्मला स्कूलसमोर, नाशिक-१३


भ्रमणध्वनी : ९४०४४१५२८२

**वैश्विक उपचार**

**चाकोरीबाहेरी विचार**

**विपिन मेहता**

अनुवाद : **विजया बापट, संपादन : अपर्णा वेलणकर**





‘मनोरचना बदला, जग बदला’ असे सांगणारे विपिन मेहता त्यांच्या ‘वैश्विक उपचार’ (ग्लोबल हिलिंग) या ग्रंथत्रयीपैकी या पहिल्या ग्रंथात, नकारात्मक संकोचित मनोरचनेचे सकारात्मक विधायक मानसिक रचनेत ‘परिवर्तन’ घडवण्यासाठी अध्यात्मशास्त्र कसे लागू करता येईल हे आपल्याला दाखवून, ते आपला प्रवास सुरू करून देतात आणि आपल्या पसंतीचे वास्तव निर्माण करण्यासाठी, त्याची बांधणी करण्यासाठी व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आध्यात्मिक साधने आपल्या हाती देतात आणि ते करताना आपले बाह्य जड जग अंतिमत: आपल्या आंतरिक जगाचे प्रतिबिंब कसे आहे ते दाखवतात.

**मूल्य १८० रुपये ● सवलतीत ११० रुपये**

ग्रं था ली

# आनंदयात्री

## ज्योत्स्ना कदम



**नेहरू सेंटरच्या प्रदर्शनावेळी ज्योत्स्ना कदम आणि राम पटवर्धन**

राम पटवर्धन गेले. ही बातमी ऐकल्यावर एकदम निराश व्हायला झालं. एक आधारच निघून गेल्यासारखा वाटला. खरं तर अलीकडे ते आजारीच असायचे. त्यांचं वाचन, बोलणं, गप्पा करणं सगळंच थांबलं होतं. पण पटवर्धन आहेत ही जाणीव सुद्धा खूप आधार देणारी होती. आता यापुढे आपल्याला त्यांना काही सांगता येणार नाही, त्यांच्याशी वेगवेगळ्या विषयांवर बोलता येणार नाही, त्यांचं ते दिलखुलास 'वहाव्वाऽ' ऐकता येणार नाही याचं फार वाईट वाटतं.

अलीकडे वेळ मिळेल तेव्हा मी त्यांना भेटायला जात असे. गेल्या महिन्यातच त्यांना भेटायला गेले होते तेव्हा पसाभरून सोनचाफ्याची ताजी फुले नेली होती. त्यांच्या हातात फुलं दिली तेव्हा ते प्रसन्न हसले. फुलांचा सुगंध आत भरून घेताना सुखावून गेले. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद विलसत होता.

१९७८ साल असावं. मी त्यावेळी जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकत होते. लेखनाचा काहीही अनुभव नसताना 'चित्रांसाठी शिरगाव मोपाडा' हा लेख पटवर्धनांनी माझ्याकडून खूप मेहनतीनं लिहून घेतला. मला लेखनाचं अंग आहे, याची त्यांना कुठेतरी खात्री वाटत होती. हा लेख मी त्यावेळी दहा वेळा तरी परत परत लिहिला असेन.

त्या वर्षीच्या 'सत्यकथे'च्या दिवाळी अंकात तो छापून आला. या एका लेखातूनही मी पटवर्धनांकडून खूप महत्त्वाच्या गोष्टी शिकले. ज्या आजही मला लेखन करताना उपकारक ठरतात. लेखनाची गोडी मला तेव्हापासून लागली. पटवर्धन म्हणायचे की आपण स्वत:ला इतकं तयार करायचं की लोकांना आपली गरज वाटायला हवी. त्यांची ही शिकवण माझ्या कायम लक्षात असते. त्यांचं हे ऋण फेडण्यासाठी मी दर गुरुपौर्णिमेला फुलं आणि काहीतरी गोड पदार्थ घेऊन त्यांच्या भेटीला जात असे. त्यांना त्यांचं मोठं अप्रूप वाटायचं. चहा पिऊन, मनसोक्त गप्पा करून मी घरी जायला निघाले की पटवर्धन त्यांच्या खास स्टाइलमध्ये 'वहाव्वाऽ' असं म्हणायचे. त्यांच्या चेहऱ्यावर एक निर्मळ आनंद पसरलेला असायचा. आपली आठवण ठेवून आपल्याकडे आवर्जून येणाऱ्या माणसांबद्दल त्यांना खूप आत्मीयता वाटायची. अलीकडे अंबरीश मिश्रसुद्धा दर गुरुपौर्णिमेला पटवर्धनांना भेटायला येत असत.

१९७७ साली मौजेच्या ऑफिसमध्ये स्केचेस दाखवण्याच्या निमित्तानं पटवर्धनांशी माझी ओळख झाली आणि मग कदमांमुळे ती अधिकच वाढत गेली. पुढे त्यांचं सगळं कुटुंबच आमच्या घरोब्याचं झालं. कदम चेंबूरला राहत असताना पटवर्धन चुनाभट्टीला राहत होते. जवळ असल्यामुळे त्यांचं नेहमी जाणं-येणं व्हायचं. नंतर कदम ठाण्याला आले आणि काही वर्षांनी पटवर्धनही ठाण्याला आपल्या मुलाकडे- अनिरुद्धकडे - राहायला आले. त्यामुळे आमचं जाणं-येणं होतच राहिलं. संपादक म्हणून दुरून पाहिलेले राम पटवर्धन मला जवळून बघायला मिळाले. संपादक म्हणून ते जेवढे असाधारण होते, तेवढेच व्यक्ती म्हणून. माणूस म्हणूनही असाधारण होते. तसं पाहिलं तर आपणा सर्वांनाच काहीना काही मिळवायचं असतं. कुणाला नाव, कुणाला मानसन्मान, कुणाला पैसा यासारखं बरंच काही. त्यासाठी प्रत्येकाची काहीना काही धडपड, खटपट, धावपळ सुरू असते. पण पटवर्धन मला कधीही या अशा लोकांपैकी वाटले नाहीत. त्यांना हे असं काहीच मिळवायचं नव्हतं. ते कधी नावाच्या, प्रसिद्धीच्या, पैशांच्या मागे लागले नाहीत. पण हो! एका गोष्टीच्या मागे मात्र ते सतत असायचे. ते म्हणजे कर्तव्य. हाती घेतलेलं काम मनापासून आणि चोख पार पाडण्यासाठी ते सतत तत्पर असायचे. सात बहिणींची

लग्नं मोठ्या भावाच्या नात्यानं त्यांनी कुरकुर न करता पार पाडली. बेताच्या मिळकतीत संसार केला. मुलांना यथाशक्ती शिकवलं. ते स्वत: साहित्यिक झाले नाहीत, पण साहित्याचा संसार निस्पृह गृहिणीसारखा सांभाळला, जोपासाला आणि समृद्ध केला. अनेक लेखक घडवले. ते घडवताना स्वत:कडे कधीही मोठेपणा घेतला नाही.

संपादनाचं काम करणाऱ्या पटवर्धनांनी निष्णात सुईणीचं काम केलं, असं म्हटलं तर ते चुकीचं ठरणार नाही. निर्मितीचे हुंकार अडकून पडल्यावर त्यांची सुटका सहजपणे कशी करायची, हे फक्त पटवर्धनच करू शकायचे. अनेक प्रकारे पर्याय सुचवून, स्फूर्ती देऊन, प्रसंगी डिवचून ते लेखकांकडून दर्जेदार लेखन करवून घ्यायचे. कुणामध्ये काय सुप्त आहे. कुणाची काय कुवत आहे हे त्यांना चांगलं कळायचं. साहित्यनिर्मिती दर्जेदार व्हावी एवढी एकच तळमळ त्यांना असायची. साहित्यकृतींची अशी कितीतरी सुंदर बाळं त्यांनी जोपासली. आत्मिक आनंदापोटीच ते हे काम करायचे. मौजेचं संपादन हा त्यातलाच एक भाग होता. या आनंदापुढे आर्थिक फायद्या-तोट्याचा त्यांनी कधी विचार केला नाही. आत्मानंदाच्या कामातून जे काही मिळेल त्यात समाधान मानलं. फार कशाची अपेक्षा ठेवली नाही. पटवर्धनांची वृत्ती व्यवहारी नव्हती. निष्काम कर्मयोगाची होती.

१९८२ साली कदमांचं आणि माझं लग्न झालं. आमच्या हितचिंतकांमध्ये पटवर्धन व ललितावहिनी हे दोघंही होते. सुरुवातीला पटवर्धनांना माझ्याबद्दल थोडी शंका वाटायची की ही तरुण मुलगी. कदमांबरोबर कशी आणि किती काळ राहील पण हळुहळू त्यांचं मतपरिवर्तन झालं. आमचं सहजीवन ते जवळून पाहत होते. ही बाई उथळ नाही हे त्यांना जाणवलं. मी लहान असूनही ते मला 'ज्योत्स्नाबाई' असं अगदी आदरानं संबोधू लागले. विशेषत: कदम गेल्यावर मी जे सोसलं, ज्या धडाडीनं परत उभी राहिले, तेव्हापासून त्यांच्या मनात माझ्याबद्दल एक आत्मीयता निर्माण झाली. मी काहीतरी सकारात्मक करू शकेन याचा विश्वास त्यांना वाटू लागला. 'सर आणि मी' या पुस्तकाचं सुरुवातीचं लेखन मी त्यांना वाचून दाखवलं होतं. तेव्हा त्यांनी पुढच्या लिखाणाची संमती दिली होती. पुस्तक प्रकाशित झाल्यावर मी ते त्यांना भेट दिलं. पुस्तक त्यांना मनापासून आवडलं. त्यांनी पण सदिच्छा दिल्या.

एखाद्या व्यक्तीची ताकद किती आहे, समज किती आहे, पात्रता आहे की नाही हे पटवर्धनांना फार चांगलं कळायचं. वरवरच्या गोष्टींना ते फार महत्त्व देत नसत. उथळ माणसं त्यांना पसंत पडायची नाहीत. ज्यांच्यात खरंच काही मूलभूत असेल, ज्यांच्यात जीवनाचा ठाव घेण्याची खोली असेल अशा व्यक्तींना ते खूप मानत असत. असे त्यांचे निवडक स्नेही होते. त्यापैकी संभाजी कदम एक. कदमांवर त्यांचा फार जीवही होता. त्यांच्या विद्वत्तेबद्दल, कलासक्त वृत्तीबद्दल विशेष आदर होता. अभिमान होता. कदम जे.जे.चे डीन झाले तेव्हा पटवर्धनांना खूप आनंद झाला होता. ते सपत्नीक कदमांचं अभिनंदन करायला डीनच्या बंगल्यात आले होते. कदमांचं पेटीवादन त्यांना फार आवडायचं. बंगला सोडताना कदमांनी पेटीवादनाचा कार्यक्रम केला होता, तेव्हाही पटवर्धन आवर्जून उपस्थित होते.

आमच्या गप्पांमध्ये कदमांच्या आठवणी निघाल्या की पटवर्धन खूप भावनिक होऊन जायचे. म्हणायचे, ''कदम आमचे गुरू आहेत. योगवासिष्ठ या ग्रंथाची ओळख त्यांनी आम्हाला करून दिली. सौंदर्यशास्त्र, कलासमीक्षा, चित्रकला यातील मर्म कदमांमुळे आम्हाला समजलं.'' पटवर्धन हे अगदी नम्रपणे सांगायचे. कदमांनी सत्यकथेत 'विरुपाक्ष' या टोपणनावानं कलासमीक्षा लिहिली. तेव्हा 'विरुपाक्ष' हे शंकराचं नाव पटवर्धनांनीच त्यांना सुचवलं होतं. पटवर्धनांना 'शिव' या दैवताबद्दल विशेष आत्मीयता होती.

कदम गेल्यावर मौजेनं त्यांचा 'पळसबन' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. प्रकाशनाचा कार्यक्रम ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात पटवर्धनांच्या हस्तेच पार पडला. त्यावेळी श्री. पु. आवर्जून उपस्थित होते. पटवर्धन सहसा स्टेजवरून भाषण करत नसत. पण त्या दिवशी त्यांनी सुंदर भाषण केलं. कदमांविषयी ते अगदी भरभरून बोलले. डझनभर कागदांवर त्यांनी खूप काही लिहून आणलं होतं. ते सगळं व्यक्त करण्याची त्यांची उत्कटता त्यांच्या बोलण्यातून जाणवत होती. नंतर श्री.पु. सुद्धा म्हणाले की आज पटवर्धन खूप छान बोलले. कदमांच्या योग्यतेबद्दल पटवर्धनांना खूप खात्री असायची. कदमांनी लिहिलेला 'संस्कृतिसर्जन आणि भारतीयता' हा लेख पटवर्धनांनी जेव्हा प्रथम वाचला, तेव्हा ते भारावून गेले होते. त्या लेखाचं मोल त्यांना इतकं वाटलं की तो त्यांनी त्या वर्षीच्या मौजेच्या दिवाळी अंकात समाविष्ट करण्याचं ठरवलं. लेख खूपच मोठा होता. गहनही होता. त्यामुळे श्री.पुं.चा त्याला विरोध होता. तो अंकात घेण्यासंबंधी पटवर्धनांचे व श्री.पुं.चे मतभेद झाले, पण पटवर्धन आपल्या निर्णयावर ठाम होते. हा लेख घ्यायचा नसेल तर मी अंकाचं संपादन करणार नाही अशी अट घातल्यावर मात्र श्री.पुं.चा नाइलाज झाला. अखेर लेख मौजेच्या ८६ सालच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला. त्या लेखाबद्दल नंतर अनेक वाचकांच्या, विद्वानांच्या सुंदर प्रतिक्रिया आल्या. पटवर्धन नसते तर कदमांचा हा महत्त्वाचा लेख इतक्या लोकांपर्यंत पोचला नसता. या लेखामुळे कदमांच्या समग्र विचारांची, चिंतनाची, अभ्यासाची भरारी किती मोठी आहे हे सिद्ध झालं. श्री. बा. जोशींनी तर पटवर्धनांचे आभार मानले आणि त्यांना एक सुंदर पत्रही लिहिलं. त्या पत्रात कदमांच्या सखोल अभ्यासाचं त्यांनी भरभरून कौतुक केलं आहे. पटवर्धनांनी त्यांना आलेलं हे पत्र तीन-चार वर्षांपूर्वीच माझ्याकडे सुपूर्द केलं. त्यांच्या मनाच्या या मोठेपणाचं मला फार अप्रूप वाटतं. स्वत:चा काहीही वैयक्तिक फायदा नसताना केवळ ज्ञानासाठी, कलेसाठी तळमळीनं काम करणारे पटवर्धनांसारखे निस्पृह लोक खरंच 'ग्रेट' म्हणायला हवेत. पटवर्धनांच्या या वृत्तीचा कदमांनाही फार आदर होता. अभिमान

होता. पटवर्धनांच्या एका वाढदिवसाला 'अक्षर' दिवाळी अंकात कदमांनी पटवर्धनांवर फार चांगला लेख लिहिला होता. अनेकांना तो आवडला होता. तसे पटवर्धनांचे व कदमांचे अनेकदा मतभेद होत. वादविवाद होत. ते विकोपालाही जात. कधी कधी पटवर्धन फार विक्षिप्त वागत. एकदा त्यांनी कदमांचं 'जयंती' हे सुंदर पोर्ट्रेट खास मौजेच्या मुखपृष्ठासाठी मागून घेतलं आणि ते छापताना खालून असं काही विचित्र कापलं की चित्राची सगळी मजाच निघून गेली. कदमांना हे अजिबात रुचलं नाही. ते चिडले. तेव्हापासून मुखपृष्ठासाठी आपलं चित्र त्यांनी कधीही कुणाला दिलं नाही. पटवर्धनांना आपली चूक समजली. चित्राच्या बाबतीत मग ते खूप काळजी घेऊ लागले. पटवर्धन हे असं कधी मुद्दाम करायचे नाहीत. त्यांच्यात एक खोडकर मूल लपलेलं असायचं. ते मूल जितकं खोडकर असायचं तितकंच ते निरागसही असायचं. त्यामुळे वाद होऊनही त्यांच्यावर कुणी कधी रुष्ट व्हायचं नाही. एखाद्यानं आपली बाजू मांडली की पटवर्धन आवर्जून त्याविरुद्ध बाजू मांडायचे व त्याचं समर्थन करायचे. कदम पण स्वभावानं हट्टी होते. टोकाची भूमिका घ्यायचे. पण हे सगळं लहान मुलांसारखं क्षणिक असायचं. मनातली किल्मिषं, गोंधळ दूर झाला, वादविवाद घालून दोघंही दमले, थकले की मग सगळं शांत व्हायचं. आणि मग सुसंवादात वातावरण प्रसन्न होऊन जायचं. पटवर्धनांच्या अशा वादविवादांचे किस्से अनेक साहित्यिक आजही रंगवून सांगत असतात.




**'पळसबन'चे प्रकाशनसमयी निरंजन उजगरे, राम पटवर्धन, वसंत आबाजी डहाके आणि ज्योत्स्ना कदम**

ठाण्याला आल्यापासून पटवर्धन आमच्याकडच्या महत्त्वाच्या कार्यक्रमांना आवर्जून येत असत. आमच्याकडे दरवर्षी दसऱ्याला 'सरस्वतीपूजन' असतं. फार पूर्वीपासून ही एकमेव पूजा कदम करत असत. आजही आम्ही ती चालू ठेवली आहे. वेगवेगळ्या विषयातील महत्त्वाची पुस्तकं, वाद्यं, कॅनव्हास, रंग, ब्रश इत्यादी सगळी कामाची आयुधं सुंदरपणे मांडून आम्ही त्यांची पूजा करतो. ठाण्याला आल्यापासून दरवर्षी पटवर्धन व ललितावहिनी दसऱ्याच्या दिवशी खास वेळ काढून आमच्याकडे येत असत. समईच्या मंद पवित्र प्रकाशात मांडलेली ही आगळीवेगळी पूजा पटवर्धनांना फार आवडायची. ते वातावरण अतिशय मंगलमय प्रसन्न असायचं. अनेक मित्रमंडळी यायची. पटवर्धनांना त्यांच्याशी ओळख करून घ्यायला आवडायचं. असे अनौपचारिक पण जिव्हाळ्याचे कार्यक्रम त्यांना फार आवडत. ते साहित्य संमेलनांना कधीही गेले नाहीत पण आमच्यासारख्या मित्रमंडळींच्या चित्रप्रदर्शनांना आवर्जून येत असत. संगीताच्या कार्यक्रमांनाही ते आवडीनं जात असत. त्यांच्या वागण्याबोलण्यात खोटा सालसपणा नसायचा. ते सडेतोड बोलायचे. मोकळंढाकळं वागायचे आणि हे सगळं खूप सहज असायचं.

पटवर्धन नेहमीच साहित्यिक, कलावंत विद्वान लोकांमध्ये वावरत पण म्हणून ते सामान्य माणसांना, नातेवाईकांना कमी लेखत नसत. घरच्या लोकांची, नातेवाईकांची ते आस्थेनं चौकशी करायचे. प्रेमानं खुशाली विचारायचे. कदमांच्या सगळ्या परिवाराबद्दल त्यांना आत्मीयता होती. मनोहर, शंकुतला, लीला या कदमांच्या भावंडांची आठवणीनं चौकशी करायचे. अलीकडे माझ्या वडिलांचीही विचारपूस करायचे.

कदम गेल्यानंतर मी पार कोलमडून गेले होते. त्या काळात माझी मन:स्थिती ठीक नसायची. नैराश्य यायचं. आत्मविश्वास डळमळीत व्हायचा. तेव्हा मन मोकळं करायला मी पटवर्धनांकडे जायचे. पटवर्धन आत्मीयतेनं माझं बोलणं ऐकायचे. ललितावहिनी पण मला समजून घ्यायच्या. मला त्या दोघांचा तेव्हा खूप आधार वाटायचा. त्यांच्यापाशी सुखदु:खाच्या गोष्टी केल्या की बरं वाटायचं. पुन्हा जिद्दीनं उभं राहावंसं वाटायचं. काही काळानंतर मी सावरले. नव्या उमेदीनं पेंटिंग करायला सुरुवात केली. तेव्हा पटवर्धन व वहिनी माझी नवीन पेंटिंग बघायला येत. एखादं पेंटिंग आवडलं की मनापासून दाद देत. एकदा शार्दूलनं त्यांच्या नातीचं–ऋजुताचं एक पोर्ट्रेट केलं. ते चांगलं झालं. पटवर्धनांनी ते फ्रेम करून आपल्या घरात अगदी प्रेमानं लावलं. घरी येणाऱ्या प्रत्येकाला ते चित्र दाखवत व शार्दूलचं मनापासून कौतुक करत.

जगात कुठे कुठे काय काय चालू आहे हे समजण्यासाठी पटवर्धन महत्त्वाची इंग्रजी–मराठी वृत्तपत्रं, मासिकं, पुस्तकं भरपूर वाचत असत. जागतिक परिस्थितीचा मागोवा घेत असत. असं वाचन करताना त्यातील महत्त्वाचा मजकूर ते लाल पेनानं खास त्यांच्या स्टाइलमध्ये अधोरेखित करत. अशी महत्त्वाची कात्रणं मग ते त्या त्या विषयाशी संबंधित असलेल्या मित्रमंडळींना आठवणीनं पाठवून देत. चित्रकलेशी संबंधित अशी एक–दोन कात्रणं मलाही त्यांनी एकदा पाठवली होती. त्यांचं हे अगत्य अगदी निर्भेळ असायचं.

पटवर्धनांना भारतीय संस्कृती, परंपरा, कलाजीवन याबद्दल सार्थ अभिमान होता. आधुनिकतेपेक्षाही त्यांना पारंपरिकतेबद्दल अधिक जिव्हाळा होता, ओढ होती. पटवर्धन देवभोळे किंवा पूजाअर्चा करणारे नव्हते पण तसे नास्तिकही नव्हते. 'परमेश्वर' ही संकल्पना मानणारे होते. पुनर्जन्म, दैव, नशीब, ज्योतिष यावर

# नवीन मौज प्रकाशने

रंगवाटेचा वारकरी **अरुण काकडे** यांचे आत्मचरित्र म्हणजे प्रायोगिक रंगभूमीचा जणू आरसाच.
अकृत्रिम भाषेने नटलेल्या या आत्मचरित्रात अनेक दुर्मिळ छायाचित्रांचा समावेश आहे.

**अमका : अरुण काकडे**

२६८ पृष्ठे + ८ पृष्ठे मोठा आकार पुठ्ठा बांधणी किंमत ४०० रुपये

निजामशाहीच्या अस्ताचे साक्षीदार, तसेच या मुस्लीम राजवटीलाही मानवी चेहरा देणाऱ्या
काही व्यक्तींची तसेच अन्य कर्त्याधर्त्यांची सहृदयतेने रेखाटलेली व्यक्तिचित्रे

**संस्थानी माणसं : नरेंद्र चपळगावकर**

१६० पृष्ठे किंमत २०० रुपये

कालातीत आशयाच्या समृद्ध नाटकाचं सहजसोप्या भाषेत केलेले भाषांतर. नाट्यप्रेमी, नाट्यधर्मी आणि
कलाकारांसोबतच सामान्य नाट्यप्रेमींनाही नाटकाकडं पाहण्याचा एक समग्र अर्थपूर्ण दृष्टिकोन देणारं पुस्तक

**मृच्छकटिकम् अर्थात मातीच्या गाड्याचं प्रकरण : राजीव नाईक**

संस्कृत नाट्यपाठ : शुद्रक भाषांतर व भाष्य : राजीव नाईक १२२ पृष्ठे किंमत १२५ रुपये

लंपनच्या भावविश्वात वाचकांना गुंतवून टाकणाऱ्या लेखकाच्या ललित लेखांचे भावस्पर्शी लेणे

**चांदण्याचा रस्ता : प्रकाश नारायण संत**

९६ पृष्ठे + ८ रंगीत पृष्ठे किंमत १२५ रुपये

अपू नावाचा लहान मुलगा, थोरली बहीण दुर्गा, सर्वजया, छोटी मोठी कामे करून जगणारा, जगविणारा पिता
हरिहर यांची हृदयस्पर्शी कथा. रे यांच्या जगप्रसिद्ध पथेर पांचाली या चित्रपटाची मूळ कादंबरी

**पथेर पांचाली : विभूतिभूषण वंद्योपाध्याय अनुवाद: नीलिमा भावे**

२५६ पृष्ठे किंमत २५० रुपये

तांबोळींची कविता मानवाच्या अंगभूत दुर्बलतेचा, असहायतेचा, अनिकेततत्वाचा आणि परात्मभावाचा वेध घेते.
त्यांची कविता वाचताना आपण आपल्याच जगण्याची कहाणी वाचत असल्याचा प्रत्यय येतो.—सुधीर रसाळ

**जन्मझुला : लक्ष्मीकांत तांबोळी**

९८ पृष्ठे किंमत १२५ रुपये

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी: २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

त्यांचा पुरेसा विश्वास होता आणि तितकाच प्रयत्नांवरही विश्वास होता. एखादी गोष्ट झाली नाही की ते म्हणायचे, ''आमचे ग्रह बहुतेक अनुकूल नसावेत.'' किंवा एखादी गोष्ट अनपेक्षितपणे चांगली घडली तर म्हणायचे, ''ग्रह सध्या आमच्यावर खूष दिसताहेत.'' हे सगळं ते हसत हसत म्हणायचे आणि परत आपल्या कामाला लागायचे. पटवर्धनांच्या पत्रिकेत लग्नी मकरेचा मंगळ होता. या मंगळानंच त्यांना प्रचंड ऊर्जा दिली असावी. खडतर बालपण, कष्टाचा संसार आणि मानानं जगण्याचं कठीण व्रत त्यांनी मोठ्या जिद्दीनं व सहनशीलतेनं सहज पेलून घेतलं.

पटवर्धनांची राहणी अगदी साधी होती. त्यांचा वर्ण आणि चेहरेपट्टी खास चित्पावनी ब्राह्मणी नव्हती. तसे ते अगदी सामान्य दिसायचे, पण उत्साहानं किंवा काहीतरी फार महत्त्वाचं बोलू लागले की त्यांच्या चेहऱ्यावर एक चमक दिसायची. अलीकडच्या काळात ते खूप शांत झाले होते. खूप वेळा ते भरभरून बोलायचे. हृद्य आठवणी सांगायचे. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक आदीम करुणा जाणवायची. व्यवहाराच्या पलीकडचं वैश्विकतेचं भान त्यांच्या विचारात जाणवायचं. पटवर्धनांना घरदार, सोनंनाणं, इस्टेट, करिअर या गोष्टींचा कधीच हव्यास नव्हता. त्यामुळे चुनाभट्टीच्या दोन खोल्यांत ते आनंदानं राहिले. कोकणात वडिलोपार्जित हक्काचं घर असताना त्यावर हक्क गाजवला नाही. इतकी वर्षं संपादनाचं काम केलं, पण स्वत:चा उदोउदो करून घेतला नाही. सुखसमृद्धी मिळवण्याची अनेक कौशल्यं अंगी असूनही फकिरी वृत्तीनं राहिले.





**नुकतेच प्रसिद्ध झाले...**

## जन्मरहस्य
### डॉ. आनंद नाडकर्णी

**मूल्य ७५ रुपये**
**सवलतीत ??? रुपये**

'जन्मरहस्य'! खरे तर हे फक्त एका व्यक्तीचे जन्मरहस्य नाही तर जन्म नावाच्या प्रवासाचे रहस्य आहे. जनुके आणि संस्कार ह्यातून तयार होणाऱ्या माणसाच्या घडणीचे रहस्य आहे. एका बाजूला व्यक्तिमत्त्वाला येणारा आकार आणि दुसऱ्या बाजूने त्यावर होणारे आघात... ह्या संघर्षामध्ये एकदा व्यक्ती सापडली की अविवेकाच्या वावटळीमध्ये ती दिशा हरवू शकते. विवेकाचा दिवा दाखवणारा मार्गदर्शक शोधावा लागतो. कधी ज्या व्यक्तीवर 'मनोरुग्ण' असा शिक्का बसला आहे अशा व्यक्तीच्या मनातली आस्थेची ऊब तथाकथित 'शहाण्या' व्यक्तीला वाटेवर आणते.


या सगळ्या जीवनप्रवासात पटवर्धनांना ललितावहिनींची फार चांगली साथ लाभली. त्या फार शिकलेल्या नाहीत. विशेष असं कलाकौशल्य त्यांच्याजवळ नाही. पण प्रेमळपणा, रसिकता आणि सोशिकता या गुणांनी त्यांनी पटवर्धनांचा संसार सुखाचा केला. वहिनींना कलेची, सौंदर्याची फार चांगली जाण आहे. अलीकडे पटवर्धनांना अशक्तपणामुळे वाचता येत नसे. तेव्हा वहिनी त्यांना महत्त्वाचं वाचून दाखवत. पटवर्धनांच्या सुखदु:खात वहिनी सावलीसारख्या त्यांच्याबरोबर राहिल्या. मौजेचे संपादक असलेले राम पटवर्धन पूर्वी सतत कृतिशील असायचे. संपादनाची धावपळ, लेखकांशी महत्त्वाची चर्चा यामध्ये ते अगदी व्यग्र असायचे. संपादनाची एक वेगळीच जाण त्यांच्यात होती. त्यांचा एक दबदबा साहित्यविश्वात पसरलेला असायचा. त्या काळात पटवर्धनांचा स्वभाव मात्र थोडा कठोर, आग्रही, हट्टी वाटायचा. पुढे संपादनाचं काम कमी होत गेलं. धावपळ कमी झाली. थोडं स्वास्थ्यही मिळायला लागलं. मुलं स्वावलंबी झाली, तसा त्यांचा स्वभाव बदलत गेला. शांत होत गेला. त्यात एक नितळपणा यायला लागला.

पटवर्धन स्वत:ला कधी फार थोर वगैरे समजायचे नाहीत. दुसऱ्यांनी त्यांचा मोठेपणा व्यक्त केला, की ते फारसे बोलायचे नाहीत. संपादनाव्यतिरिक्त त्यांचं मोठेपण त्यांच्या अस्सल जगण्यात होतं. अमुक काही मिळवण्यासाठी ते काम करत नसत. तर ते काम मनापासून आवडतं म्हणून करत. या सगळ्यात त्यांना पुरेसा पैसा, प्रसिद्धी, मानसन्मान विशेष मिळाला नाही. पण त्याची त्यांनी कधी पर्वा केली नाही. आवडीचं काम करण्यातलं समाधान ही त्यांच्या दृष्टीनं फार महत्त्वाची गोष्ट होती. त्यात ते रमलेले असायचे.


वाढत्या वयाबरोबर त्यांच्यात एक शांत निरामय वृत्ती आली होती. श्री.पु. गेले तेव्हा पत्रकारांशी बोलताना ते अगदी शांत होते. त्यांना दु:ख झालं होतं, पण त्यांनी ते खूप व्यापक दृष्टीनं व्यक्त केलं. म्हणाले, ''प्रिय माणसाच्या मृत्यूचं दु:ख वाटलं, तरी ते करायचं नाही. आज ना उद्या प्रत्येकालाच जायचं आहे. ही तर आनंदयात्रा आहे. आम्हालाही एक दिवस याच मार्गानं जायचं आहे.''

खरंच! सगळेच लोक जन्ममृत्यूमधली ही यात्रा करायला इथे येतात. पण या यात्रेला 'आनंदयात्रा' समजणारे फार थोडे असतात. पटवर्धन हे असेच एक आनंदयात्री होते. काही घेण्यापेक्षाही दुसऱ्याला देण्यातच आनंद मानणारे. म्हणून त्यांचं आयुष्य खऱ्या अर्थानं आनंदी, निरामय बनू शकलं...


**– ज्योत्स्ना कदम**
द्वारा, सुजाता ठोंबरे
१०१, नागेश्वर कृपा, आदर्श विद्यामंदिराजवळ,
नगरपरिषदेच्या ऑफिससमोर, कुळगाव,
बदलापूर (पूर्व) ४२१५०३. भ्रमणध्वनी :०७७६८०४८४७२

# मुंडे नावाचा झंझावात थांबला...

## प्रवीण बर्दापूरकर



**नितीन गडकरी , प्रवीण बर्दापूरकर आणि गोपीनाथ मुंडे**

मृत्यू अटळ आहे असे कितीही समर्थन केले तरी गोपीनाथ मुंडे यांच्या अनपेक्षित मृत्यूचे कोणत्याही प्रकारे समर्थन करता येणार नाही. वैयक्तिक आणि सार्वजनिक आयुष्यात असंख्य वादळांना कधी बेडरपणे, कधी समंजसपणे, कधी सोशिकपणाने तर कधी जाणीवपूर्वक सोशिकपणाने सामोरे गेलेल्या मुंडे यांचा मृत्यू एका अत्यंत किरकोळ अपघातात होतो हे एक न पचवता येणारे वास्तव आहे.

बीडसारख्या आडवळणाच्या जिल्ह्यात, परळीसारख्या आणखीच आडवळणी तालुक्यात, अत्यंत गरीब मुंडे कुटुंबात जन्माला आलेले गोपीनाथ नावाचे तिसरे अपत्य राज्याच्या राजकारणात प्रस्थापित समीकरणांना धक्का देत एक नवीन सूत्र निर्माण करणार आहे याची कल्पनाही कोणाच्या मनाला तेव्हा शिवली नसेल. मराठ्यांनी आणि त्यांनी फेकलेल्या तुकड्यावर ज्या अन्यांना संधी मिळाली त्यांनी राज्य करावे, ब्राह्मणांनी प्रशासन चालवावे असा तो, गोपीनाथ मुंडे जन्माला आले तेव्हाचा जमाना होता. मराठवाडा तर सामाजिक पातळीवर निजामाच्या राजवटीच्या अस्ताच्या कालखंडात झालेल्या अत्याचाराने पिचून गेलेला होता, ही आणखी एक बाजू होती. स्वातंत्र्यानंतर काहीतरी वेगळे घडावे अशी उमेद नुकतीच उदयाला आलेली होती. त्या पिढीचे गोपीनाथ मुंडे एक प्रतिनिधी. एक युवक प्रमोद महाजन यांच्या सहवासात येतो, त्यांच्या राजकीय विचारसरणीचा स्वीकार करतो आणि मग राज्यात एका वादळाची निर्मिती होते, त्या वादळाचे नाव असते गोपीनाथ मुंडे!

एका अत्यंत उपेक्षित वर्गात जन्मलेला आणि अभावग्रस्त परिस्थितीला टक्कर देत समोर आलेला गोपीनाथ मुंडे नावाचा एक युवक महाराष्ट्रात एक राजकीय शक्ती म्हणून उदयाला आला तो जात आणि धर्माचे एक नवीन समीकरण घेऊन. बहुजन नावाचे ते समीकरण आहे. राजकारण, सत्ता आणि प्रशासनासारख्या मुख्य

प्रवाहापासून लांब असलेल्या आणि राजकीयदृष्ट्या जागरूक नसलेल्या समाजाला गोपीनाथ मुंडे यांनी नुसतेच जागे केले नाही तर त्यांच्यात स्वअस्मितेचे एक स्फुल्लिंग निर्माण केले. तोपर्यंत आधी जनसंघ आणि नंतर भारतीय जनता पक्षावर रामभाऊ म्हाळगी, उत्तमराव पाटील, हशू अडवाणी, वसंतराव पटवर्धन, वसंतराव भागवत यांचे वर्चस्व आणि प्रभाव होता. भारतीय जनता पक्षाची राज्यातील शक्तीही याच उच्च वर्गापुरती मर्यादित होती. भटा-ब्राह्मणाचा पक्ष अशी हेटाळणी त्या काळात भारतीय जनता पक्षाची होत असे. वसंतराव भागवत आणि प्रमोद महाजन यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या हाती पक्षाच्या महाराष्ट्र शाखेची सूत्रे द्यायची आणि पक्षाचे बहुजनीकरण करण्याचे ठरवले तेव्हा ते एक फाजील धाडस आहे असेच पक्ष आणि संघातील प्रस्थापितांना वाटत होते. मुंडे यांनी या पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद स्वीकारले आणि भारतीय जनता पक्षाचा ब्राह्मणी तोंडवळा त्यांनी बदलला. जन्मजात धाडसी वृत्ती, वादळे झेलण्याची; अनेकदा वादळे ओढवून घेण्याची बेदरकार वृत्ती आणि जनमानसाची नस ओळखण्याची कला या आधारे गोपीनाथ मुंडे यांनी मिळालेली संधी राजकीय वर्चस्वात कशी बदलवली हे भल्याभल्यांना कळले नाही. भाजपचा हा पोरसवदा अध्यक्ष आणि त्याचा पक्ष आपण लोळवून टाकू असे भल्याभल्यांनी रचलेले मांडे मनातल्या मनातच राहिले. राजकीय धुरंधरांनी मांडणी केलेले अंदाज धुळीला मिळाले. रात्रंदिवस दौरे, अथक परिश्रम आणि राजकीय समीकरणे कुशलपणे जुळवत, शेकडो माणसे जोडत भारतीय जनता पक्षाला ब्राह्मण, सिंधी, गुजराती, मराठा या उच्चवर्णीयांच्या वर्चस्वातून मुंडे यांनी मोकळे केले आणि भाजपची प्रतिमा बहुजन अशी बदलत निवडणुकीत लक्षणीय यश मिळवून दिले. कोळी, महादेव कोळी, आगरी, माळी, गवळी, धनगर, तेली, कुणबी, बंजारा अशा समाजातील अनेक अज्ञात व उपेक्षित जातीप्रवाहांना गोपीनाथ मुंडे यांनी भारतीय जनता पक्षाच्या झेंड्याखाली एकत्र आणले. १९९०च्या विधानसभा आणि नंतरच्या लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले भारतीय जनता पक्षाचे ९० टक्के उमेदवार गैरब्राह्मण आणि गैरमराठा होते! हेच बहुजन कार्ड वापरून त्यांनी १९९५ मध्ये सेना-भाजप युतीला सत्तेचे द्वार खुले करून दिले. महायुतीची मोट बांधत हाच मुत्सद्दीपणा याही लोकसभा निवडणुकीत दाखवला. राज्याच्या राजकारणात अनेक राजकारणी आहेत आणि होतीलही, पण बहुजनांची नस अचूक सापडलेले, प्रचंड आणि दुर्दम्य इच्छाशक्ती असणारे गोपीनाथ मुंडे मात्र पुन्हा निर्माण होणार नाहीत...

गोपीनाथ मुंडे यांचा मृत्यू हे न पचवता येणारे असले तरी सत्य आहे. गेल्या साडेतीन दशकांत मुंडे काही केवळ एका पक्षाचे नेते म्हणून महाराष्ट्रात स्थिरावले नव्हते तर एकाच वेळी ते राज्यातील बहुजनांचे आधार आणि पक्षाचा चेहरा बनलेले होते. एक वाळकी काडी तोडता येते, पण अशा काड्यांची मोळी बांधली तर ती मोळी एक ताकद बनते हे मुंडे यांनी खऱ्या अर्थाने ओळखले होते. म्हणूनच संसदीय लोकशाहीच्या मुख्य प्रवाहापासून लांब असलेल्या जातीसमूहांची मोट त्यांनी बांधली. एक गेम चेंजर म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी स्थान निर्माण केले. मुंडे यांच्या या मोळीत आणखी काही नव्या काड्या बांधल्या जाणार होत्या आणि त्यांची नावेही मुंडे यांनी खाजगीत काहींना सांगितलेली होती. पण, मुंडे आता हयात नाहीत त्यामुळे ती नावे न उच्चारणेच चांगले. त्यांची जागा घेणारा जो कोणी असेल तो या बड्या नेत्यांना बहुजनांच्या या मोळीत आणू शकतो का हे पाहणे नक्कीच औत्सुक्याचे ठरणार आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे स्वभाव वादळी आणि बेदरकारही असल्याने घुसमट झाली म्हणून पक्षाच्या नेतृत्वाच्या विरोधात मोठ्या ऐटीत बंडखोरीचे निशाण फडकावण्याचे धाडस आणि बाळासाहेब ठाकरे यांना मध्यस्थीला टाकून ते निशाण खाली उतरवण्याचा धोरणीपणाही त्यांच्यात होता. राजकीय समन्वयवादी दृष्टी आणि लोकसंग्रह यामुळे ते लोकनेता झाले. त्यांना पर्याय कोण अशी परिस्थिती निर्माण झालेली नसताना, आता अचानक महाराष्ट्र भाजपपुढे नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मुंडे यांच्यानंतर कोण या प्रश्नाचे उत्तर तीन स्तरांवर द्यावे लागणार आहे. यातील पहिला स्तर भारतीय जनता पक्ष, दुसरा सेनेसोबत युती आणि तिसरा स्तर महायुती आहे. मुंडे यांची जागा घेणाऱ्याला केवळ भाजपला सांभाळायचे नाही तर शिवसेनेशी युती नको असणाऱ्या, भारतीय जनता पक्षातील राज ठाकरे यांची मोहिनी पडलेल्या दुसऱ्या फळीतील नेतृत्वाला समजवावे लागेल. बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे हे सेना-भाजप युतीचे शिल्पकार आहेत. बाळासाहेब आणि महाजन असताना आणि नसतानाही अनेकदा सेनेशी असलेली भारतीय जनता पक्षाची युती तुटेस्तेवर ताणली गेली, पण तुटली नाही. खुद्द मुंडे यांचेही उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वशैलीविषयी काही रिझर्व्हेशन होती पण ती उघडपणे न बोलण्याचा धोरणीपणा त्यांच्याकडे होता. अगदी उदाहरणच द्यायचे झाले तर, चिमूर विधानसभा पोटनिवडणुकीचे देता येईल. विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात सेना आणि भाजप दोघांनाही उमेदवार द्यायचा होता आणि त्यावरून उद्धव ठाकरे तसेच नितीन गडकरी यांच्यातील तणाव टोकाला पोचला होता. या दोघांचाही उमेदवार रमेश गजबे हेच होते आणि ते ठाकरे-गडकरी या दोघांनाही खेळवत होते! गजबे आमच्यासोबत आहेत असा हवाला एका पहाटे तीन वाजता उद्धव ठाकरे यांनी तर नितीन गडकरी यांनी सकाळी आठ वाजता पत्रकारांशी बोलताना दिला आणि गजबे यांच्याशी बोलणेही करून दिले होते! म्हणजे रमेश गजबे यांनी पहाटे तीन वाजता मुंबईत मातोश्रीवर तर तेथून सकाळच्या विमानाने थेट नागपूर गाठून गडकरीवाडा गाठला होता. या तणावाच्या संपूर्ण काळात मुंडे मात्र कोठेच नव्हते, त्यांना हा वाद मुळीच रुचलेला नव्हता. मात्र काहीच न बोलता ते पूरग्रस्त मराठवाड्याच्या दौऱ्यावर 'गोदा परिक्रमा' करायला निघून गेले..



**ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर यांच्या 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या 'डायरी' तसेच विजय प्रकाशनने प्रकाशित केलेल्या 'क्लोज-अप' या पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात नितीन गडकरी, प्रवीण बर्दापूरकर, छगन भुजबळ आणि गोपीनाथ मुंडे**

गोपीनाथ मुंडे यांच्या तुलनेत नितीन गडकरी यांचा उदय नंतरचा, पण त्यांची झेप वेग आणि उंची या निकषावर मोठी ठरली, ते राष्ट्रीय राजकारणात पोचले. प्रमोद महाजन यांच्या अनपेक्षित हत्येने मुंडे यांच्या वर्चस्वाला तडा गेला. बंडखोरीची भाषा करून तो मुंडे यांनी बराचशा प्रमाणात परत मिळवला. नंतर मुंडे-गडकरी वाद महाराष्ट्राने पाहिला, मीडियाने गाजवला आणि भाजपला त्याचा कसा फटका बसला हे सर्वज्ञात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात परतायचे नाही हे गडकरी यांनी ठरवल्याने लोकसभा निवडणुकीच्या काळात मुंडे-गडकरी यांच्यातील मतभेदाची दरी सूक्ष्म झाली होती. अनेक वादळे पेललेली आणि त्यांची किंमत चुकती केलेली असल्याने अलीकडच्या काळात गोपीनाथ मुंडे समन्वयवादीही झालेले होते. निवडणुकांचे राजकारण हेच महत्त्वाचे आहे हे ओळखून त्यांनी काही नवीन समीकरणे लोकसभा निवडणुकीत जुळवली आणि महायुती आकाराला आली. या महायुतीने काँग्रेस-राष्ट्रवादीला धूळ चारली. (म्हणूनच शरद पवार यांनी जितेंद्र आव्हाड यांना कॅबिनेट मंत्री करण्याची चाल खेळली नाही ना?) विधानसभा निवडणुकीआधी मुंडे यांची काही नवीन राजकीय जुळवाजुळवी फलदायी होत असल्याचे दिसत असताना आणि मुख्यमंत्री होण्याचे मुंडे यांचे स्वप्न नजरेच्या टप्प्यात असतानाच, ३ जूनच्या अपघाताने राज्याच्या नेतृत्वाचा प्रश्न भाजप, युती आणि महायुतीसमोर उभा केला आहे.

मुंडे यांच्याशी माझा स्नेह गेल्या चाळीस-बेचाळीस वर्षांचा. परळीहून लातूरला जायचे तर आधी अंबाजोगाई मग डावीकडे वळल्यावर रेणापूर आणि नंतर लातूर असा प्रवास होतो. गोपीनाथ मुंडे परळीचे, पण त्यांचा मतदार संघ रेणापूर. महाराष्ट्राच्या राजकारणावर वर्चस्व निर्माण करणाऱ्या प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे आणि विलासराव देशमुख यांचा भौगोलिक भावबंध हा असा आहे आणि यात अंबाजोगाई ते रेणापूर या प्रवासात आधी लागते ते बर्दापूर. महाजन आणि मुंडे विद्यार्थी चळवळीतून समोर आले आणि राजकीय विचार वेगळा असूनही हे दोघे आणि विलासराव यांच्याशी माझी मैत्री तेव्हापासूनची. मुंडे यांना एक राजकीय नेता म्हणून पाहता आले आणि मित्र म्हणून अनुभवता आले तरीही कौटुंबिक पातळीवर आमचे काही गुळपीठ जमले नाही. माझी पत्रकारितेतील मुशाफिरी सुरू असताना मी कोठेही असलो तरी आमच्या भेटी नियमित असत. एकदा त्यांचे राजकारण आणि माझे पत्रकारितेचे व्यवधान आटपले की प्रमोद महाजन आणि मी तसेच धनंजय गोडबोले नागपूरला अनेकदा आर्यभवन नावाच्या हॉटेलच्या तळघरातील रेस्तराँत गप्पा मारत असू. मुंडे यांच्या भेटी आधी आमदार निवासात होत; नंतर सोय आणि वेळ मिळेल तशी स्थाने बदलत गेली. मूळत: प्रमोद महाजनशी मैत्री असूनही माझे सूर गोपीनाथ मुंडे यांच्याशी जास्त जुळले गेले. मुंडे महाराष्ट्रात असण्याचा तो फायदा असावा. आर्थिक स्थिती मुळीच चांगली

नसणारे मराठवाड्यातील युवक तेव्हा नांदेड टेरिकॉटची विजार आणि अर्ध्या बाह्यांचा बुशशर्ट घालत, कारण ते कापड स्वस्त असे आणि टिकतही जास्त असे, शिवाय इस्त्रीची कटकट नसे. मुंडेही त्याला अपवाद नव्हते. अनेकदा तर त्यांच्या आणि आमच्याही पायांत स्लीपर्सच असत. मुंडे आणि माझ्या भेटी अनेकदा वक्तृत्वस्पर्धेच्या निमित्ताने होत. एसटीने धुळीच्या खकाऱ्यात प्रवास करत वक्तृत्वस्पर्धा मारणे म्हणजे जिंकणे हा आमचा अर्थार्जनाचा फावल्या वेळेतला उद्योग होता. एकदा कोणत्यातरी स्पर्धेच्या अंतिम फेरीत मुंडे यांनी मला हरवून ५१ रुपयांचे रोख बक्षीसही पटकावले. वक्तृत्व स्पर्धा हरण्यापेक्षा ५१ रुपयांचे रोख बक्षीस गेले हे माझे दु:ख व्यापक आणि खोलवर होते. ते त्यांनी समजून घेतले होते. तेव्हाही मुंडे यांच्यानंतर भाषण देणे कठीण असायचे इतका त्यांच्या भाषणाचा प्रभाव पडायचा आणि त्यांच्याआधी आपण कितीही चांगले भाषण केले तरी मुंडे हजरजबाबीपणाने आपल्या प्रतिपादनावर बोळा फिरवणार हे नक्की असायचे.

२०१० मध्ये विनायक मेटे यांच्या लोकविकास मंचच्यावतीने देण्यात येणाऱ्या मराठवाडा गौरव सन्मानासाठी मुंडे, मी, प्रसिद्धी खात्यातील अधिकारी श्रद्धा बेलसरे (पूर्वाश्रमीची जयश्री खारकर), नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांची निवड झाली. कार्यक्रमात मी आधी नंतर मुंडे आणि शेवटी प्रमुख पाहुणे असलेले विलासराव देशमुख असा भाषणाचा क्रम होता. श्रोत्यांचा मूड लक्षात घेऊन मी मूळ गंभीर भाषण बाजूला ठेवून मुंडे आणि विलासराव यांच्यावर खुसखुशीत हल्ले चढवले. त्यात मुंडे यांनी मला वक्तृत्व स्पर्धेत कसे हरवले, मुंडे यांना लेटलतीफ ही दिलेली पदवी, मुंडे-गडकरी वाद, माझे आणि विलासराव यांचे गांधी वेगळे कसे वगैरे..अशा गमतीजमती आणि चिमटेही माझ्या भाषणात होते. मुंडे यांनी 'मी बर्दापूरकरांना वक्तृत्व स्पर्धेत हरवले तेव्हापासून त्यांनी माझ्या विरोधात लिहायला सुरुवात केली' अशा हजरजबाबीपणाने सुरुवात करून माझ्यावर असा काही हल्ला चढवला आणि विलासरावांना माझ्या दुप्पट असे चिमटे काढले की त्याला तोड नाही. सभागृहातून माझ्या भाषणापेक्षा चौपट टाळ्या मुंडे यांच्या भाषणाला न मिळत्या तर नवल! विलासराव यांनी त्यावर कळस करून त्या कार्यक्रमातील आम्हा दोघांच्याही भाषणांवर बोळा फिरवला.. आमच्या तिघांच्या भाषणाची ही जुगलबंदी नंतरही चर्चेत राहिली, आजही आहे. अनेक ठिकाणी त्या जुगलबंदीची सीडी दाखवली गेली. कार्यक्रमानंतर आम्ही तिघेही आपल्या भाषणावर जाम खूष होतो. या जुगलबंदीचा 'शो' आपण एकदा औरंगाबाद आणि लातूरला करूया असे मुंडे म्हणाले. त्यावर आमचे एकमत झाले पण ते लांबत गेले. नंतर आधी विलासराव गेले आणि आता मुंडे...आता ते राहूनच गेले कायमचे....

'क्लोज-अप' आणि 'डायरी' या माझ्या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ औरंगाबादला माजी आमदार श्रीकांत जोशी आणि उद्योजक विवेक देशपांडे यांनी घडवून आणला. नितीन गडकरी तेव्हा नुकतेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झालेले होते आणि गडकरी-मुंडे यांच्यातील शीतयुद्ध पक्षात तसेच मीडियात साहजिकच चर्चेचा विषय होते. या पार्श्वभूमीवर या दोघांना एका व्यासपीठावर आणावे अशी श्रीकांत जोशी यांची तीव्र इच्छा होती. गडकरी आणि तेव्हाचे उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी तारीख दिली पण मुंडे यांचाशी संपर्क झाला नाही कारण काही कौटुंबिक समस्येत ते अडकलेले होते. कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी औरंगाबादला पोचल्यावर श्रीकांत, विवेक, डॉ. मिलिंद देशपांडे आणि मी तयारीवर अखेरचा हात फिरवत असताना श्रीकांत जोशी म्हणाले, 'मुंडेसाहेब आहेत उद्या इथे त्यांना बोलावू या'. माझी काही हरकत असण्याचा प्रश्नच नव्हता. श्रीकांत आणि विवेक यांना इतक्या ऐनवेळी मुंडे यांना फोन करणे अप्रशस्त वाटत होते. शेवटी मी माझ्या पत्रकारितेतील अनुभवातून आलेल्या कोडगेपणाचा आधार घेत मुंडे यांना फोन केला आणि कार्यक्रमाचे आमंत्रण दिले, कोण प्रमुख पाहुणे आहेत तेही सांगितले.

त्यावर मुंडे म्हणाले, 'बरोबर आहे, तू तुझ्या मित्रांना आमंत्रण देणार आणि मला मात्र ऐनवेळी सांगणार!' यातील मित्र म्हणजे नितीन गडकरी यांच्यावरून त्यांनी तो टोला लगावला होता.

मी कळवळून संपर्क कसा नाही झाला हे सांगितल्यावर मोकळेपणाने हसत मुंडे म्हणाले, मी येणार कार्यक्रमाला. माझ्या जुन्या मित्राचा कार्यक्रम आहे. नक्की येतो. आणि श्रोत्यात बसून मित्राचे कौतुक बघतो'.

कुठे बसवायचे तुम्हाला ते आम्ही ठरवतो असे म्हणत मी फोन कट केला. लगेच श्रीकांत आणि विवेकने बॅकड्रॉप, जाहिराती बदलल्या, नव्याने बातम्या पाठवल्या. मी फोन करून कार्यक्रमाला मुंडे यांना घेऊन येण्याची जबाबदारी नितीन गडकरींवर सोपवली आणि ती त्यांनी आनंदाने स्वीकारली. मुंडे, भुजबळ आणि गडकरी यांच्या उमदेपणाचा एक वेगळा पैलू आम्ही यावेळी अनुभवला. कार्यक्रमाला यायला मुंडे व गडकरी यांना उशीर झाला तरी उपमुख्यमंत्री भुजबळ संत एकनाथ रंग मंदिरात वाट बघत बसले. अधिकाऱ्यांनी तक्रार केली की, शिष्टाचाराचा भंग होतोय, तर भुजबळ ताडकन म्हणाले, 'मित्रांच्या कार्यक्रमात शिष्टाचार वगैरे काही नसतो'.

मुंडे आणि गडकरी आल्यावर भाषणाचा क्रम ठरवायचा विषय निघाला तर गडकरी म्हणाले, 'मी सर्वात ज्युनिअर आहे. मी पहिले बोलतो मग भुजबळसाहेब आणि शेवटी मुंडेसाहेब बोलतील.'

भुजबळ म्हणाले, 'नाही नितीन आता राष्ट्रीय अध्यक्ष आहेत ते सर्वात शेवटी बोलतील.'

मग ठामपणे मुंडे म्हणाले, 'तसं काहीही होणार नाही. मी आधी बोलतो, मग आमचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि शेवटी भुजबळसाहेब. नितीन माझ्याआधी बोलले तर वाईट मेसेज जाईल.' त्याचप्रमाणे मुंडे यांनी क्रम ठरवायला लावला आणि सर्वप्रथम

भाषण करताना मी पुस्तक वाचलेले नाही कारण बर्दापूरकरांनी त्यांच्या नागपूरच्या मित्राला (नितीन गडकरी) रीतसर आधी कळवले आणि मला मात्र ऐनवेळी. मात्र असे असले तरी बर्दापूरकर माझे मित्र आहेत असा टोला लगावत आणि कार्यक्रम औरंगाबादला होत असल्यानं मी गेस्ट नाही तर होस्ट आहे', अशी सुरुवात करून इतके खुसखुशीत आणि हजरजबाबी भाषण केले की सुरुवातीलाच कार्यक्रम एका उंचीवर जाऊन पोचला! मैत्री जपणे म्हणजे काय असते हे यानिमित्ताने मुंडे यांनी दाखवून दिले ते असे.

गोपीनाथ मुंडे माणसासारखे माणूस होते. त्यामुळे त्यांना राग-लोभ नव्हते असे म्हणणे योग्य ठरणार नाही. पत्रकारांनी केलेली जहरी टीका त्यांच्या जिव्हारी लागत असे तरी टीका करणाऱ्याला बोलून न दाखवण्याचा धोरणीपणा त्यांच्याकडे होता. टीकाकार जर जवळचा असेल तर हळूहळू त्याच्याशी असणारी सलगी ते काही दिवस कमी करत आणि हा एकतर्फी अव्यक्त राग ओसरला की पुन्हा उमदेपणाने त्याच्याशी वागायला सुरुवात करत. राजकारणातल्या विरोधकांना मात्र ते सरळ अंगावर घेत. सभागृहात तर मुंडे यांना ऐकणे हा एक अफाट अनुभव असायचा. सतत सभागृहात राहिल्याने संसदीय परंपरा, शिष्टाचार आणि नियम ते कोळून प्यायले होते. त्यामुळे ते अचानक केव्हा आणि कसा हल्ला करतील याचा अंदाज सत्ताधारी पक्षाला येत नसे. मुंडे सभागृहात असले की सत्ताधारी कायम सावध असत. युतीच्या सरकारात उपमुख्यमंत्री असलेल्या मुंडे यांच्या एका अर्थाने हाताखाली असणारे नारायण राणे मुख्यमंत्री म्हणजे मुंडे यांचे बॉस झाले, पण मुंडे यांनी ते अत्यंत खिलाडूपणे स्वीकारले. राजकारणात काहीही घडू शकते असा संदेशच त्यांनी काहीही न बोलता दिला. सेना-भाजप युतीच्या काळात गणपती दूध पिण्याची घटना गाजली आणि त्यावर मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी अतार्किक तसेच अवैज्ञानिक प्रतिक्रिया दिली. मुंडे काही अधार्मिक नव्हते पण मनोहर जोशी यांची प्रतिक्रिया न पटणारी आणिन रुचणारी होती. म्हणून त्यावर मुंडे यांनी टीका करण्याचा बेडरपणा दाखवला. पक्षात घुसमट झाली तेव्हाही कोणतीही तमा न बाळगता त्यांनी बंडाचे निशाण फडकावले. बंडखोरी त्यांच्या रक्तातच होती आणि ती बेडरपणे व्यक्त करण्याची जिगर त्यांच्यात होती.

मुंडे आणि घड्याळ यांचा काहीच संबंध नसे कारण त्यांचा अफाट जनसंपर्क. आलेल्या प्रत्येकाशी दोन वाक्ये तरी बोलण्याच्या अट्टहासाने दिवस सुरू झाल्यावर तासाभरातच काळ-काम-वेग


ग्रंथाली

**नुकतेच प्रसिद्ध झालेली पुस्तके...**




## तणावमुक्त जीवन

**तरुणांपुढील आव्हान**

**डॉ. पी.एस. रामाणी**


**मूल्य १३० रु.**
**सवलतीत ८० रु.**

डॉ. पी.एस. रामाणी यांनी सुबोध शैलीत लिहिलेले, आजच्या स्पर्धात्मक युगात आणि बदललेल्या जीवनशैलीत तरुणांनी त्यांच्यापुढे असलेल्या आव्हानांना सामोरे जाताना मनावर असलेला ताण कसा दूर करावा आणि आनंदी, समाधानी जीवन कसे जगावे याचा मंत्र देणारे हे पुस्तक...

जगातल्या सर्वोत्तम दहा न्यूरो स्पायनल सर्जनांमध्ये आपल्या अद्वितीय कौशल्याने स्थान मिळवलेले

डॉ. रामाणी विविध निमित्तांनी तरुणांशी संवाद साधत असतात. त्यांची ऊर्जा समजून घेतात आणि त्यांच्या मानसिक आंदोलनांचे निरीक्षण करतात. यातूनच त्यांनी तरुणांपुढील आव्हाने ओळखून केलेले हे मार्गदर्शन तरुणांना हितावह ठरेल.

## कथा माझ्या घडण्याची




**प्रभाकर राणे**

**मूल्य १६० रु.**
**सवलतीत १०० रु.**

गेल्या पिढीतील, शिक्षकीपेशाकडे उपजीविकेचा एक साधन अशा रीतीनं न पाहता; मुलांचं व्यक्तिमत्त्व घडवण्याची मिळालेली संधी अशा रीतीनं नोकरी करणाऱ्या शिक्षकाचं हे प्रांजळ आत्मनिवेदन आहे.

शिक्षकी पेशांत शिरणाऱ्या नव्या शिक्षकांना तर हे लेखन मार्गदर्शक आहेच, शिवाय विद्यार्थी, पालकवर्ग, शिक्षणाकडे आपुलकीनं पाहणाऱ्या प्रत्येकानं आणि शिक्षणविषयक धोरण ठोठावणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांनीही हे पुस्तक वाचावं अशी मी शिफारस करतो.

**– लक्ष्मण लोंढे**

यांच्याशी असलेले त्यांचे नाते संपुष्टात येत असे. ग्रामीण भागाची नस त्यांना सापडली ती या लोकसंग्रहातूनच आणि ते जनतेच्या भावजीवनाचे एक अंग बनले. नंतर या अट्टहासानेच ते लोकमान्य लोकनेते बनले. त्यामुळे राज्यात भारतीय जनता पक्षाचा अध्यक्ष कोण आहे हे दुय्यम ठरायचे. कारण पक्षाचा महाराष्ट्राचा चेहरा म्हणजे मुंडे हे समीकरण कायम झालेले होते. ते उपमुख्यमंत्री झाल्यावर तर माणसांचा राबता शतपट वाढला, खोटे नाही सांगत, त्याकाळात मुख्यमंत्र्यापेक्षा उपमुख्यमंत्री मुंडे यांच्याकडे जास्त गर्दी असे. मुंडे आणि घड्याळाचा तुटलेल्या संबंधाचा सर्वात जास्त त्रास प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना होत असे. बैठकांना मुंडे चार-सहा तास उशिरा पोचत आणि निगुतीने बैठक घेत कारण प्रदीर्घ काळ विरोधी पक्षात राहिल्याने पळवाटा चांगल्या ठाऊक होत्या. तपशीलाने ते त्रुटींवर बोट ठेवत, न दिसणाऱ्या चुका काढत. मग बैठकही तीन-चार तास चालत असे. अनेकदा या बैठकांत मूक (हा अलिखित करारच होता) साक्षीदार म्हणून मी सहभागी झालो आणि मुंडे यांचे प्रशासकीय ज्ञान अनुभवताना जाणत्या अधिकाऱ्यांची बोलती कशी बंद झाली हे पाहिले आहे. या उशिरा येण्याच्या सवयीने मुंडे यांना सनदी अधिकारी खाजगीत 'लेट लतीफ' म्हणू लागले. मुंडे यांचा दरारा असा की उघडपणे मात्र त्यांना लेट लतीफ कोणी म्हणत नसे. मुंबईहून माझी औरंगाबादला बदली झाली आणि मराठवाड्याच्या दूरवर भागातून दौऱ्याहून येणाऱ्या मुंडे यांच्यासाठी विमान कसे रोखून ठेवले जाते याच्या कथा कळल्या. एकदा तर मी तो अनुभवच घेतला आणि 'लेट लतीफ' मुंडे यांच्यामुळे विमान कसे रोखले, प्रवाशांची कशी गैरसोय झाली याची बातमी करून पाठवली. ती लोकसत्ताच्या पहिल्या पानावर आली आणि धम्माल उडाली! मुंडे जाम वैतागले असे दोन-तीन सहकारी म्हणाले. पण भेट झाल्यावर मुंडे जणू काहीच घडले नाही असे वागले. नंतर आम्ही दोघे कोठे एकाच व्यासपीठावर असलो तर आवर्जून वेळेवर येत आणि मग माझ्या फिरक्या काढत बसत. मुंडे यांच्यातला उमदेपणा राजकीय मतभेदांच्या सीमा पार करणारा होता. पक्षाच्याच नव्हे तर अडल्या-नाडल्या अनेकांना मदत करताना या माणसाने त्याची जात, धर्म किंवा राजकीय पक्ष बघितला नाही हे मला चांगले ठाऊक आहे. राजकारण आधी भाजपचे आणि मग बहुजनांचे पण धर्म माणुसकीचा असे आगळे मिश्रण गोपीनाथ मुंडे यांच्यात होते.

दिल्लीत आमच्या भेटी होत त्या प्रामुख्याने संसदेच्या प्रांगणात. दिल्लीच्या राजकारणाचा बाज काही त्यांच्या पचनी पडलेला नव्हता. गोडगोड बोलत खोटे बोलणे आणि पाठीमागून वार करणे हा गोपीनाथ मुंडे यांचा स्वभाव नव्हता. शरद पवार यांच्याविरुद्ध त्यांनी जो उघड पंगा घेतला त्याला तोड नाही आणि ही राजकीय 'जंग' त्यांनी या लोकसभा निवडणुकीपर्यंत जारी ठेवली. दिल्लीतील 'हांजी हांजी' राजकारण त्यांना मानवणारे नव्हते त्यामुळे कायम माणसांच्या गराड्यात रमणाऱ्या मुंडे यांना दिल्ली परकी वाटत असे आणि काम संपायच्या आतच त्यांना राज्यात परतायची घाई होत असे. त्यांचे सर्व लक्ष राज्यावरच होते. अशात नितीन गडकरी यांच्याशी असलेले त्यांचे पक्षांतर्गत शीतयुद्ध बरेच शमले होते. गडकरी यांना राज्याच्या राजकारणात रस उरलेला नाही याची खात्री त्यांना पटली होती. त्यामुळे लोकसभा निवडणूक लढवली तरी त्यांचे मन आणि हृदय महाराष्ट्रातच रेंगाळत होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा गोपीनाथ मुंडे यांना होती आणि ती फलद्रूप होण्याचे राजकीय संकेत मिळत असतानाच त्यांनी जगण्यातून कायमची एक्झिट घेतली आहे. एक व्हिजनरी, वादळी, बेडर राजकारणी आणि उमदा मित्र अशा गोपीनाथ मुंडे यांच्या मनावरील प्रतिमा कधीही पुसट होणार नाहीत...त्या अमीटच आहेत, अमीटच राहतील...

मुंडे आता हयात नाहीत आणि नितीन गडकरी महाराष्ट्रात परत येण्याच्या मन:स्थितीत नाहीत; शिवाय पक्षादेश म्हणून गडकरी राज्यात परतले तरी मुंडे गटाला ते स्वीकारार्ह राहणार नाहीत; गोपीनाथ मुंडे यांच्या अंत्यविधीच्या वेळी परळीत जो काही जनअसंतोष उफाळून आला किंवा 'आणला गेला' त्यातून हे सिद्ध झालेले आहे. सोशल साईट्सवर मुंडे यांच्या अपघाताबद्दल जी मोहीम चालवली गेली त्यामुळे मुंडे-गडकरी यांच्यातील मतभेदाची दरी सूक्ष्म झाली तरी कार्यकर्त्यांत मात्र ती अद्याप तशीच रुंदावलेली आहे हे पुरेसे स्पष्ट झालेले आहे; त्यामुळे गडकरी राज्यात परत येण्याची शक्यता पक्षादेश म्हणूनही धूसरच आहे. आता विनोद तावडे, सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस यांच्यापैकी कोणावर पक्षाचे नेतृत्व सोपवले जाते की महादेव शिवणकर, पांडुरंग फुंडकर अशी काही जुनीच नाणी पुन्हा चलनात आणली जातात, की मुंडे यांच्या 'जुळवणी योजने'तील एखादे नवीन नाव अनपेक्षितपणे पुढे येते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. यात एकनाथ खडसे यांचे नाव नाही हे बघून काहींना आश्चर्य वाटेल पण दिल्लीत मुंडे-गडकरी यांच्यानंतर पक्ष पातळीवर फडणवीस, मुनगंटीवार आणि तावडे हीच तीन नावे येतात हे लक्षात घेतले पाहिजे. मुंडे यांची कन्या पंकजा यांच्यासह मुंडे यांचा वारसदार म्हणून जी नावे घेतली जात आहेत त्यांना गोपीनाथ मुंडे यांच्यासारखे बहुआयामी नेतृत्वगुण सिद्ध करण्यासाठी वेळ द्यावा लागेल. भाजपच्या महाराष्ट्राच्या क्षितिजावर नवा 'गेम चेंजर' तयार होईपर्यंत महाराष्ट्र भाजपची सूत्रे दिल्लीतूनच हलतील असे आता तरी दिसत आहे.

**– प्रवीण बर्दापूरकर**
एफ १२ , चाणक्यपुरी , फेज १,
शहानुरमिया दर्गा रोड,
औरंगाबाद ४३१००५
भ्रमणध्वनी : ९८२२०५५७९९
praveen.bardapurkar@gmail.com

## भगवान इंगळे यांच्या पुस्तकांच्या सुधारीत आवृत्त्या




आयुष्याच्या विविध टप्प्यांवर मला जे मित्र भेटले, त्यांच्या जीवनातील भयाण वास्तवामुळे अस्वस्थ झालो. काही वेळा प्रभावित झालो. अशा भिडूंची ही जीवनकहाणी!
(लेखकाच्या मनोगतातून)

# भिडू

**मूळ किंमत २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

मेलेल्या जनावरांचं कातडं चुना लावून, साल-हिरड्याच्या कसात टाकून महिना-सव्वा महिना ऊर फुटेस्तो घाम गाळून रंगविल्यास मऊ, मुलायम, टिकाऊ होतं आणि मोटा, सोंडा, चाबूक, गोफण, आसूड, बूट-चपलांच्या कामी येतं... कातडी कमावण्याचं हे काम करतो तो ढोर समाज. दुसरीकडे ढोर समाजातला एक गट शिकला आणि स्थिर झाला. अशाच एका तरुणाची ही प्रातिनिधिक कहाणी.




# ढोर


**मूळ किंमत ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

**रांगोळी**
**मूल्य १८० रु.**




**संस्कार, संगोपन, संस्कृती आणि संवाद साधणारी**

**अनुराधा गांगल यांची चार पुस्तके**




**संस्कार**
**मूल्य ६० रु.**


**४२० रुपयांचा संच घरपोच २५० रुपयांत!**




**बाळाची चाहूल**
**मूल्य ६० रु.**




**भारती सृष्टीचे...**
**मूल्य १२० रु.**



# लोकजेता गोपीनाथ मुंडे

**सुभाषचंद्र मयेकर**

डोक्यावर भव्य भगवा फेटा, त्यावर सुंदर लहरी असलेला तरतरीत तुरा, धाडधाड चालण्याची वेगळी रांगडी तऱ्हा, ग्रामीण पण हसरा चेहरा, चपखल आणि धारदार शब्दांच्या मुसळधारा असं एक उत्तुंग राजबिंडं व्यक्तिमत्त्व असलेली वादळी राजकीय व्यक्ती मी १९९० साली अगदी जवळून पाहिली आणि त्यानंतर त्यांचा सचिव म्हणून जवळून अनुभवली, ती म्हणजे गोपीनाथ मुंडेसाहेब. खरं तर, मुंडेसाहेबांच्या नावापूर्वी 'कैलासवासी' वा 'स्वर्गवासी' असं लिहून घेण्यास साक्षात ते शब्ददेखील तयार नाहीत. असा अगदी जिवंत, कायमचा जिवंत चेहरा लोकांसमोर ठेवून मुंडेसाहेब हे जग सोडून गेले आहेत. 'घात' आणि 'अपघात' या जीवघेण्या गोष्टींशी अनेक वर्षं जणू घनिष्ट नातं होतं की काय, असं गेल्या अनेक वर्षांपासूनच्या त्यांच्या संघर्षमय जीवनावरून लक्षात येतं.

१९९१ साली छगन भुजबळ शिवसेना सोडून गेल्यानंतर नंबरगेम बदलल्यामुळे शिवसेनेकडे असलेलं विरोधी पक्षनेतेपद गोपीनाथ मुंडे यांच्याकडे चालत आलं. पहिले काही दिवस शिवसेना-भाजपामध्ये रुसवे-फुगवे झाले खरे, परंतु पुढे मुंडेसाहेबांच्या दैदिप्यमान कारकिर्दीमुळे ते रुसव्या-फुगव्यांनी फुगलेले फुगे फुटले आणि नियतीनं पहिली विजयश्री मुंडेसाहेबांच्या गळ्यात घातली ती म्हणजे अखिल भारतीय विरोधी पक्षनेता परिषदेचं अध्यक्षपद. हे पद त्यांनी भूषवावं म्हणून देशातील सर्व राज्यांतील विरोधी पक्ष नेत्यांनी गळ घातली. ही परिषद रमाकांत खलप, गोवा विधानसभेचे त्यावेळचे विरोधी पक्षनेते यांनी पणजीमध्ये आयोजित केली होती. २० राज्यांतील विरोधी पक्षनेते या परिषदेला आले होते. उद्घाटन सकाळी ९ वाजता झालं. परिषदेत अनेक नेत्यांची भाषणं झाली. त्यामधील एका नेत्याचं नाव होतं श्री. संपत. भोजनापूर्वीचे ते शेवटचे वक्ते होते. त्यांचं भाषण संपतच नव्हतं. भोजनाची वेळ झाली होती, सर्व विरोधी पक्षनेते भुकेनं व्याकुळ झालेले दिसत होते. मुंडेसाहेबांचं भाषण दुसऱ्या सत्रात होतं आणि ते ऐकण्यासाठी सर्व विरोधी पक्षनेते मंडळी आतुर होती. भोजनाची वेळ टळून गेली होती तरीही श्री. संपत हे आपल्या भाषणाला आताच कुठे सुरुवात झाली आणि खूप मुद्दे बोलायचे आहेत असं संदर्भ देत देत भाषण रेटत होते, आटोपतं घेत नव्हते. अशावेळी लोकांची मनं ओळखणाऱ्या मुंडेसाहेबांनी लोकप्रतिनिधींचं प्रतिनिधित्व करणाऱ्या विरोधी पक्षनेत्यांची मनं ओळखली नसती तरच नवल. म्हणून ताबडतोब हस्तक्षेप करून ते अस्सल मराठी भाषेत उद्गारले, ''अहो श्री. संपत, तुमचं भाषण काय संपत नाही बुवा! आता नेमून दिलेली जेवणाची वेळदेखील संपत आली आहे. तुमचं भाषण संपवा आणि अजेंड्यावरील इतर कामंही करूया.'' त्यांच्या बाजूला बसलेले रमाकांत खलप हे महाराष्ट्राचा छोटा भाऊ असलेल्या गोव्याचे असल्यामुळे त्यांना ते चटदिशी समजलं आणि त्यांनी मुंडेसाहेबांच्या सहज आणि मिश्किल विधानांना गालात हसून उत्तम दाद दिली. गोव्यातील इतर अधिकारीही मराठी भाषा जाणत असल्यानं थोडीशी खसखस पिकली. मात्र हा विनोद उपस्थित वीस राज्यांतील विरोधी पक्षनेत्यांना समजला नव्हता. मुंडेसाहेबांनी त्यांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह पाहिलं म्हणून केलेली विधानं आणि 'संपत' या मराठी शब्दाचा अर्थ शुद्ध हिंदी भाषेत भाषांतर करून सांगितला आणि मोठ्ठा हंशा पिकला. मग सगळे विरोधी पक्षनेते त्या विनोदात साफ बुडून गेले आणि मग काय, संपत यांनी आपलं भाषण संपलं असं चक्क जाहीर केलं. सांगायचं तात्पर्य एवढंच, की मुंडेसाहेबांच्या स्वभावाला विनोदशैलीची उत्तम किनार लाभली होती. श्रोत्यांच्या मनाचा ते अगदी ठाव घेत असत. त्यानंतर मुंडेसाहेबांनी देशातील उपस्थित सर्व विरोधी पक्षनेत्यांना संबोधून केलेलं भाषण अप्रतिम झालं. ते म्हणाले, ''भारतीय राज्यघटनेनं, लोकांची गाऱ्हाणी मांडण्यासाठी, ती सोडवण्यासाठी संसदीय

लोकशाहीत लोकप्रतिनिधींची व्यवस्था केलेली आहे. मात्र लोकप्रतिनिधी आणि विरोधी पक्षनेता यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आणि सोडवण्यासाठी अखिल भारतीय विरोधी पक्षनेता परिषद हे एक आश्वासक व्यासपीठ आहे. ह्या परिषदेची सांगता झाल्यावर मी स्वत: भारत सरकारच्या संसदीय कार्यमंत्र्यांना भेटून मार्ग काढण्याचा प्रयत्न करेन.'' त्यावर टाळ्यांचा कडकडाट होणं स्वाभाविक होतं. दुसऱ्या दिवशी सांगता समारंभात एका विरोधी पक्षनेत्यानं चहापानाच्या वेळी, ''मुंडेसाहेब, महाराष्ट्र का नेता तो है ही मगर इनके उत्तम नेतृत्वगुण, संगठनशक्ती और सहज भाषणशैली से यह पता चलता है की, यह महाराष्ट्र का नेता भारत सरकार में एक दिन जरूर नेतृत्व करेगा।'' बघ ना, १९९३ साली एका परराज्यातील विरोधी पक्षनेत्याच्या मुखातून निघालेली ही वाणी खरीच झाली, जेव्हा मुंडेसाहेबांनी ग्रामीण विकासमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांच्या सरकारात शपथ घेतली. परंतु नियतीच्या मनात काही वेगळंच दडलं होतं.

लोकांच्या अडीअडचणींवर औषध शोधणारे आणि त्या सोडवण्यासाठी नाना उपचार करणारे मुंडेसाहेब यांचं स्वत:च्या आरोग्याकडे, स्वत:कडे फारसं लक्ष नसायचं. देवानं जगात धाडलेला हा माणूस खरंच तो देव सांभाळायचा. अनेक अपघातांतून ते बालंबाल बचावले, अनेक घात झाल्यानंतरही तावूनसुलाखून निघाले आणि सावरले, हे आपणा सर्वांना माहीत आहे, परंतु ३ जून, २०१४ रोजी तसं झालं नाही.

पंचेचाळिशी ओलांडलेल्या मुंडेसाहेबांना वाचताना चष्मा लागला आणि धावपळीचं आणि दगदगीचं आयुष्य असल्यामुळे रक्तदाबाचाही त्रास सुरू झाला. एक दिवस दौऱ्यावर असताना मुंडेसाहेब खूप चिडले होते. जोरजोरात बोलत होते. चिडचीड, राग हा मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी कधी अनुभवला नव्हता. दरम्यान वहिनींचा विश्रामगृहावर फोन आला होता. साहेबांना फोन देण्यापूर्वी त्यांचा मोठा आवाज वहिनींनी फोनवरून ऐकला आणि मला म्हणाल्या, ''साहेबांनी बी.पी.ची गोळी घेतली नसावी. वाचायला चष्मा त्यांना सापडला नसावा.'' तेव्हा मी चटकन त्यांच्या बॅगमधील सिप्रिल १.५ ही बी.पी.ची गोळी आणि चष्मा १.५ साहेबांना दिला आणि १०-१५ मिनिटांत साहेब शांत झाले. वहिनी फोन करून नेहमी काळजी घेत आणि वहिनींच्या म्हणण्यानुसार दौऱ्यावर जाण्यापूर्वी मी त्यांच्या बी.पी.च्या गोळ्या आणि ५-६ चष्मे बॅगेतून घेऊन जायचो. ५-६ चष्मे यासाठीच की बैठकीत साहेब टेबलवर चष्मा हमखास विसरायचे आणि पुढल्या कामात किंवा प्रवासात गोंधळ नको म्हणून हे काम मी करायचो. माझ्या या कामात माझे स्नेही मधु खोत, प्रदीप दिघे, शाहू गुरव, वाहनचालक, बाळू किरवे आणि श्रीकांत कोलते मला मदत करायचे.

महाराष्ट्र विधानसभेला १९८० ते ९० या दशकांत प्रदीर्घ काळासाठी विरोधी पक्षनेता लाभला नव्हता. मनोहर जोशी हे देखील पावणेदोन वर्षांच्या कालावधीसाठी विरोधी पक्षनेते होते. त्यानंतर मुंडेसाहेब हे डिसेंबर, १९९१ ते मार्च, १९९५ असे सव्वातीन वर्षं विरोधी पक्षनेते होते. डिसेंबर, १९९१ ते मे, १९९२ हा मुंडेसाहेबांचा पहिल्या ६ महिन्यांचा कालावधी त्यामानानं संथगतीचा होता. त्यानंतर मात्र विधानसभेनं त्यांचा झंझावातच सतत अनुभवला. मंत्र्यांची अनेक प्रकरणं त्यांनी उघडकीस आणली. अर्थसंकल्पावरील भाषणं अर्थतज्ज्ञासारखी आकडेवारीसह सादर करून ते धमाल उडवत. मुंडेसाहेबांची प्रस्तावावरील भाषणं ऐकण्यासाठी सभागृह गच्च भरलेलं असायचं. मुंडेसाहेब कोणत्या मंत्र्यांना लक्ष्य करतात याकडे आमदारांचं लक्ष असे. बोलता बोलता चिमटे काढणं, नर्मविनोदाची पखरण करून खसखस पिकवणं, कोपरखळ्या मारून अप्रत्यक्ष हल्लाबोल करणं, मुद्यांवर बोट ठेवून सरकारकडे लोकांसाठी आग्रहीपणानं भांडत राहणं, मुद्दा निर्णय होईपर्यंत रेटत राहणं ही त्यांच्या भाषणातील ठळक वैशिष्ट्यं होत. कायदा व सुव्यवस्था आणि ग्रामीण भागातील समस्या हे साहेबांचे अगदी आवडीचे विषय. ते मराठवाड्यातील असल्यामुळे राज्याचं प्रतिनिधित्व करत असले तरी आपल्या मूळ प्रांताशी म्हणजे बीड, मराठवाडा याचा विकास याबाबतही सभागृहांत व बाहेर दक्ष असत. हातात कागद न घेता केवळ जबरदस्त स्मरणशक्तीच्या बळावर ते लीलया बोलत. त्यांची शब्दफेकही खूप चांगली होती. आवाजात दमदारपणा आणि चढउतार होता. १९९०-९५ या काळातील आठव्या विधानसभेतील १९९३मधील बॉम्बस्फोट, दंगल आणि नागपूर येथील १९९४ सालचे गोवारी हत्याकांड या विषयावरील झालेली भाषणं अतिशय आक्रमक आणि हृदय हेलावून टाकणारी होती. १९९३ मध्ये जिवाची पर्वा न करता त्यांनी कुर्ला, बेहरामपाडा, नागपाडा, भेंडीबाजारमधील इमामवाडा येथील दंगलग्रस्त भागांना भेटी देऊन भीतीच्या सावटाखाली असलेल्या लोकांना दिलासा दिला. त्यावेळी मी साहेबांसोबत होतो. त्यांनी डिसेंबर, १९९४ मध्ये सरकारच्या विरोधात मांडलेल्या अविश्वास प्रस्तावावरील भाषण खूपच गाजलं आणि सभागृहावर व सभागृहाबाहेर जनमानसावर परिणाम करून गेलं.

या ठिकाणी आवर्जून उल्लेख करण्यासारखी बाब म्हणजे मुंडेसाहेबांनी १९९४ मध्ये राज्यभर केलेली नव्हे; राज्य पिंजून काढलेली संघर्षयात्रा. या संघर्षयात्रेद्वारे साहेब संपूर्ण राज्यात खेडोपाडी पोचले ते त्यांची अमोघ वाणी आणि विचारांसह. इतर सहकाऱ्यांशी कोणते विषय संघर्षयात्रेत घ्यायचे याबाबत सल्लामसलतही केली. सल्लामसलत हा एक चांगला गुण त्यांच्यात होता. या यात्रेचं आयोजन, नियोजन प्रदेश कार्यालयानं केलेलं. त्यामध्ये शरदभाऊ कुलकर्णी, अतुल भातखळकर, प्रवीण टेंभेकर, जयसिंगराव गायकवाड, नाईक, विवेक मैत्रा, मुकुंद (छोटा) कुलकर्णी इत्यादींचा मोठा, सक्रिय सहभाग होता. रोज ४-५ सभा होत. ३०० ते ३५० कि.मी. एवढा गाडीचा प्रवास होत असे. रात्री देखील गाडीनं प्रवास होत असे. कामाचा खूप ताण असायचा. दुपारचं जेवण संध्याकाळी आणि रात्रीचं जेवण मध्यरात्रीनंतर

मुक्कामी पोचल्यावर. साहेबांची लाल दिव्याची गाडी आणि विश्रामगृहातील खोली ओव्हरलोड म्हणजे गच्च भरलेली असायची. एवढे निस्सीम जिवापलीकडे कार्यकर्ते प्रेम करत असत. त्यांच्या दारासमोर चपलांचा ढीग असायचा. काही लोक तर त्यावरून चालताना अडखळून पडायचे एवढी प्रचंड गर्दी असायची. विनोद तावडे हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष व त्यानंतर मुंबई भाजपाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना मुंडेसाहेबांना ते आवर्जून भेटत व सल्लामसलत करत. तेव्हा एकदा मुंडेसाहेब म्हणाले, ''मयेकर, विनोद एक हुशार आणि नेतृत्वगुणांची क्षमता असलेला तरुण आहे. पुढे तो पक्षात आणि समाजात उत्तम कामगिरी बजावेल.'' आणि ते खरं ठरलं की, विनोद तावडे हे सध्या विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपदाची धुरा सांभाळत आहेत.

मुंडेसाहेब विरोधी पक्षनेते असताना कधी पंचतारांकित हॉटेलमध्ये उतरल्याचं मला स्मरत नाही. ते शासकीय विश्रामगृहावर उतरत. जाहीर सभांना मुंडेसाहेब उशिरा पोचतात असं सगळेच म्हणत असत. असं म्हणणाऱ्यांच्या म्हणण्यात तथ्य असलं तरी काम घेऊन त्यांच्यासमोर उभ्या ठाकलेल्या असंख्य लोकांची गाऱ्हाणी ऐकण्याचं व संबंधितांना फोन लावून ती सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचं 'पथ्य' ते पाळत असत. याच कारणास्तव ते सभेला उशिरा पोचत. सभा संपल्यानंतर मुंडेसाहेब मैदानातल्या मंडपात सर्व कार्यकर्त्यांसोबत जेवत असत. प्रसंगी ते मातीत अंथरलेल्या सतरंजीवर चक्क मांडी घालून जेवत असत.

शरद पवारसाहेब भारताचे संरक्षणमंत्री झाल्यानंतर सुधाकरराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्याच दरम्यान गोपीनाथ मुंडे हे विरोधी पक्षनेते झाले होते. मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता म्हणजेच शॅडो कॅबिनेटचे सी.एम. या लोकशाहीतल्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचं या दोघांच्या कामगिरीवरून लक्षात येत होतं. या दोघांमध्ये सुसंवाद होता. या दोघांची फोनाफोनी सतत चालू असे. सुधाकरराव नाईक हे वंजारा समाजाचे आणि मुंडे हे वंजारी समाजाचे. वंजारी समाजाचा लढा सुरू होता. शिक्षणात, नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळावं अशी त्या समाजाची मागणी होती. मुंडेसाहेबांनी समाजाची मागणी मुख्यमंत्र्यांकडे उत्तम पाठपुरावा करून मांडली आणि ती मान्य करण्यास भाग पाडलं.

राजकारणाचं गुन्हेगारीकरण हा विषय १९९१ नंतर ऐरणीवर आला होता. वर्तमानपत्रातून, मासिकं, नियतकालिकं यातून लेखांच्या मालिका सुरू झाल्या. या सगळ्या गोष्टींमुळे मुंडेसाहेब अस्वस्थ झाले होते आणि त्यांनी राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावर रोखठोक भाष्य करण्यास सुरुवात केली. कुख्यात डॉन दाऊद इब्राहिम याला आमची सत्ता आल्यास फरफटत भारतात आणू असंही धाडसी विधान केलं.


परभणी दौऱ्यावर असताना वाटेत मध्यरात्रीच्या सुमारास मोठमोठे दगडधोंडे टाकून रस्ता अडवल्याचं दिसलं. अंगरक्षक आणि वाहनचालक हे ते दगड उचलून रस्ता मोकळा करण्यासाठी वाहनातून खाली उतरले तेवढ्यात लाल दिव्याच्या गाडीवर दगडफेक झाली. मुंडेसाहेबांवर हल्ला होत आहे, हे महाजन नावाच्या अंगरक्षकानं ओळखलं आणि प्रसंगावधान दाखवून पिस्तुलातून हवेत फेरी झाडल्या. दगडफेक थांबली. मुंडेसाहेबांना फोनवरून धमक्या येऊ लागल्या. या धमक्यांबाबत जेव्हा चिंता व्यक्त केली जायची, त्यावेळेस अशा धमक्यांना मी भीक घालत नाही असं निर्भीडपणे ते बोलत असत. तरी सरकारनं याप्रकरणी दखल घेतली आणि त्यांच्या पोलिस बंदोबस्तात वाढ करून वाय टाइप सुरक्षा देण्यात आली.

परम आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या झंझावातामुळे आणि मुंडेसाहेबांच्या अथक परिश्रमामुळे युतीचं सरकार १९९५ साली महाराष्ट्रात सत्तारूढ झालं. मुंडेसाहेब राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. या काळात त्यांच्याकडे गृहखातं होतं. अर्थ, ऊर्जा आणि इतर खातीही त्यांनी सांभाळली. ते गृहखातं सांभाळत असताना त्यांनी राज्यातील गुन्हेगारी उपटून फेकून दिली. संघटित गुन्हेगारी थोपवण्यासाठी त्यांनी मोक्का नावाचा कायदा आणला. पोलिस आणि त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम सोयीसुविधा पुरवल्या.

मुंडेसाहेब हे कुठलीही खोटी प्रतिष्ठा कुठेही पणाला लावणाऱ्यांपैकी नव्हते. परोपकार, प्रसंगी आऊट ऑफ द वे जाऊन मदत करणं हा त्यांचा एक स्वभाव होता. 'खतरनाक' नावाचं एक साप्ताहिक काळाचौकी येथील कामगार विभागात राहणारे खानोलकर चालवत. ते स्वत: संपादक होते. खतरनाक या नावाप्रमाणेच त्यांची लेखणी खतरनाक होती. मुंबईतील एकूण गुंडशाहीबद्दल ते सडेतोड लिहीत आणि खतरनाक गुंड अंगावर घेत. गुंडगिरीच्या विश्वाबद्दल लिहिणं बंद करा अन्यथा जिवे मारू अशा धमक्या त्यांना येऊ लागल्या तरीसुद्धा निर्भीड पत्रकारितेचं ब्रीद खानोलकर यांनी सोडलं नाही. म्हणून एक दिवस त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. त्यात ते गतप्राण झाले. खानोलकरांचं कुटुंब उघड्यावर पडलं. चार ते दहा या वयोगटात असलेल्या दोन मुली व एक मुलगा अशी जबाबदारी श्रीमती खानोलकर यांच्यावर आली. राहायला स्वत:चं घर नव्हतं म्हणून त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या दहा टक्के कोट्यातून घर मिळावं यासाठी अर्ज केला होता. परंतु त्यावर काही निर्णय होत नव्हता. एक दिवस त्या आपली कैफियत मांडायला मुंडेसाहेबांच्या जनता दरबारी आल्या. ओळख नव्हती. त्यात पतीचं दु:खद निधन झालेलं. कोवळ्या मुलांची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येऊन पडलेली. त्यामुळे भयभीत झालेल्या त्यांना आपली कैफियत मांडता येईना. मग मी समजावून सांगितलं. मुंडेसाहेबांनी ताबडतोब मुख्यमंत्र्यांना फोन लावला. जीव धोक्यात घालून लिहिणाऱ्या पत्रकाराच्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडून चालणार नाही, असा युक्तिवाद केला. एवढंच नव्हे तर दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्र्यांसोबत असलेल्या बैठकीत ते पत्र स्वत: घेऊन गेले आणि एका दिवंगत पत्रकाराच्या कुटुंबाला त्यांनी न्याय मिळवून दिला.

एका खेडेगावातून पाच वर्षांच्या मुलीला घेऊन तिचे आई–वडील विधानभवनात आले होते. मुलीला मेंदूचा आजार होता.

## प्रकाशनाच्या वाटेवर
# रवींद्र शोभणे यांची नवी बृहद्कादंबरी...




इंदिरा गांधींची नृशंस हत्या ते राजीव गांधींचा भीषण शेवट या राजकीय घटनांच्या दरम्यान आपल्या समाजात काय काय घडत होतं ?... माणसामाणसातील नातेसंबंधांतील दुरावा... राजकीय माणसांमधील जीवघेणी सत्तास्पर्धा आणि त्या सत्तास्पर्धेत होणारी अवघ्या मूल्यांची होळी... सामाजिक क्षेत्रात येऊ पाहणारा कोरडेपणा... शिक्षणाच्या नावावर होऊ पाहणारी धंदेवाईक स्पर्धा... शिक्षणसम्राटांचा उदय... कलेच्या प्रांतातला आटत जाणारा भावनिक ओलावा... तकलादू यशासाठी केली जाणारी घृणास्पद तडजोड... आणि या सगळ्यातून माणसांचं कोसळणं, उद्ध्वस्त होणं, पुन्हा उठून उभं राहणं आणि अवतीभवती होऊ पाहणारी पडझड, मूल्यांची होळी उघड्या डोळ्यांनी पाहण्याची त्याच्या वाट्याला आलेली हताशा...

माणसाचं आणि काळाचं नातं जोडत मोठ्या कालपटावरील वाचकांना हलवून सोडणारी, अंतर्मुख करणारी, जीवनदर्शनाचा प्रचंड आवाका आपल्या कवेत घेणारी बृहद्कादंबरी...

पडघम या गाजलेल्या, जाणकारांनी वाखाणलेल्या कादंबरीचा पुढील भाग

पृष्ठसंख्या : ७२८ + १६
मूल्य रु. ६००/-

आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी
Click करा-
www.majesticonthenet.com या साईटवर
Customer care No. 022-65666755

प्रमुख विक्रेते : मॅजेस्टिक बुक स्टॉल। गिरगाव । पुणे । मो. ९९२२३४४०८१
मॅजेस्टिक बुक डेपो। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५
मॅजेस्टिक ग्रंथदालन । शिवाजी मंदिर, दूरध्वनी : ९८२२२०२३९

मॅजेस्टिक
पब्लिशिंग हाऊस

त्यावर शस्त्रक्रिया करायची होती. मुंडेसाहेबांच्या प्रयत्नांमुळे त्या मुलीच्या शस्त्रक्रियेसाठी शासनाकडून आणि सेवाभावी संस्थांकडून मदत म्हणून काही रक्कम मिळाली होती. परंतु ती पुरेशी नव्हती. शस्त्रक्रियेसाठी अजूनही २५ हजार रुपये कमी पडत असल्याचं मुलीच्या आई-वडिलांनी सांगितलं आणि कागदपत्रंही दाखवली. दुपारचे चार वाजले होते. स्टेट बँक ऑफ इंडियाचं व्यवहार करणारं कार्यालय बंद होण्याची ती वेळ होती. त्याच वेळेस मुंडेसाहेब मला म्हणाले, ''मयेकर, या मुलीच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेले २५ हजार रुपये आणि पुढील औषधांसाठी १५ हजार रुपये असे मिळून एकूण ४० हजार रुपये बँकेतून काढा.'' मला सांगितल्यानंतर, 'साहेब, बँक बंद झाली असावी.' असं मी बोललो आणि साहेब ताडकन उठले आणि थेट मला बँकेत घेऊन गेले. बँकेचे अधिकारी, कर्मचारी आवराआवर करत होते. त्यांची व्यवहाराची आकडेमोड सुरू होती. मुंडेसाहेब म्हणाले, ''मी गोपीनाथ मुंडे, विनंती करण्यासाठी आलो आहे. बँकेच्या कामकाजाची वेळ संपली आहे हे मला माहीत आहे, परंतु एका गरीब कुटुंबाला मदत करायची आहे, म्हणून मला ४० हजार रुपये माझ्या खात्यातून द्या.'' मुंडेसाहेबांना साक्षात प्रकट झाल्याचं पाहून कर्मचारी, अधिकाऱ्यांना धक्का बसला. त्यांनी ताबडतोब ४० हजार रुपये मुंडेसाहेबांच्या हाती दिले. ती रक्कम मुलीच्या उपचारासाठी तिच्या माता-पित्यांना लगेच सुपूर्द केली. खरं तर मुंडेसाहेबांना कोणालाही फोन करून ते पैसे मागवता आले असते किंवा फोन करून बँकेत सांगता आले असते. तसं मुंडेसाहेबांनी केलं नाही हेच मुंडेसाहेबांचे विशेषत्व आहे.


सोलापूर येथून म्हणजेच कर्नाटक सीमेलगत राहणारे एक वयोवृद्ध स्वातंत्र्यसैनिक साहेबांना भेटायला सागर या शासकीय बंगल्यावर आले होते. त्यांना स्वातंत्र्यसैनिक म्हणून पेन्शन मंजूर होत नसल्याची तक्रार होती. त्यांनी आपला अर्ज पुढे केला आणि टिपिकल सोलापुरी भाषेत म्हणाले, ''साहेब्ब, सोलापूरच्या कलेक्टरानं माझ्या प्रकरणाची मुंबईला वाट लाविली की ओ आणि मुंबईत सचिव स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समितीनं ते प्रकरण आणखी कुठे पुढे वाट लावू नये म्हणून त्यांनी या प्रकरणाचे आताच काय ते बरेवाईट करावे म्हणून फोन लावा की ओ तुम्ही साहेब्ब.'' मी मुंडेसाहेबांकडे पाहिलं आणि त्यांनीही माझ्याकडे पाहिलं. प्रकरणाची वाट लाविली या शब्दाचा अर्थ एक सुभाषी, दुभाषी म्हणून नव्हे, मी साहेबांना सांगितला तो असा की, प्रकरणाची वाट लावली म्हणजे प्रकरण मार्गस्थ केलं म्हणजे पुढे पाठवलं असा आहे. त्यावर मुंडेसाहेब गालातल्या गालात हसले आणि मला म्हणाले, ''मला कळलं हो, पण तुम्हाला कळलं की नाही हे मी तुमच्या चेहऱ्यावर वाचत होतो.'' चेहरा वाचणं आणि महाराष्ट्रातली प्रत्येक बोलीभाषा जाणणं यात मुंडेसाहेब निष्णात होते. मुंडेसाहेबांनी ताबडतोब फोन लावून अधिकाऱ्यांना बोलावलं आणि ते काम करवून घेतलं. गेली अनेक वर्षं पेन्शनपासून वंचित राहिलेल्या एका स्वातंत्र्यसैनिकाला मुंडेसाहेबांनी न्याय मिळवून दिला.

रात्रीचे जेव्हा आम्ही प्रवास करायचो त्यावेळी साहेब गतस्मृतींना उजाळा देत, तर कधी आपण संसारी असलो तरी राजकारणात असल्यामुळे घरच्यांकडे लक्ष देता येत नाही याची खंत बोलून दाखवत व क्षणांत हळवे होऊन पुन्हा भानावर येत. ते वसंतराव भागवत, प्रमोद महाजन यांच्याविषयी कृतज्ञतापूर्वक व जिव्हाळ्यानं बोलायचे. आम्ही एकदा गोवा दौऱ्यावर गेलो होतो. त्यावेळी वहिनी आणि साहेबांची धाकटी लेक यशश्री- लाडानं तिला येशू म्हणतात - आल्या होत्या. दिवसभराचा कार्यक्रम सांगण्यासाठी मी तिथे गेलो होतो. मी बाहेरून आवाज दिला. साहेबांनी आत या म्हटलं. खोलीत प्रवेश केल्यानंतर मी पाहिलं साहेबांच्या पाठीवर अडीच वर्षांची येशू आरुढ होऊन घोडा घोडा खेळत होती! मी चटकन पाय बाहेर काढले. मला म्हणाले, ''अहो, मयेकर लाजू नका. मला वेळ देता येत नाही कुटुंबाला म्हणून येशू खेळते आहे'' आणि चक्क १० मिनिटं साहेब आणि येशू त्या खेळात रमले होते. एकदा बीड दौऱ्यावर असताना साहेबांनी अचानक आपली गाडी दुसरी मुलगी प्रीतम हिच्या शाळेकडे उलट दिशेनं न्यावयास सांगितली. साहेब भावनाविवश झाले होते. त्यांनी प्रीतमला बरेच दिवस पाहिलं नव्हतं. शेवटी बापलेकीची भेट झाली आणि मुंडेसाहेबांचा चेहरा सुंदर खुलला. पंकजा, लाडानं पंकूविषयी, साहेब सांगायचे, ''माझी ही थोरली लेक खूप समंजस आणि सगळ्यांची मनं आणि मला सांभाळणारी आहे.'' आणि हे खरंही आहे. पंकजाताई आता आमदार आहेत आणि यापुढे साहेबांचा वारसा त्या चालवणार असून लोकसेवेची धुरादेखील समर्थपणे सांभाळणार आहेत.

कुटुंबवत्सल, राजकारणातला उस्ताद आणि वस्ताद, हळवा, प्रसंगी कणखर, समंजस तर कधी अतिशय आग्रही, पायाला भिंगरी लावून गोरगरिबांसाठी, समाजासाठी, राज्यासाठी झटलेल्या, झपाटलेल्या आणि आता कुठे देशसेवेसाठी सज्ज झालेल्या व त्यासाठी दाही दिशा वणवण भटकंती करू इच्छिणाऱ्या महानेत्याच्या जाण्यानं जबरदस्त धक्का बसलाय.

अशी माणसं केव्हातरी जन्म घेतात आणि पराकाष्ठेतून तयार होतात. मी त्यांच्यासोबत अहोरात्र साडेतीन वर्षं फिरलो असल्यानं साडेतीन शक्तिपीठाची ताकद असलेल्या आपल्या या महान नेत्याच्या जाण्याला कोटी-कोटी प्रणाम!

**- सुभाषचंद्र मयेकर**
२ बी-३०३, श्री गणेशनगर,
को.ऑ.हौ.सो.लि. लालबाग मार्केट,
लालबाग, मुंबई-४०००१२
bhai.mayekar@rediffmail.com



विज्ञान विलोल

# जगद्व्यापी जालकाच्या जाळ्यात

**सुधीर थत्ते**

अलिकडेच सॅन फ्रान्सिस्कोला झालेल्या ॲपल विकासकांच्या जागतिक परिषदेमध्ये 'होमकिट' आणि 'हेल्थकिट' या दोन नव्या आकर्षणांची घोषणा करण्यात आली. यातले होमकिट तुमच्या भ्रमणध्वनीवरून (मोबाईल) तुमच्या घरातल्या सर्व स्वयंचलित उपकरणांचे नियंत्रण करण्यास मदत करणार आहे, तर हेल्थकिट तुमच्या तब्येतीची सर्व काळजी वाहणार आहे. होमकिट, हेल्थकिट, तसेच तुमच्या घराचे आणि शरीराचे मापन, विश्लेषण आणि नियंत्रण करणारी सर्व स्वयंचलित उपकरणे तुम्ही बसवून घ्यायची. मग जगद्व्यापी जालकाच्या (वर्ल्डवाईड वेब) माध्यमातून सतत सज्ज असणाऱ्या सेवांच्या नंदनवनातच तुम्ही जणू आला आहात असे तुम्हाला भासेल, असा दावा परिषदेतल्या विकासकांसमोर करण्यात आला!

या नंदनवनात काय काय असू शकेल? घराचे नियंत्रण करणाऱ्या होमकिटमधल्या आज्ञावली (प्रोग्रॅम) तुम्हाला अनेक सुविधा उपलब्ध करून देऊ शकतात. घरी परतल्यावर दाराचे कुलूप उघडण्यासाठी तुम्हाला फक्त तुमच्या भ्रमणध्वनीच्या पडद्यावरून (स्क्रीन) तुमचे बोट फिरवावे लागेल, की 'तिळा उघड' म्हटल्याप्रमाणे दार उघडेल. तुम्ही ज्या खोलीत प्रवेश कराल तिथे तात्काळ दिवे लागतील आणि तुम्ही तिथून जाताच बंदही होतील. तुम्ही घरात येताच गरम पाणी तयार असल्याचा संदेश तुम्हाला शॉवरकडून येईल, तर 'जेवण तयार आहे,' असे तुम्हाला ओव्हन कळवेल...!

जेवताना तुम्ही खाल्लेल्या जेवणातल्या पोषकद्रव्यांची आणि कॅलरीजची माहिती (आणि त्यांच्या अतिरेकाचा इशाराही!) तुमच्या भ्रमणध्वनीवर हेल्थकिटच्या मदतीने मिळू शकेल. तुमच्या नाडीचा वेग, शरीराचे तापमान, रक्तदाब, तुम्ही कोणती औषधे घेतलीत आणि कोणती बाकी आहेत, किती कॅलरीज खर्च केल्यात... वगैरे सर्व माहिती तुमच्या भ्रमणध्वनीकडे उपलब्ध असेल. यातली नाडीचा वेग, तापमान यांसारखी बरीचशी माहिती तुमच्या अंगावर कपड्यांप्रमाणे घातलेल्या मापकांकडून मिळालेली असेल, तर औषधे किंवा खाण्याची माहिती तुम्हीच पुरवलेली असेल. ही माहिती सतत तुमच्या फाईलमध्ये साठवलीही जाईल. त्यामुळे तुमच्या डॉक्टरांना किंवा तुम्हाला तातडीने दाखल कराव्या लागलेल्या रुग्णालयाला गरज पडली तर ती फाईल लगेच जगद्व्यापी जालकामार्फत (तुमच्या पूर्वअनुमतीने) उपलब्ध होईल.







हे सर्व कळल्यावर एकीकडे जनसामान्यांची पहिली प्रतिक्रिया, 'किती छान! केवढ्या सोयी आपल्याला केवळ एका भ्रमणध्वनीच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत!' अशीच होते आहे. तज्ज्ञांना मात्र सुखसुविधांच्या या आमिषाला भुलून हेच जनसामान्य जगद्व्यापी जालकाच्या जाळ्यात अधिकच अडकून आपले नुकसान तर करून घेणार नाहीत ना, अशी भीती वाटते आहे.

यातली तुलनेने निरुपद्रवी वाटणारी गोष्ट म्हणजे तुमचे घर आणि तुमचे आरोग्य यांच्याविषयीच्या तपशीलवार माहितीचा व्यापारी फायद्यासाठी होऊ शकणारा वापर. हल्ली तुम्ही अगदी 'यू-ट्युब'वर एखादी व्हिडिओ क्लिप पाहायला गेलात तरी त्या क्लिपच्या विषयानुसार तुम्हाला निदान काही सेकंद तरी एखाद्या जाहिरातीची क्लिप आधी पाहावी लागू शकते. एखाद्या वेबसाइटवर वैद्यकीय माहिती पाहायला गेलात तर त्या माहितीशी संबंधित जाहिरातींचा भूलभुलैय्या तुमच्या मागे लागतो. बऱ्याचदा तुम्ही भरलेल्या फॉर्मवरचा भ्रमणध्वनी क्रमांक वापरून तुमच्यावर जाहिरातींच्या 'एसएमएस'चा मारा सुरू होतो. त्यामुळे उद्या तुमच्या शॉवरकडून गरम पाणी तयार असल्याच्या संदेशाबरोबर एखाद्या शांपूची जाहिरातही तुम्हाला ऐकवली गेली तर आश्चर्य वाटायला नको!

तुमच्याविषयीची माहिती जगद्व्यापी जालकावर सतत साठवली गेल्यामुळे अनेकदा, तुम्हाला स्वतःला तुमच्याविषयी जेवढी माहिती आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त माहिती अन्य कोणाला तरी उपलब्ध होईल. त्या माहितीचा हवा तसा वापर करून

तुम्हाला वेगवेगळ्या गोष्टींचा बागुलबुवा दाखवून विविध महागड्या वैद्यकीय चाचण्या किंवा अनावश्यक उपचार करून घ्यायला प्रवृत्त केले जाऊ शकते.

अर्थात, हे झाले व्यापारी फायद्यासाठी केले गेलेले उपयोग (किंवा दुरुपयोग!). पण हे काही संगणक-गुन्हे (कम्प्युटर-क्राइम) किंवा जालक-गुन्हे (नेट-क्राइम) नव्हेत. गेल्या काही दशकांमध्ये या दोन्ही प्रकारच्या गुन्ह्यांची मिळून सायबर-गुन्हे ही गुन्हेगारीची नवीन शाखाच निर्माण झाली आहे. तुमचा भ्रमणध्वनी हा तुमच्या घराशी आणि शरीराशी जालकामार्फत जोडला गेल्याने या सायबर-गुन्हेगारीचा तुमच्या वैयक्तिक आयुष्याला विळखा पडण्याचा धोका निर्माण होऊ शकेल, असा इशारा या क्षेत्रातले तज्ज्ञ देऊ लागले आहेत.

ही सायबर-गुन्हेगारी नेमकी आहे तरी काय? सायबर-गुन्हेगारीची इतर गुन्हेगाऱ्यांपेक्षा वेगळी अशी काही वैशिष्ट्ये आहेत. एक म्हणजे, या क्षेत्रातले बहुतेक गुन्हेगार हे तरुण असून त्यापैकी दोनतृतीयांश हे पंधरा ते पंचवीस या वयोगटातले आहेत. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, या क्षेत्रातल्या गुन्ह्यांसाठी अद्ययावत तंत्रज्ञान माहीत असणे आवश्यक असल्यामुळे या प्रकारच्या कोणत्याही गुन्ह्यातले काही गुन्हेगार हे तंत्रज्ञानावर हुकूमत असणारे हुशार तरुण असतात. तिसरे वैशिष्ट्य म्हणजे, संगणक आणि जालक या दोन्ही क्षेत्रातले तंत्रज्ञान सतत झपाट्याने विकसित होत असल्यामुळे गुन्हे करताना हे गुन्हेगार नेहमी नवनव्या युक्त्या (आयडिया) आणि क्लृप्त्या (कंट्रायव्हन्स) वापरतात. त्यामुळे या गुन्हेगारांना पकडणे आणि त्यांचे गुन्हे सिद्ध करणे अधिकच अवघड होऊन बसते.

सायबर गुन्ह्यांमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींचेही वेगवेगळे प्रकार आहेत. यातल्या स्वतःच्या (किंवा आपल्या टोळीच्या) फायद्यासाठी गुन्हे करणाऱ्या व्यक्ती या प्रामुख्याने आर्थिक गुन्ह्यांकडे आपले लक्ष केंद्रित करतात. जालकावरून होणाऱ्या आर्थिक व्यवहारांमध्ये घुसखोरी करून पैसे आणि बौद्धिक संपदा (इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी) लुटण्यावर यांचा भर असतो. आंतरराष्ट्रीय सामरिक (स्ट्रॅटेजिक) अभ्यास केंद्राच्या अहवालाप्रमाणे दरवर्षी सुमारे साठ लाख कोटी रुपये एवढ्या रकमेच्या पैशांची आणि चाळीस लाख कोटी रुपये एवढ्या किमतीच्या बौद्धिक संपदेची लूट सायबर गुन्हेगारांकडून केली जाते.

विविध देशांच्या सरकारांसाठी सायबर-गुन्हे करणाऱ्या व्यक्ती या जालकावरून अन्य (प्रामुख्याने शत्रू, पण यातून मित्रही सुटत नाहीत!) देशांविरुद्ध हेरगिरी करणे, अन्य देशांची चाललेली अशी हेरगिरी बंद पाडणे किंवा जमल्यास त्यांची योजनापूर्वक दिशाभूल करणे आणि संभाव्य सायबर-युद्धाची (सायबर-वॉर) तयारी करणे या गोष्टी करतात. गेल्या वर्षी जर्मनीने आपल्या साठ व्यक्ती या गेली अनेक वर्षे सायबर-युद्धाची तयारी करत असल्याचे जाहीर केले. एडवर्ड स्नोडेनने तर अलिकडेच साऱ्या जगाला अशा सायबर-हेरगिरीची तपशीलवार माहिती देऊन थक्क केले. आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयात (इंटरनॅशनल क्रिमिनल कोर्ट) अशा गुन्ह्यांसाठी दाद मागता यावी यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्यात तरतुदी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. पण त्यात कोणत्याही देशाला मनापासून रस आहे का, याविषयी अनेक तज्ज्ञ शंका व्यक्त करतात. कारण सर्वांनाच 'आपला तो सायबर-रक्षक आणि इतरांचा तो सायबर-गुन्हेगार', असे वाटत असते!

केवळ आपले ज्ञान आणि कौशल्य इतरांसमोर प्रदर्शित करण्याचा आनंद लुटणाऱ्या व्यक्तीही कळत-नकळत सायबर-गुन्ह्यांना कारणीभूत होतात. रिचर्ड स्क्रेंटा नावाच्या शाळकरी मुलाने 'एल्क क्लोनर' नावाची आज्ञावली (प्रोग्रॅम) गंमत म्हणून लिहिली आणि एका संगणक खेळाबरोबर (कम्प्युटर गेम) फ्लॉपीत समाविष्ट केली. त्यावेळी ॲपल हा संगणक लोकप्रिय होता आणि फ्लॉपी डिस्कद्वारा ॲपल-डॉस-३.३ ही कार्यप्रणाली (ऑपरेटिंग सिस्टिम) त्यावर वापरली जायची. एल्क क्लोनर हा एका फ्लॉपी डिस्कवरून दुसऱ्या फ्लॉपी डिस्कवर जायचा. खेळाबरोबर ही आज्ञावली फ्लॉपीवरून संगणकाच्या स्मृतिकोशात प्रवेश करायची आणि तो खेळ पन्नासाव्यांदा वापरायला सुरुवात केली की संगणकाच्या पडद्यावर 'एल्क क्लोनर : एक व्यक्तिमत्त्व असणारी आज्ञावली' ही कविता झळकवायचा. केवळ विनोद म्हणून बनवलेल्या या आज्ञावलीतच जगातल्या सायबर सतावणुकीचा उगम आहे.

यानंतर विविध लोकप्रिय कार्यप्रणालींवर चालणाऱ्या संगणकांसाठी अशा सतावणाऱ्या आज्ञावली बनवण्याचा सपाटा सुरू झाला. या प्रकारच्या आज्ञावलीची तीन वैशिष्ट्ये होती. एक म्हणजे, कोणीही सुरू न करता ती स्वतःहून काम करू लागायची. दुसरे म्हणजे ती स्वतःची प्रत संगणकात साठवली जाऊन, त्यात टाकलेल्या प्रत्येक फ्लॉपीवर लिहायची आणि तिसरे वैशिष्ट्य म्हणजे, ती फ्लॉपी अन्य संगणकात टाकताच ही आज्ञावली स्वतःची एक प्रत त्या संगणकाच्या स्मृतीत स्वतःहून लोड करून कार्यरत करायची. तेव्हापासून संगणकांना कोणत्याही प्रकारे अन्य संगणकांच्या संपर्कात आल्यावर अशा आज्ञावलींची बाधा होऊ लागली. जगद्व्यापी जालकाची निर्मिती होताच त्याचा वापर करून एका संगणकाकडून दुसऱ्या संगणकांकडे जात अशा आज्ञावली जगभर पसरू लागल्या आणि योग्य संधी मिळताच आपला इंगा दाखवू लागल्या. आपल्या शरीराला होणाऱ्या अनेक रोगांना कारणीभूत असणाऱ्या विषाणूंशी असणाऱ्या आज्ञावलींच्या या साम्यांमुळे त्यांना 'संगणक-विषाणू' (कम्प्युटर-व्हायरस) असे म्हटले जाऊ लागले.

आज्ञावलीवर चालणाऱ्या कोणत्याही भ्रमणध्वनीलादेखील अशा संगणक-विषाणूंपासून धोका असतो. आपल्या भ्रमणध्वनीं-मध्येही त्यांच्या विविध कार्यांसाठी आज्ञावली आणि कार्यप्रणाली असतात. हे भ्रमणध्वनी जगद्व्यापी जालकाला जोडलेले असल्यामुळे ते संगणक-विषाणूंच्या हल्ल्याला बळी पडू शकतात. आणि इथेच आपले घर आणि आपले शरीर हे भ्रमणध्वनीमार्फत जगद्व्यापी जालकाशी निगडित करण्यातल्या विविध धोक्यांचा उगम आहे.

तुमच्या भ्रमणध्वनीमध्ये जालकावरून प्रवेश करून हे विषाणू

त्याच जालकावरून तुमची कोणतीही माहिती आणि परवलीचे शब्द (पासवर्ड) तो विषाणू तयार करणाऱ्याच्या आज्ञेनुसार विशिष्ट संकेतस्थळाकडे पाठवू शकतात. या माहितीचे संगणकाच्या मदतीने विश्लेषण करून तिचा काय उपयोग (किंवा दुरुपयोग!) करता येईल हे त्या विषाणूच्या निर्मात्याला ठरवता येते. या सर्व माहितीचा उपयोग करून तुमच्या भ्रमणध्वनीचा जालकावरून ताबा घेऊन तो तुम्हाला त्रास देऊ शकतो. विशेषतः तुमचे घर आणि तुमचे शरीर तुमच्या भ्रमणध्वनीमार्फत जालकाला जोडले गेले असल्याने तो अगदी सहजपणे तुम्हाला नामोहरम करू शकेल.

अलिकडेच ऑस्ट्रेलियामध्ये अंकीय चाचेगिरीने (डिजिटल हायजॅकिंग) अनेक आयफोन, आयपॅड आणि मॅक संगणकांचा अंकीय ताबा घेऊन ते बंद पाडण्यात हॅकर यशस्वी झाले. नंतर ही सर्व यंत्रे पुन्हा सुरू करण्यासाठी 'ओलेग प्लिस्स' या नावाने शंभर डॉलरची रक्कम (खंडणी म्हणून?) पेपॉलमार्फत भरण्याची सूचना (की मागणी?) करण्यात आली होती.

जर तुम्ही तुमच्या घरात शिरल्यावर तुम्हाला अंकीय चाचेगिरीने तुमच्याच घरात कैद करण्यात आले तर त्यातून सुटका करून घेण्यासाठी किंवा तुमची वैद्यकीय फाईल मोक्याच्या वेळी उघडणे अशक्य केले गेले तर ती पुन्हा खुली करण्यासाठी मागितलेले पैसे मुकाटपणे देण्याची वेळ तुमच्यावर येऊ शकते. अर्थात, पैसे घेऊन तुमची या संकटातून सुटका करणारे 'आम्ही केवळ आमचे ज्ञान वापरून तुमची सुटका केली,' असा दावा करतील आणि त्यासाठी अगदी अधिकृतपणे पैसे घेतील! प्रत्यक्षात नेहमीच्या युक्त्या वापरून त्यांनीच परदेशातल्या एखाद्या संकेतस्थळाच्या पत्त्यावरून तुमच्या भ्रमणध्वनीवर हल्ला केला असला, तरी ते सिद्ध करणे जवळजवळ अशक्य ठरेल.

अर्थात, या सायबर-गुन्ह्यांपेक्षाही जास्त चिंतेची बाब आहे ती म्हणजे प्रत्येक गोष्टीसाठी भ्रमणध्वनीवर आणि जगद्व्यापी जालकात साठवलेल्या माहितीवर अवलंबून राहण्याची लोकांना लागणारी सवय! काही काळापूर्वी आयफोनसाठी 'टेक फाइव्ह' नावाचे एक नवे ॲप (ॲप्लिकेशन) आले होते. जे लोक कानाला हेडफोन लावून संगीत ऐकताना मध्येच पॉजचे बटण दाबून ते थांबवत असतील आणि नंतर आपण पॉज बटण दाबले होते हे विसरून नुसतेच हेडफोन कानाला लावून बसत असतील अशा व्यक्तींसाठी हे ॲप होते. अवघ्या नव्याण्णव सेंटना मिळणारे हे ॲप ठरावीक वेळ गेल्यावर थांबलेले संगीत पुन्हा सुरू करते! अलेक्झांड्रिया नावाचे ॲप तुम्ही कुठे आहात, तुमचे नाव काय या गोष्टी लक्षात ठेवून तुम्हाला हवे तेव्हा सांगते. ज्यांना विस्मृतीचा आजार आहे अशा लोकांसाठी ही ॲप निश्चितच उपयोगी आहेत, पण ज्यांना अशी कोणतीही समस्या नाही अशा व्यक्तीही मोठ्या प्रमाणात ही ॲप विकत घेतात, ही बाब चकित करणारी आहे!

लोक असे का करतात, याचा उलगडा करताना मानसशास्त्रज्ञ म्हणतात, की ज्याप्रमाणे एखादे कष्टाचे शारीरिक काम यंत्राने व्हायला लागले की ते स्वतः करण्याचे कष्ट कोणालाही घ्यावेसे वाटत नाही, तसा हा प्रकार आहे. बौद्धिक कष्ट टाळायची सवय लागली की तुम्हाला साध्या साध्या गोष्टी करण्यासाठीदेखील आपली बुद्धी वापरावीशी वाटत नाही. गणकयंत्र (कॅल्क्युलेटर) आल्यानंतर पसरलेल्या गणन-अक्षमता-रोगात व्यक्तींना 'दहा चोक' हा गुणाकार करण्यासाठीसुद्धा गणकयंत्र वापरावे लागते!

गणन-अक्षमता-रोगाचा दुष्परिणाम फक्त गणितातल्या आकडेमोडींपुरताच मर्यादित असल्यामुळे तो एवढी चिंतेची बाब ठरत नाही. पण ॲपवर सतत अवलंबून राहिल्याने होणारा विचार-अक्षमता-रोग मात्र व्यक्ती आणि समाज दोघांच्याही स्वास्थ्याच्या दृष्टीने चिंताजनक आहे. अर्थात, ज्या-त्या गोष्टीसाठी ॲप वापरणाऱ्यांना हे पटणार नाही. ते त्यांचा भ्रमणध्वनी तुमच्यासमोर धरत अभिमानाने सांगतील, माझ्या विचारक्षमतेची तुम्हाला खात्री पटायला हवी असेल, तर माझा 'डिंग-डाँग गेम'चा लेटेस्ट स्कोअर पाहा!

मेलबर्नच्या डीकिन विद्यापीठाच्या ट्रिना हिंकले आणि त्यांच्या सहकाऱ्यांना असे आढळले आहे की जे युवक आपल्या भ्रमणध्वनीवर संगणक-खेळ खेळण्यात मग्न असतात, त्यांच्या बौद्धिक क्षमतेची झपाट्याने घसरण होते. त्यांचे स्वत्व हरवते आणि त्यांचा आत्मविश्वास ढासळतो. जे 'व्हॉट्स ॲप'ला घाईने प्रतिसाद देण्यासाठी समोरच्या व्यक्तींना आणि सभोवतालच्या परिस्थितीला दुर्लक्षित करतात, त्यांचा वास्तवाशी संबंध तुटतो. असे युवक ही एक फार मोठी कौटुंबिक आणि सामाजिक समस्या बनू लागली आहे.

एके काळी, मानवाने स्वतःला 'होमो सेपिअन' म्हणजे 'बुद्धिमान मनुष्य' असे जीवशास्त्रीय नाव निवडले. या मानवाने स्वतःची बुद्धिमत्ता वापरून कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) असणारी यंत्रे बनवायला सुरुवात केली. पण तो जर या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मायाजालात फसून आपली नैसर्गिक बुद्धिमत्ता वापरायचेच टाळू लागला तर मात्र उत्क्रांतीच्या 'वापरा नाही तर गमवा' (यूज इट ऑर लूज इट) या नियमाप्रमाणे तो त्याची नैसर्गिक बुद्धिमत्ता गमावून 'कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणारा निर्बुद्ध प्राणी' बनण्याचा धोका आहे. 'क्रांती आपली पिल्ले खाते,' असे म्हणतात, त्याप्रमाणे मानवाने केलेली माहितीतंत्रज्ञान क्रांती त्याच्या बुद्धिमत्तेलाच खाऊन टाकण्याचे संकट मानवजातीसमोर उभे राहू पाहत आहे. ते जर टाळायचे असेल तर नव्या पिढीला संगणक-खेळातून, बिनडोक बनवणाऱ्या 'ॲपस्'च्या मोहजालातून आणि जगद्व्यापी जालकाच्या जाळ्यातून बाहेर पडून जीवनातल्या खऱ्या आव्हानांना सामोरे जायला प्रवृत्त करणे आवश्यक आहे!

**– सुधीर थत्ते**
फ्लॅट नं. ११३, टॉवर ए ६, गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह,
पिरोजशानगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०७९
भ्रमणध्वनी ९९८७५८८५८३
sudhirthattey@yahoo.com



# विलयाला गेलेले ओबामा

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

२००८ च्या अध्यक्षीय निवडणुकीत बराक ओबामांचे राज्यानुभव मर्यादित होते. त्यांनी अमेरिकेच्या अधिसभेत (senate) उणेपुरे १४३ दिवस काम केलं होतं. त्यापूर्वी ते इलिनॉय (Illinois) प्रांताच्या विधानसभेत सिनेटर होते. या तुटपुंज्या अनुभवावर अमेरिकेसारख्या महासत्ताक राष्ट्राच्या अध्यक्षपदाची अभिलाषा बाळगणं म्हणजे जन्मत:च सूर्याकडे उडी मारणाऱ्या हनुमानाप्रमाणे विक्रमी कृत्य करण्यासारखं होतं. पण ही अशक्यप्राय गोष्ट त्यांनी आपल्या वक्तृत्वाच्या बळावर साध्य केली. प्रदीर्घ अनुभव असलेल्या राजकारण्यांना अमेरिकन लोक अध्यक्षपदासाठी निवडून देत नाहीत. त्यापेक्षा त्यांचा उदयोन्मुख नेत्यावर जास्त भर. याचं कारण असं की भूतकाळाचं लांब शेपूट असलेल्यांनी आपल्या कारकिर्दीत कधी ना कधी विसंगत वक्तव्यं केलेली असतात. असं आढळल्यावर इथली प्रसारमाध्यमं त्या दावेदाराला सुळावर चढवतात. ओबामा या क्षेत्रात नवीन असल्यामुळे त्यांचा इतिहास कोरा होता. त्यामुळे त्यांना टीकेचं लक्ष्य बनवणं शक्य नव्हतं.

त्यांनी आपल्या वाक्चातुर्यानं अमेरिकन लोकांवरच नव्हे सगळ्या जगावर मोहिनी घातली. या जाळ्यात नोबेल समिती देखील अडकली. त्या समितीनं ओबामांनी कुठलंच भरीव कृत्य केलं नसतानाही नोबेल देऊन सन्मानित केलं! ती परत मागण्याची सोय असती तर आता समितीनं नक्कीच तसं केलं असतं. ओबामांच्या (अ)कर्तृत्वानं अमेरिका व जग एवढं पस्तावलं की शक्य झालं असतं तर त्यांना केव्हाच पदच्युत करण्यात आलं असतं. ती प्रक्रिया एवढी वेळखाऊ व गुंतागुंतीची आहे की त्यांना इंपीचमेंट (impeachment) करण्याची भाषा क्वचितच बोलली जाते. निक्सन (वॉटरगेट) व क्लिंटन (मोनिका लेव्हिन्स्की) यांच्याप्रमाणे ओबामांनाही काळिमा लागला असता. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वात निकृष्ट दर्जाचे अध्यक्ष म्हणून जिमी कार्टरचा (१९७६ ते १९८०) नंबर लागे. पण आता हा किताब ओबामांना मिळाला आहे. त्यांच्या कारकिर्दीत अमेरिकेच्या जागतिक प्रतिष्ठेला ग्रहण लागलं, डॉलरचा पतदर्जा घसरला, अमेरिकेच्या डोक्यावरचा कर्जाचा डोंगर वाढला आणि जनतेत एक प्रकारची शोककळा पसरली. आपल्या मुलाबाळांच्या भविष्याविषयी अमेरिकन लोक साशंक झाले. त्यांचा आपल्या अध्यक्षांवरील विश्वास पार उडाला. ओबामांची लोकप्रियता ते २००८ मध्ये निवडून आले तेव्हा ७२ टक्के होती. आज ती ४० टक्क्यांपेक्षा खाली आहे. याला धोक्याचं क्षेत्र (danger zone) म्हणतात कारण हल्ली ओबामा सार्वजनिक भाषण देण्याच्या भानगडीत पडत नाहीत. लोकांचे मोर्चे कुणाला हवे असतात? जर भाषण द्यायचंच असेल तर ते स्नेही श्रोतृवर्ग असल्याची काळजी घेतात नाहीतर व्हाइट हाउसमधूनच संपर्क साधतात.

आजकाल त्यांचं कामात लक्ष नसतं. पूर्वीची ऊर्जा व चैतन्य आता लोप पावलेलं दिसतं. ते लिहून दिलेली भाषणं यंत्रवत वाचतात. प्रसंगाचं गांभीर्य न ओळखता ते बोलतात. ही निरुत्साही वृत्ती आता सर्वांच्या लक्षात आलेली आहे.

ओबामांना एवढं निराशाग्रस्त होण्यास अनेक कारणं आहेत. अमेरिकेची लोकसभा विरोधी पक्षाच्या (रिपब्लिकन पक्ष) अंमलाखाली आहे. कुठलंही विधेयक त्या संस्थेकडून पारित

झाल्याशिवाय कायदा बनू शकत नाही. म्हणजे ओबामांनी वाटाघाटी करून सामंजस्य स्वीकारणं आलंच. पण ते त्यांच्या रक्तात नाही. त्यामुळे त्यांनी सुचवलेल्या सर्व उपक्रमांना लाल कंदील मिळाला व त्यांची राजकीय घोडदौड ठप्प झाली. पिंजऱ्यात कोंडलेल्या वाघासारखी त्यांची स्थिती झाली आहे. गेल्या साडेसहा वर्षांच्या आपल्या कारकिर्दीत त्यांनी ऐतिहासिक ठरेल अशी एकच योजना राबवली. ती म्हणजे आरोग्यविम्याची उपलब्धी व्यापक केली. त्याला ओबामाकेअर म्हणतात. परंतु ही योजना राबवणं त्यांचं पानिपत ठरलं. कारण यावरून त्यांची खोटं बोलण्याची आंतरिक प्रवृत्ती प्रकट झाली.

आरोग्यविमाधारकांमधले ८५ टक्के लोक संतुष्ट होते. परंतु अल्पसंख्याक या सुविधेपासून वंचित राहिले म्हणून सरकारी शिधा देऊन अशा वंचितांना आरोग्यविमा सरकारनं उपलब्ध करून दिला. त्यासाठी ओबामांनी आपलं सर्व राजकीय भांडवल खर्च केलं. ही गोष्ट स्तुत्यच समजायला पाहिजे. पण यातली गोम अशी, की हा आरोग्यविमा सर्वसामान्य जनतेला विकताना ते ठासून म्हणाले होते की प्रस्थापित विमाधारकांना आपले डॉक्टर व दवाखाने बदलावे लागणार नाहीत. तसंच नवीन योजनेमुळे त्यांचे हप्ते कमी होतील. या आश्वासनांवर लोकांनी विश्वास ठेवला व शेवटी मोठ्या कष्टानं त्यांचं विधेयक विरोधी पक्षाचा आधार न मिळता संसदेनं पारित केलं. याप्रमाणे ओबामाकेअर जन्माला आली. इतिहासात कुठल्याच राष्ट्राध्यक्षांना हे शक्य झालं नसल्यामुळे ओबामांचा हा विक्रम महत्त्वाचा होता.

परंतु २०१० मध्ये मंजूर झालेला हा कायदा जसजसा अमलात येऊ लागला तसतशी वस्तुस्थिती लोकांच्या निदर्शनास आली. प्रस्थापित विमाधारकांना आपला आरोग्यविमा रद्द करून ओबामाकेअरमध्ये नोंदणी करणं भाग पडलं. पण तो विमा निकृष्ट दर्जाचा आहे हे लवकरच उघडकीस आलं. एवढेच नव्हे तर ग्राहकांना आपले डॉक्टर व दवाखाने बदलावे लागले व नवीन विम्याचे दर ओबामांनी सांगितल्याप्रमाणे खाली न जाता उर्ध्वदिशेनं गेले. म्हणजे ओबामा आपलं विधेयक मंजूर व्हावं म्हणून साफ खोटं बोलले. एकदा नव्हे तर अठ्ठावीस वेळा, असं एका वार्तावाहिनीनं बजावलं. डॉक्टर व पेशंट यामध्ये असलेले वैद्यकीय संबंध या देशात तरी घट्ट असतात. ही नाळ तुटली म्हणून जनता प्रक्षुब्ध झाली आणि प्रथमच ओबामांवर तोंडसुख घेऊ लागली. त्यांची पत रसातळाला तर मिळालीच, पण त्यांचं सत्याशी वैर आहे हे सिद्ध झालं.

बहुसंख्येनं अमेरिकन लोक ओबामाकेअर पसंत नाही म्हणून सर्वेक्षणात मतप्रदर्शन करतात. त्यामुळे २०१४ नोव्हेंबरच्या संसदीय निवडणुकीत ओबामांच्या डेमॉक्रॅटिक पक्षाला फटका बसणार असं इथले राजपंडित भाकीत करतात. हल्ली ओबामांच्या खोटारडेपणानं उच्चांक गाठला आहे. भारताप्रमाणे अमेरिकेतील प्रसारमाध्यमं उदारमतवादी. ६० टक्के वार्ताहरांनी ओबामांना मतदान दिलं होतं. स्नेही पत्रकारितेनं सुरुवातीला त्यांची पाठराखण केली. न्यू यॉर्क टाइम्स व वॉटरगेट प्रसिद्धीचं वॉशिंग्टन पोस्ट ही प्रतिष्ठित दैनिकं त्यासाठी मशहूर. पण हल्ली ओबामांची वैगुण्यं बघून या स्तुतिपाठकांनीही हात टेकले. आपला वृत्तविद्येचा दर्जा राखून ठेवण्यासाठी न्यू यॉर्क टाइम्स प्रथमच टीकात्मक अग्रलेख लिहू लागलं. ओबामांनी सूतोवाच करताच ते किती असत्य आहे हे वॉशिंग्टन पोस्टनं सोहादरण वाचकांच्या निदर्शनास आणण्यास सुरुवात केली. समर्थकांची ही स्थिती तर इतरांची सोडून दिलेलीच बरी.

प्रासंगिक खोटं बोलण्याऐवजी ते कधी कधी किंवा नेहमीच असत्य बोलतात असं ६१ टक्के जनता अनेक सर्वेक्षणांत म्हणते असं आढळून आलं. महासत्ताक राष्ट्राच्या मुख्याची ही कुख्याती युरोपीय राष्ट्रांच्या कानावर पडली हे त्यांनी केलेल्या असहमतीवरून सिद्ध होतं. त्यामुळे अमेरिकेच्या परराष्ट्रधोरणाचं खोबरं तर झालंच पण अननुभवी ओबामांचं पितळ उघडं पडलं. त्यांना वाणी आहे पण कृती नाही हे लगेच जगाच्या लक्षात आलं.

इस्राएल हा अमेरिकेचा जीवश्चकंठश्च मित्र. एवढा की हे दोस्तराष्ट्र अनेक लोक अमेरिकेचा ५१ वा प्रांत समजतात. इस्राएल व पॅलेस्टाइन हे जन्मशत्रू. त्यांच्यामधले संबंध सुधारावे व आपली मोहोर जगावर उमटावी म्हणून ओबामांनी पडद्यामागे इस्राएलवर आपलं अस्तित्व मान्य न करणाऱ्या पॅलेस्टाइनला सवलती देण्यास दबाव आणला. हे गुपित बाहेर पडताच अमेरिकन ज्यू व इस्राएलची पाठराखण करणारे राजकारणी यांनी ओबामांवर आग पाखडली. आता इस्राएल व अमेरिका हे जवळचे ऐतिहासिक मित्र असूनही त्यांच्यात विस्तव जात नाही. याचं श्रेय ओबामांच्या अननुभवांना द्यावं लागेल.

अमेरिकेचा जवळचा दुसरा मित्र म्हणजे ग्रेट ब्रिटन. दोन देशांतली नाळ अतूट असण्याचं कारण उभय महायुद्धांत अमेरिकेनं लष्करी मदत करून या देशाला जर्मनीच्या आक्रमणापासून वाचवलं. याचे उपकार ब्रिटन कधी विसरला नाही. त्या देशानं आपलं परराष्ट्रधोरण अमेरिकेच्या स्वाधीन करून दोन देशांत अद्वैत निर्माण केलं. अनेक ब्रिटिश वर्तमानपत्रं ब्रिटन अमेरिकेच्या आज्ञेवर नाचतो म्हणून टीका करतात. तरीही अमेरिका ब्रिटनची मदत गृहीत धरते आणि त्याविषयी त्या बेटरूपी देशानं या महासत्ताक राष्ट्राची कधी निराशा केली नाही.

मग ओबामा जागतिक व्यासपीठावर आले आणि हे पारडं उलटलं. सिरियामधलं अंतर्गत युद्ध थांबवण्यासाठी ब्रिटन आपल्या बाजूनं आहे हे त्यांनी गृहीत धरलं. ब्रिटनचे पंतप्रधान डेव्हिड कॅमरॉन यांनी ओबामांना पुष्टी दिली व ते विधेयक आपल्या संसदेत मांडलं. जे झालं त्यावर कुणाचा विश्वासच बसेना. संसदेनं ते विधेयक धुडकावून देऊन अप्रत्यक्षपणे ओबामांच्या बालिश परदेशी धोरणाला लाथा मारल्या. आयाळ गेलेल्या सिंहासारखी अमेरिकेची स्थिती झाली.

मग रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी ओबामांच्या पौरुषाला आव्हान दिलं. त्यांनी क्रायमिया गिळंकृत केला व युक्रेनच्या पूर्व

भागाचं शरसंधान केलं. या आक्रमणानं ओबामा बुचकळ्यात पडले. अशा वेळी काय करावं हे त्यांच्या अनुभवात नव्हतं. म्हणून त्यांनी सुरुवातीला भाषण ठोकून वेळ मारून नेली. ते पोकळ असल्यामुळे अमेरिकन जनता खवळली. मग कुठे ते आपल्या तंद्रीतून बाहेर पडले आणि त्यांनी रशियाला वेगळं करण्यासाठी युरोपीय राष्ट्रांची मदत मागितली. यात जर्मनी महत्त्वाचा कारण तो देश रशियाशी तगडा व्यापार करतो. जर्मनीच्या चॅन्सलेर अँजेला मर्कल अगोदरच ओबामांवर बेहद नाखूश. अमेरिकेचा महाहेर एडवर्ड स्नोडन यानं जाहीर केलं होतं की अमेरिकन हेरसंस्था त्यांचं टेलिफोनवरचं सर्व बोलणं ऐकते. मुरलेले राजकारणी आपला राग खिशात ठेवतात. चेहऱ्यावर पांघरत नाहीत. अँजेलाबाईंनी ओबामांना याविषयी काय म्हटलं हे छापण्यासारखं नसेल, परंतु यावेळी त्यांनी उट्ट काढलं. राजनैतिक भाषेत बोलून, आपण शक्य तेवढी मदत करू असं म्हटलं, पण प्रत्यक्षात त्या अवगंठून बसल्या. खोटं बोलण्याचं सोवळं असलेल्या माणसाच्या शब्दावर विश्वास ठेवून जर्मनी-रशियामध्ये मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या व्यापारावर पाणी सोडण्याची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. पुन्हा एका साध्या राष्ट्रानं महासत्ताक राष्ट्राला डावललं.

यावरून ओबामांमध्ये नेतृत्वगुण नाहीत हे जगाला कळलं. हे खुद्द अमेरिकन लोकांनी मान्य केलं. क्रायमियाच्या बाबतीत ओबामांची सुस्त प्रतिक्रिया बघून रशियाच्या नेत्यात आपल्या नेत्यापेक्षा जास्त नेतृत्व गुण आहेत असं मत अनेक वर्तमानपत्रांनी व्यक्त केलं. अर्थातच ते ओबामांना झोंबलं.

ओबामांच्या परदेशी धोरणामुळे इतर देशांशीही संबंध बिघडले. खोब्रागडे प्रकरणामुळे भारताचे संबंध गोठले. आपल्या लालफितीच्या कारभारामुळे व सरकारी नाकर्तेपणामुळे अमेरिकन कंपन्या अगोदरच नाखूष होत्या. शिवाय आपल्या औषधांना पुरेसं बौद्धिक हक्कांचं संरक्षण मिळत नाही म्हणून अमेरिकन कंपन्यांनी तीव्र विरोध दर्शवला होता. आता भारताच्या नवीन सरकारबरोबर दोन लोकशाही देशांमध्ये सौहार्दाचे संबंध पुनर्प्रस्थापित होतील अशी आशा व्यक्त केली जात आहे.

आण्विक शस्त्रधारी होण्याचे इराणचे प्रयत्न इस्राएलला व सौदी अरेबियाला नापसंत आहेत. त्यामुळे मध्यपूर्व देशातील सत्तासमीकरण बदलण्याची भीती आहे. अमेरिकेनं इराणच्या मुसक्या बांधल्या नाहीत तर आम्ही अण्वस्त्र संपादन करू असा इशारा सौदी अरेबियानं ओबामांना दिला. तेलाच्या खाणी असलेल्या या देशाची इच्छा पूर्ण करण्यास पाकिस्तान एका पायावर तयार आहे.

अमेरिकेच्या सुस्त व दुर्बल परदेशी धोरणामुळे जगाचा राष्ट्रक्रम बदलण्याची शक्यता आहे असं राजकीय तज्ज्ञ म्हणतात. सध्या जगात प्रत्येक राष्ट्राचं जे स्थान आहे ते अमेरिकेच्या नेतृत्वामुळे ठरलेलं आहे. पण ओबामांचं दौर्बल्य बघून रशिया व चीननं आपल्या तलवारी म्यानातून काढून शेजारच्या देशांना अस्वस्थ केलं आहे. चीनच्या विस्तारगंडाला चेतना मिळून त्या देशानं जपानच्या सेनकाकू या बेटांवर व अख्ख्या चिनी समुद्रावर आपले मालकी हक्क जाहीर केले. त्यामुळे जपान हादरून गेला. परदेशी हल्ल्यापासून आपण तुमचं संरक्षण करू असा अमेरिकनं दुसऱ्या महायुद्धानंतर जपानशी करार केला आहे, पण ओबामांच्या दुर्बल परराष्ट्रधोरणामुळे तो देश प्रक्षुब्ध झाला. त्याला गोंजारून विश्वासार्हता वाढवण्यासाठी ओबामांना स्वत:हून जपानला भेट देऊन अमेरिकनं पुरवलेल्या संरक्षण ढालीची जगाला जाहीरपणे आठवण करून द्यावी लागली. हे ढळलेल्या विश्वासार्हतेचं एक द्योतक आहे कारण आपण शक्तिवान आहोत असं भीमाला कधीच जाहीर करावं लागलं नाही. फिलिपाईन, बोर्नियो, मलेशिया हे अमेरिकेच्या वर्तुळातले देशही चीनच्या लष्करी हालचालींमुळे अस्वस्थ झाले आहेत. ओबामांच्या अधिपत्याखाली शत्रूला अमेरिकेचा धाक व मित्रांना आदर वाटेनासा झाला.

ओबामांनी पदभार स्वीकारताना अमेरिकेचे कायदे काटेकोरपणे पाळेन अशी शपथ घेतली, पण ते तसं करत नाहीत असं विरोधी पक्ष म्हणतो. लोकसभेत त्यांचं बहुसंख्याक बळ असल्यामुळे रिपब्लिकन पक्षानं ओबामांनी केलेल्या अनेक अवैध कृत्यांवर प्रकाश टाकण्यासाठी चौकशीसमित्या नेमल्या. त्यांच्यावर जे आरोप केलेले आहेत ते गंभीर स्वरूपाचे आहेत. उत्पन्नकर खातं राजकीय कारणासाठी विरोधी पक्षाविरुद्ध वापरणं या देशात महागुन्हा समजण्यात येतो. निक्सनना पदच्युत करण्यामागे हे एक कारण होतं. कारण त्यांनी विवरणपत्रांतील गोपनीय माहितीचा दुरुपयोग केला होता. तोच आरोप आता ओबामांवर करण्यात आला. एका समितीला त्यात अनियमितपणा आढळून आला. परंतु खोलवर चौकशी करण्यासाठी लागणारी मुद्यांची कागदपत्रं ओबामांनी उपलब्ध करून न दिल्यामुळे ही चौकशी बारगळली.

दुसरा गंभीर आरोप म्हणजे बेनगाझी, लिबिया येथे २०१२ साली चार राजनैतिक अधिकाऱ्यांची झालेली निर्घृण हत्या. दहशतवाद्यांनी अमेरिकन दूतावासावर केलेला हा हल्ला, ओबामांना लागलेला कलंक समजतात. पुरेसं संरक्षण दिलं नाही म्हणून राष्ट्राध्यक्षांकडे बोट दाखवलं जातं. त्या रात्री ओबामांनी या प्रकरणात लक्ष घालण्याऐवजी ते एका राजकीय समारंभाला गेले असा आरोप आहे. हा हलगर्जीपणा अमेरिकन लोकांना अक्षम्य गुन्हा वाटतो. पुन्हा त्यांनी संबंधित कागदपत्रं दाबून ठेवली. या असहकार्यामुळे बहुसंख्य जनता ते दोषी आहेत असं समजते.

या व इतर चौकश्या सुरू असल्यामुळे हे विस्तव विझवण्यातच त्यांची सर्व ऊर्जा खर्च होते.

ओबामा युरोपीय नेत्यांप्रमाणे समाजवादी आहेत असा त्यांच्यावर दुसरा आरोप करण्यात येतो. त्याला अमेरिकेसारख्या भांडवलशाहीवादी देशात राजकीय आत्महत्येसारखं समजण्यात येतं. अमेरिकेचं वेगळेपण समाजातील संपत्तीचं पुनर्वाटप करण्यात नसून तिची अतिरिक्त निर्मिती करून देश समृद्ध करण्यात आहे. ओबामांच्या उदारमतवादी धोरणामुळे अमेरिका समृद्ध होण्याऐवजी

गरीब झाली असंच म्हणावं लागेल. त्यांच्या कारकिर्दीत अमेरिकन लोकांचं सरासरी उत्पन्न घटलं, अर्थकारणाची वाढ खुंटली, देश कर्जबाजारी झाला आणि डॉलरचं अवमूल्यन झालं. त्यामुळे जीवनातला आर्थिक कलह वाढला. नोकऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे पदवीधर स्वत:च्या पायावर उभं न राहता आईवडिलांच्या घरी राहू लागले. या अंधारलेल्या भविष्याचं खापर राष्ट्राध्यक्षांवर फोडण्यात येतं.

ओबामा निवडून आले तेव्हा कृष्णवर्णीय आणि गोऱ्यांतील संबंध सुधारतील अशी आशा होती, पण याउलट या देशात वर्णभेद तीव्र झाला. छुपा वर्णद्वेष वाढला. समाजाचं याप्रमाणे ध्रुवीकरण झाल्यामुळे कृष्णवर्णीय-गोऱ्यांमधले संबंध अजूनच बिघडले. कृष्णवर्णीय अध्यक्ष असूनही कृष्णवर्णीयांचं राहणीमान वाढलं नाही म्हणून त्यांची निष्ठा देखील ढळली.

सध्या येथील लोकसभा रिपब्लिकन पक्षाच्या हातात आहे. या पक्षाचा ओबामांच्या उदारमतवादी व समाजवादी धोरणाला तीव्र विरोध असल्यामुळे ओबामांचे हात बांधले गेले. येणाऱ्या नोव्हेंबर २०१४ च्या संसदीय निवडणुकीनंतर हे सत्तासमीकरण बदलणार नाही. उलट ओबामांच्या डेमॉक्रॅटिक पक्षाचं सध्या अधिसभेत असलेलं बळ कमी होऊन पूर्ण संसद विरोधी पक्षाच्या ताब्यात जाईल   अशी दाट शक्यता आहे. त्यामुळे उरलेल्या दोन वर्षांत कुठलंच भरीव काम होणार नाही असा ओबामांनी निष्कर्ष काढून अध्यक्षांना लाभलेल्या राजेशाही सुविधांचा आस्वाद घेण्याचं ठरवलं आहे, असं म्हणतात. त्यांना सरकारी जंबो जेटनं प्रवास करण्यास आवडतो. तसंच हे हल्ली विख्यात कलाकारांना व्हाइट हाऊसमध्ये बोलावून मोठ्या पार्ट्या देतात व मौजमजा करून श्रमपरिहार करतात असं नुकतंच मी वाचलं.


यावरून अमेरिका एक साधा देश आहे असं कुणी समजू नये. तो दिशाभूल झाला, दुर्बल नव्हे. त्याचा शक्तिपात झाला पण तो शक्तिहीन नाही. अमेरिका दरवर्षी लष्करावर ६८४ अब्ज डॉलर खर्च करते. दुसऱ्या नंबरचा चीन १३९ अब्ज डॉलर आपल्या संरक्षणावर लावतो. सध्या नेतृत्वदौर्बल्यामुळे हे महासत्ताक राष्ट्र गटांगळ्या खात असलं तरी त्याचं अंगभूत वर्चस्व नाकारता येत नाही. सगळ्या देशांना नेहमीच अव्वल दर्जाचे पुढारी मिळतात असं नाही. २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीत नवीन नेता पदावर येईल व सत्तेचा खांदेपालट होईल. नवीन अध्यक्ष अमेरिकेचं पारंपरिक जागतिक नेतृत्व पुनर्प्रस्थापित करण्याचा नक्कीच प्रयत्न करेल.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
2 Second Street, Unit # 2001,
Jersey City, N.J. 07302
latalabh@aol.com

ग्रंथाली

सुधारित आवृत्ती

## बी.एन. देशमुख – भारत गजेंद्रगडकर




काही व्यक्ती आपल्या कामामुळे, सामाजिक बांधिलकीमुळे प्रिय असतात. मात्र प्रसिद्धीपराङ्मुखता या त्यांच्या दुर्मिळ वृत्तीमुळे समाजापुढे येत नाहीत. अशीच एक मनस्वी व्यक्ती म्हणजे न्यायमूर्ती बी.एन. देशमुख. त्यांच्या जीवनकार्याचा मागोवा घेताना मलाच त्यांच्या पाठी लागावे लागले. घरात असलेले राजकीय-सामाजिक वातावरण, त्यांचे वकिलीचे शिक्षण, त्यांनी न्यायमूर्ती म्हणून दिलेले निवाडे, सामाजिक कार्यातला सक्रिय सहभाग, अन्यायग्रस्तांमागे वकील म्हणून खंबीरपणे उभे राहण्याची आस, शेतकरी-विद्यार्थी यांच्या समस्यांना सोडवण्यासाठी दिलेले पाठबळ, अशा घटनांतून त्यांचे व्यक्तिचित्र साकारण्याचा प्रयत्न पुस्तकात केला आहे. व्यक्तिगत आयुष्यापेक्षा समाजभानाबद्दल त्यांना असलेले महत्त्व यात अधोरेखित होते. तेच त्यांचे मोठेपण आपल्याला विनम्र करते.

**मूल्य १०० रुपये ● सवलतीत ६० रुपये**

**बऱ्याच काळानंतर... नवी आवृत्ती...**




## वाघ आणि माणूस – रमेश देसाई

वाघ-वन्य प्राणी-निसर्ग यांकडे पाहाण्याचा मुठभर सुशिक्षितांचा दृष्टिकोन गेल्या काही वर्षांत बदलत आहे. पण त्यामुळे वाघ किंवा त्याचे शेजारी-आदिवासी-यांचे प्रश्न सुटत नाहीत. कारण या प्रश्नांच्या मुळाशी आहे माणसाने निर्माण केलेली आणि अवाढव्य, राक्षसी बनत गेलेली आजची उत्पादन व्यवस्था...

**मूळ किंमत २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ‘क्रिएटिव्ह’ व्यंगचित्रकार हेमंत मोरपारिया

## **प्रभाकर वाईरकर**, व्यंगचित्रकार



‘‘टवाळखोर तो, ह्याच्या त्याच्या नकला करण्यात दिवस जातो त्याचा... अभ्यासात ‘पाट्या’ टाकतो... काही खरं नाही... शिक्षकांनाही सोडत नाही... पुढे काय करणार आहे कोणास ठाऊक...!’’ असे निराशेचे उद्‌गार पालक वा शिक्षक यांच्या तोंडून खोडकर मुलांच्या बाबतीत नेहमीच ऐकू येतात. अशी मुले खरेच वाह्यात, खोडकर, फुकट गेलेली असतात का, याचा खोलात जाऊन विचार केल्यास ती मुले इतरांपेक्षा वेगळी असतात... सृजनशील असतात. अभ्यास तर करायचा असतोच; परंतु इतर आजुबाजूला काही वेगळे घडतेय याचे ते निरीक्षण करत असतात, डोळसपणे. मळलेल्या वाटेने जायला त्यांचे मन तयार नसते. काहीतरी ते नवीन शोधत असतात– मग एखाद्या शिक्षक वा शिक्षिकेची अशी अशी वैगुण्ये शोधून काढतात जी इतरांच्या कधीच लक्षात येत नाहीत. त्याच्या वैगुण्याला अतिशयोक्ती, उपहासाचा मुलामा चढवून, त्यावर विनोदी भाष्य करून आपल्या मित्र–मैत्रिणीसोबत धमाल करतात. खरे म्हणजे ते ‘व्यंगचित्र’ असते, अजाणतेपणे तयार केलेले. त्यांच्यामध्ये असलेली सृजनशीलता त्यांना गप्प बसू देत नाही. ती कधीही उफाळून बाहेर येऊ शकते. टवाळखोरी करण्यासाठी ज्याच्यावर टवाळकी करणार ती व्यक्ती मनामध्ये भरली पाहिजे. त्याच्या लकबी, गुण–वैगुण, इतर व त्या व्यक्तीमधील विरोधाभास – शाब्दिक, शारीरिक किंवा वागणुकीत– यांचे योग्य निरीक्षण केल्याशिवाय आणि सृजनशीलतेची जोड असल्याशिवाय ‘टवाळकी’ करता येत नाही. ‘प्रवाहाच्या विरुद्ध जे पोहतात तेच जग घडवतात’ असे म्हटले जाते ते खरे आहे.

असाच एक कॉलेजियन मेडिकलचे शिक्षण घेत असताना प्रवाहाविरुद्ध मार्ग आक्रमित होता. मेडिकलचा अभ्यास म्हणजे जाड पुस्तके, त्यातील क्लिष्ट भाषा आणि अतिशय गंभीर आणि डोक्यावरून जाणारी लेक्चर्स यामुळे त्याला ते सर्व कंटाळवाणे होत होते. शिवाय त्याच्यामध्ये असलेला सृजनशीलतेचा 'spark' त्याला अस्वस्थ करत होता. समोर प्रोफेसर धीर–गंभीरपणे आपल्या व्याख्यानातून मनुष्याच्या शरीराची चिरफाड करत असत. समोर असलेल्या वहीच्या मार्जिनमध्ये या विद्यार्थ्याचे पेन ‘खोड्या’ करू लागे, त्यातूनच व्याख्यान देत असलेल्या प्रोफेसरचे गमतीदार कॅरिकेचर आकार घेत असे. म्हणजेच तो विद्यार्थी एक प्रकारची ‘टवाळकी’ करत होता व त्याचे मित्र त्याला प्रोत्साहन देत होते. या ‘टवाळकी’तूनच एका सृजनशील व्यंगचित्रकाराचा जन्म झाला... नाव हेमंत मोरपारिया.

मुंबईस्थित बुद्धिमान गुजराती कुटुंबात हेमंतचा जन्म झाला. आई–वडील दोघेही डॉक्टर. वडील डॉ. कृष्णराज व आई डॉ. कल्पना. मालवणी भाषेत एक म्हण नेहमीच वापरली जाते– ‘वळणाचा पाणी, वळणाकच जाताला.’ त्याप्रमाणे शालेय शिक्षण झाल्यावर हेमंतने आई–वडिलांच्याच वाटेने जायचे ठरवले. वर उल्लेख केल्याप्रमाणे कंटाळवाण्या व क्लिष्ट लेक्चर्समुळे तो व्यंगचित्रे वहीच्या पानावर गिरमटू लागला व त्याचा परिणाम असा झाला की तो आंतरकॉलेज व्यंगचित्र स्पर्धेत भाग घेऊ लागला व त्यामध्ये त्याने अनेक पारितोषिके मिळवली. त्याच काळात त्याच्या हातामध्ये परदेशी न्यू यॉर्कर, मॅड, पंच अशी व्यंगचित्रांसाठी प्रसिद्ध असलेली मासिके पडू लागली. त्यामध्ये असलेल्या व्यंगचित्रांचा तो अभ्यास करू लागला. त्यातील विनोद, सटायर, अतिशयोक्ती, डिस्टॉर्शन, रचना, ड्रॉईंगची शैली, कंपोझिशन वगैरे. हळुहळू मित्रपरिवाराला व नातेवाईकांना त्यांची व्यंगचित्रे आवडू लागली व त्यांच्याकडून त्याला प्रोत्साहनही मिळू लागले.

इतर नवोदितांप्रमाणेच हेमंतचीही महत्त्वाकांक्षाही बळावू लागली की आपलेही व्यंगचित्र व्यावसायिक वर्तमानपत्र व नियतकालिकांमध्ये छापले गेले पाहिजे. त्यासाठी जो मार्ग इतर व्यंगचित्रकार अवलंबतात तोच मार्ग हेमंतने चोखाळला. संपादकांच्या गाठीभेटी घेणे. व्यंगचित्रकला व व्यंगचित्रकारांबद्दल प्रेम–आपुलकी असणाऱ्या एका संपादकाची भेट हेमंतशी झाली. संपादक– प्रीतिश

नंदी–इलेस्ट्रेडेड वीकली.

हेमंतच्या आयुष्याला व्यंगचित्रकार म्हणून जो 'टर्निंग पॉईंट' मिळाला त्याचे सर्व श्रेय ते प्रीतिश नंदी यांना देतात. त्यांनी त्याला एवढे प्रोत्साहन दिले, की कधी कधी त्याच्याकडून दोन पानांसाठी व्यंगचित्रे तयार करून घेऊ लागले व असे अनेक वेळा घडले. हेमंत याने आपले मेडिकलचे शिक्षण पूर्ण केले. मुंबई विद्यापीठातून त्याने 'रेडियोलॉजिस्ट एम.डी.' ही पदवी संपादन केली.




राजकीय व सामाजिक व्यंगचित्रांकडे आपण आकृष्ट का झालो, याचे उत्तर देताना ते म्हणतात, ''विनोद, हास्य व सृजनशीलता जी माझ्यामध्ये आहे. ती बाहेर काढण्याचा एकमेव मार्ग म्हणजे व्यंगचित्र.'' सुरुवातीच्या काळात त्यांची व्यंगचित्रे मलाही आवडत नसत. कारण मला वाटे जर ड्रॉईंग चांगले नसेल तर व्यंगचित्राकडे पाहणार कोण? फक्त विचार चांगले ह्याच गुणामुळे व्यंगचित्राला न्याय मिळेल? यासंबंधी विचारता मोरपारिया म्हणतात, ''मला ड्रॉईंगकडे जास्त लक्ष द्यायचे नव्हते. कारण माझे इतर काम व कार्टुन्स यांचा मेळ बसवणे महत्त्वाचे होते. चित्रकलेची शैली कामचलाऊ असली तरी चालेल पण व्यंगचित्रांतील 'कल्पना, विचार' महत्त्वाचा. मग ते काळे–पांढरे व रंगीत व्यंगचित्रे असो.''

यासाठी त्यांच्या पुढील व्यंगचित्रांचा विचार करू–


मोरपारियांची चित्रशैली–रेखाटन व रंगलेपन स्केचीपद्धतीची. चित्रकलेच्या तंत्रांना फाटा. आवश्यकतेनुसार बॅकग्राउंडमध्ये रंगकाम नाहीतर मोकळे सोडलेले – पांढरे.

१) शहरामध्ये घरांची कमतरता एवढी आहे की त्यासाठी तंत्रज्ञ म्हणतात की HIGH-RISE टॉपर्सशिवाय पर्याय नाही. यासाठी सोबतच्या व्यंगचित्रात वरील विचारावर जबरदस्त 'उपरोधिक' पद्धतीने आघात केला आहे. पाईपमध्ये राहणाऱ्या माणसाची मनोवृत्ती काय असू शकते HIGH-RISE च्या संदर्भात हे मर्मज्ञपणे दाखवले आहे.

२) पोलिसांबद्दलची जनतेची भावना काय झाली आहे, पोलिसांच्या 'कर्तव्यदक्षतेमुळे' यावर मार्मिक व उपहासपूर्ण टीका सोबतच्या व्यंगचित्रात दाखवली आहे. जर एखादी स्त्री पोलिस आणि गुंड यांच्या कचाट्यात सापडली तर ती पोलिसाच्या आश्रयाला न जाता गुंडाच्या आश्रयाला जाईल. एवढी भीती पोलिसांबद्दल समाजामध्ये आहे. सहजतेने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर वार केला आहे.

३) शहरामध्ये, रस्त्यामध्ये खड्ड्यांची जी चाळण झाली आहे व ती बुजवण्यासाठी महापालिकेची कार्यपद्धती काय आहे






याचे उदाहरण सोबतचे व्यंगचित्र आहे. एक खड्डा बुजवण्यासाठी दुसरा खड्डा खणला जातो. तो खड्डा बुजवल्यानंतर त्यातील माती दुसरा खड्डा बुजवण्यासाठी काढली जाते. शेवट काय तर पहिला खड्डा आहे तसाच राहतो. ही बनवेगिरी अतिशय भेदकतेने दाखवली आहे.


४) व्यायामशाळेत स्त्री आणि पुरुष व्यायाम करताना दाखवताना, पुरुष आपल्या आरोग्याबद्दल किती निष्काळजी झाले आहेत हे पुरुषाने स्वत:च्या पोटाचा 'रोलर-बॉल' करून त्यावर व्यायाम करत आहे असे उपरोधिकपणे दाखवले आहे.

हेमंत यांनी अनेक परदेशी व्यंगचित्रकारांकडून स्फूर्ती मिळवली आहे. अमेरिकन-रूबेन बोलिंग, कोबेन, सरजिवो अरगॉन, फ्रेंच व्यंगचित्रकार सेम्पे व ब्रिटिश जे.डब्ल्यू. टेलर.

अनेक कला त्यांना अवगत आहेत. त्यांचा ते रियाज पण करतात. उदाहरणार्थ, धनुर्विद्या, गायन, ड्रम वाजवणे, कोडी सोडवणे, फोटोग्राफी, भारतीय शास्त्रीय संगीत, स्टँड अप कॉमेडी, चित्रपट, तत्त्वज्ञान, शिल्पकला, फिटनेस, प्रवास करणे आणि लिखाण करणे.

हेमंत मोरपारियांना अनेक मानसन्मान मिळाले.

- २००८ साली 'वर्ल्ड प्रेस कार्टून्स'ने आयोजित केलेल्या स्पर्धेसाठी





# सिक्वेल लेखन स्पर्धा

कुतूहल, उत्सुकता या भावना माणसाचं जीवन रोचक करतात. पुढे काय? – या प्रश्नातून या कुतूहलाची सुरुवात होते आणि आपण सगळेच या स्वप्नरंजनात रंगून जातो. एका अर्थाने 'आज' हा 'काल'चा सिक्वेल असतो आणि 'उद्या' नावाच्या 'आज'च्या सिक्वेलविषयी आपल्याला जबरदस्त कुतूहल असते.

**तर यंदाच्या 'साहित्य सूची'च्या दिवाळी अंकाचा विषयच आहे – सिक्वेल !**

साहित्य, चित्रपट, व्यंगचित्रे अशा अनेक माध्यमांतल्या सिक्वेल्सचा वेध घेणाऱ्या या अंकाचे खास आकर्षण आहे विख्यात लेखक भालचंद्र नेमाडे यांच्याशी 'हिंदूचा सिक्वेल' या विषयावर संजय भास्कर जोशी यांची मनमोकळी बातचीत. शिवाय या अंकाचे काही खास मानकरी आहेत – अविनाश सप्रे, गणेश मतकरी, आनंद जोशी, राजन खान, मोनिका गजेंद्रगडकर, सुबोध जावडेकर, नीरजा, प्रज्ञा पवार, श्रीरंग गोडबोले, रविमुकुल, शुभा गोखले, मधुकर धर्मापुरीकर... आणि असे अनेक मान्यवर!... आणि या स्पेशल अंकाचे अतिथी संपादक आहेत – संजय भास्कर जोशी.

**पण अशा मान्यवरांखेरीज इतरांना देखील या अंकात मानाचे स्थान असणार आहे. होय, तुम्ही देखील या भन्नाट कल्पनेत सामील होऊ शकता. त्यासाठी तीनच अटी : तुम्ही वाचनवेडे असायला हवे, लिहायची हौस हवी आणि भन्नाट कल्पनाशक्ती हवी. तर वाचकहो, तुमच्यासाठी एक अफलातून सिक्वेल लेखन स्पर्धा जाहीर करत आहोत...**

## 'साहित्य सूची' आयोजित 'राजहंस प्रकाशन' प्रायोजित सिक्वेल लेखन स्पर्धा

### – खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सिक्वेल लिहा –

**१. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला'चा सिक्वेल, ज्याचे पहिले वाक्य असेल – 'मी पांडुरंग सांगवीकर. आज उदाहरणार्थ पंचाहत्तर वर्षांचा आहे...'**

**२. 'शाळा' या मिलिंद बोकील यांच्या कादंबरीचा सिक्वेल लिहा.**

**३. जी. ए. कुलकर्णी यांना 'तुती' आणि 'कैरी' या मालिकेतल्या कथांच्यानंतर त्याच मालिकेतली 'किळं' ही सिक्वेल कथा लिहायची होती, तर ती सिक्वेल कथा लिहा.**

- **हा सिक्वेल ३००० ते ३५०० शब्दात असावा.**
- **पहिल्या तीन क्रमांकाच्या सिक्वेल्सना राजहंस प्रकाशन तर्फे अनुक्रमे रु.१०,०००, रु.५,००० आणि रु.३,००० अशी बक्षिसे आणि दोन उत्तेजनार्थ सिक्वेल्सना प्रत्येकी रु.१०००चे पारितोषिक दिले जाईल आणि अर्थातच बक्षिसपात्र सिक्वेल्स दिवाळी अंकात छापले जातील.**
- **आपले सिक्वेल्स दि.१५ जुलै २०१४ पर्यंत खालील पत्यावर पाठवावेत किंवा magazine@erasik.com या ई-मेल आयडीवर पीडीएफ फॉरमॅटमध्ये पाठवावेत.**

संपर्क : 'साहित्य सूची' द्वारा

रसिक साहित्य प्रा.लि. अप्पा बळवंत चौक, पुणे २. ☎ : ०२०२४४५११२९

राजहंस प्रकाशन यांच्या सहयोगाने

निवडसमितीचा सभासद म्हणून पोर्तुगालमध्ये आमंत्रण.

- फ्रान्सच्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये व्यंगचित्रे चितारण्यासाठी निमंत्रण. त्यामध्ये चितारलेल्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन फ्रेंच प्रसिद्ध व्यंगचित्रकार वोलोन्स्की याच्या चित्रांबरोबर. ३ महिने व्यंगचित्र प्रदर्शन.

त्यांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचा क्षण म्हणजे, ते स्वत: केशकर्तनालयामध्ये (सलून) केस कापण्याच्या लाईनमध्ये बसले होते. त्यांच्या सोबत एक तरुण वर्तमानपत्र वाचत बसला होता. जे पान तो पाहत होता त्यावर मोरपारियांचे व्यंगचित्र होते. ते पाहून त्याच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान ओसंडून वाहत होते. हे मोरपारिया पाहत होते. आपण व्यंगचित्र जो हेतू समोर ठेवून चितारले तो हेतू सफल झाला याच्या आनंद/समाधानाच्या जलधारांनी न्हाऊन मोरपारिया नाचू लागले.

व्यंगचित्रकलेच्या भविष्याबद्दल विचारले असताना ते काहीसे स्तब्ध झाले. त्यांना वाटते, ''ही कला संपत चालली आहे. परंतु तिचे अस्तित्व मात्र जिवंत आहे आणि वाचकवर्गही अगणित आहे. परंतु या कलेकडे वा त्याच्या उत्थानासाठी जे लक्ष दिले पाहिजे ते दिवसागणिक कमी कमी होत चालले आहे. तरीही व्यंगचित्रकला नक्कीच तावून-सुलाखून बाहेर येईल समाजासाठी. परंतु व्यंगचित्रांचा गुणात्मक व संख्यात्मक पुरवठा मात्र पुरेसा राहणार नाही.''

भारतामध्ये या कलेला पाहिजे तेवढा आधार/प्रोत्साहन मिळत नाही. काही वर्तमानपत्रे व अल्प मासिके अजूनही व्यंगचित्रे प्रकाशित करतात. इंटरनेट हे नवीन माध्यम आहे. पाहूया कसा व कोण उपयोग करतात ते. त्याबद्दल अजूनतरी हा नवीन मीडिया कसा उपयुक्त ठरू शकेल (आर्थिक, सामाजिक दृष्ट्या) याचे कोणी आराखडे तयार केलेले दिसत नाही.

मोरपारिया सकाळीच वर्तमानपत्र वाचल्याबरोबर त्यातील महत्त्वाच्या विषयाची निवड करून, १२ वाजेपर्यंत व्यंगचित्र तयार करून प्रेसला पाठवतात व त्यानंतर व्यंगचित्रकाराचा अंगरखा काढून ते हॉस्पिटलच्या दिशेने मार्गस्थ होतात, रेडिओलॉजिस्टचा 'ॲप्रन' परिधान करण्यासाठी. ही त्यांची दररोजची साधना. मोरपारिया आईवडिलांचे एकुलते एक... अविवाहित... सृजनशीलतेच्या बाहुपाशात व्यंगचित्ररूपी प्रेमांकुराने जनतेच्या मनात आनंद फुलवत आहेत...

सध्या त्यांची 'मुंबई मिरर'मध्ये (टाइम्स ऑफ इंडिया ग्रूप) व्यंगचित्रे प्रसिद्ध होत आहेत.

**- प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

ग्रंथाली

## 'संकल्पनाकोश'ला मिळालेले पुरस्कार

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  ना.गो. कालेलकर पुरस्कार २०११
  *संकल्पनाकोश खंड १*
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  नरहर कुरुंदकर पुरस्कार २०१३
  *संकल्पनाकोश खंड २ ते ५*
- मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई
  केशव भिकाजी ढवळे २०१३
  *संकल्पनाकोश खंड १ ते ५*
- सार्वजनिक वाचनालय, नाशिक
  डॉ. वि.म. गोगटे पुरस्कार २०१३-१४
  *संकल्पनाकोश खंड १ ते ५*

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर प्रथमच...**






**सुरेश वाघे**
लिखित
**संकल्पनाकोश**
**खंड १ ते ५**








मूळ किंमत ३२०० रुपये सवलतीत २४०० रु.
टपालखर्च २०० रु.

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३




मराठवाड्यातील शिल्पे आणि मंदिरे असा विषय निघाला की आपल्या नजरेसमोर उभी राहतात त्या अजिंठा आणि वेरूळ येथील लेण्या, घृष्णेश्वराचे मंदिर, परभणी जिल्ह्यातील औंढा नागनाथ आणि परळीची शिवमंदिरे. परंतु संपूर्ण मराठवाड्याचा विचार करता ही माहीत असलेली ठिकाणे आपल्या अपूर्णतेची ग्वाही देतात. मराठवाडा हा आठ जिल्ह्यांचा बनलेला असून त्यात असलेल्या मंदिर–शिल्पांची संख्या फार मोठी आहे. त्यापैकी लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतील अनेक शिल्प–मंदिरांची संपूर्ण तपशिलासह माहिती देणारा ग्रंथ म्हणजे, डॉ. माया पाटील यांचा मंदिर–शिल्पे हा ग्रंथ होय.

सदर विषय हा त्यांच्या अभ्यासाचा असल्याने त्याला मर्यादा घालणे आवश्यक ठरले. त्यामुळे त्यांनी या दोन जिल्ह्यांची निवड केली. त्याचे कारण लातूर भागात ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेला ६.३ रिश्टर स्केलचा भूकंप. या भूकंपात या दोन जिल्ह्यांतील अनेक गावे उद्‌ध्वस्त झाली. मदिरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

या जिल्ह्यांतील मंदिरांच्या बाबतीत विचार करायचा तर तो विटा आणि दगड, इतका मर्यादित अर्थ लेखिकेला अपेक्षित नाही. धर्म, तत्त्वज्ञान, अधात्म यांचे सर्वांगपरिपूर्ण दर्शन अशा मंदिरांतून अपेक्षित असते. त्यातील मूर्ती ही केवळ दगडाची प्रतिकृती नव्हे तर, भारतीय तत्त्वज्ञान आणि धर्म यांचे साकार रूप होय. मूर्ती आणि मंदिर हे एकमेकांचे प्राण आहेत असे लेखिका नमूद करतात.

राष्ट्रकुट, चालुक्य, होयसळ, कलचुरी, आणि यादव यांच्या काळात महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मंदिर–शिल्पांची उभारणी फार मोठ्या प्रमाणत झाली. उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यांचा विचार केला तर ही कामगिरी चालुक्य आणि यादवांच्या काळात झाल्याची माहिती लेखिका देतात. अभ्यास करतानाच त्यांनी त्याची दोन भागांत विभागणी केली; मंदिर स्थापत्य हा एक आणि मूर्तिशिल्प हा एक. मंदिर स्थापत्याचा विचार करताना त्याच्या शैलीचा अभ्यास करण्यात आला आहे. अधिष्ठान, पद्म, उपान, कणी, कुद, कीर्तिमुखथर, गजथर, मण्डोवर, त्यावरील शिल्पे, देवकोष्ठ आणि शिखर, मुखमंडप, मंडप, अंतराळ, गाभारा, गर्भगृह, प्रदक्षिणापथ, स्तंभ, वितान, यांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यांची मोजमापे घेण्यात आली. प्रत्येक मंदिराला स्वतःचा इतिहास असतो, त्याचा शोध घेण्यात आला आहे. मंदिरावर कोरण्यात आलेल्या शिल्पे आणि कोरीव कामांत कोणते प्राणी, पक्षी, पुष्पपत्री, वाद्ये, यक्ष, किन्नर, अप्सरा, गण यांचा वापर करण्यात आला आहे, त्यांची नावासहित माहिती घेतलेली आहे. तर मूर्तिशिल्पात ज्यांचा समावेश होतो, ती आहेत गणपती, शिव, ब्रह्मदेव, नटराज, शक्तिदेवता, मातृदेवता, उमामहेश्वर.

या विषयाची माहिती संकलित करण्यासाठी लेखिकेने किती परिश्रम धेतले आहेत याची प्रचिती या पुस्तकातील तपशिलावरून येते. सोबत मंदिरे, लेण्या, मूर्ती यांचे रंगीत तसेच कृष्णधवल फोटो दिलेले आहेत. यांची संख्याही मोठी आहे. या फोटोंची प्रतिमा जशीच्या तशी वाचकांपर्यंत पोच व्हावी यासाठी आर्ट पेपरचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे ललित आणि कलात्मक अशा दोन्ही पातळीवर पुस्तकाचे गुणात्मक मूल्य वर्धिष्णू झालेले आहे, तसे त्याचे निर्मितीमूल्यही नजरेत भरणारे आहे. या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची सजावट नीलेश जाधव यांनी अतिशय सुबकपणे केलेली आहे. मंदिराचा मण्डोवर, देवकोष्ठ आणि यांच्या पार्श्वभूमीवर सूरसुंदरीची प्रतिमा, मलपृष्ठावरही तशीच प्रतिमा. यामुळे पुस्तकाच्या उठावदारपणावर मोहर उमटल्यासारखी वाटते. या विषयावर अधिकार असणारे डॉ. गो.बं.देगलूरकर यांचे मार्गदर्शन आणि त्यांची लाभलेली प्रस्तवाना, पुस्तकाच्या शेवटी दिलेली संदर्भसूची, यामुळे या विषयात सुची असणाऱ्यांसाठी एका नव्या संदर्भग्रंथाची भर पडली आहे. पुरातत्त्वशास्त्र विभागाशी लेखिकेचा असलेला अनुभव उपयुक्त ठरलेला दिसून येतो. त्यामुळे त्यांच्याकडून अशा तऱ्हेचे आणखी भरीव लेखन होईल अशा अपेक्षाही निर्माण झाल्या आहेत.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



# ग्रंथपान




पूर्वी गावाकडचा माणूस मुंबईत गेला तरी कोण अप्रूप वाटायचे. मुंबईतल्या माणसाला दुबईची ओढ असायची. पण काळ बदलला. पाहता पाहता माणूस अमेरिकेलाच पोचला. तिथेच स्थाईक झाला. कुठे पूर्व आणि कुठे पश्चिम! आता अमेरिका म्हणजे पुण्याहून मुंबईला जाण्याइतके सोपे झाले की काय कोण जाणे. अमेरिकन दूतावासासमोरची प्रचंड गर्दी पाहिली की शंका येते. अनेकांच्या तोंडूनही सहज वाक्य ऐकायला मिळते, 'काही नाही हो, मुलांकडे गेलो होतो अमेरिकेला.'

संगणकाच्या युगात अमेरिका आता अगदीच जवळ आली हे खरे. पण म्हणून सगळ्यांनाच तिथे आमंत्रण आहे असे समजण्याचे कारण नाही. स्वतःजवळ काहीतरी विशेषत्वाची किल्ली असण्याची गरज आहे, तरच अमेरिकेच्या वेशीचे कुलूप तुमच्याकडून उघडले जाण्याची शक्यता आहे. आणि अशा भाग्यवंतांची संख्या आता बोटांवर मोजण्याच्या पलीकडे गेलेली आहे. मोठ्या प्रमाणात आपले लोक अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. आपल्या अंगी असलेल्या कौशल्याच्या जोरावर नावलौकिकास पोचले आहेत. यात मराठी माणसांची संख्याही मोठी आहे. या कर्तृत्ववान मराठी माणसांपैकी काहींचा परिचय करून देणारा, त्यांच्या कर्तृत्वाचा महिमा सांगणारा लेखसंग्रह नुकताच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे. त्याचे नाव आहे 'क्षितिज पश्चिमेचे.' लेखिका आहेत, विनता कुलकर्णी.

विनता कुलकर्णी यांची ओळख म्हणजे त्या संगणकशास्त्र आणि संख्याशास्त्राच्या प्राध्यापक आहेत. त्यातच त्यांनी डॉक्टरेट मिळवलेली आहे. अमेरिकेतील मराठी माणसांना एकत्रित जोडण्याचे जे माध्यम आहे नियतकालिकांचे, त्यांच्या संपादकाची जबाबदारीही त्यांच्याकडे आहे. भारतातल्या अनेक नियतकालिकांतून प्रकाशित झालेले त्यांचे लेखन आपण वाचले आहे. अमेरिकेतील काही कर्तबगार व्यक्तींचा, त्यांच्या कार्याचा वेध त्यांनी आपल्या लेखांमधून घेतला आहे. त्यांचा हा संग्रह म्हणजे, 'क्षितिज पश्चिमेचे.'

या संग्रहात जवळपास ३५ लेख आहेत. या लेखांमधील व्यक्ती किती वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या आहेत, आणि त्यांनी दाखवलेले नैपुण्य किती उजळ आहे याचा परिचय आपल्याला होतो. जीवाश्म वनस्पती/झाडे यांची उत्पत्ती, रचना व विकास या विज्ञानशास्त्रात मानाचे स्थान मिळवलेल्या डॉ. श्यामला चितळे, मराठी–संस्कृतच्या लेखिका आणि अध्यापिका डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर, महाराष्ट्र मंडळाच्या संस्थापकांपैकी एक असलेल्या जया हुपरीकर, अनेकांना मदतीचा हात देणाऱ्या सुनंदा माने, नृत्यांगना गौरी जोग, कॅनडातील पहिली महाराष्ट्रीय महिला न्यायाधीश मंजुषा पावगी यांच्यासारख्या अनेक महिला. तर मानसोपचारतज्ज्ञ डॉ. दिलीप जेस्ते, उद्योगश्री डॉ. विजय ढवळे, वास्तूकला निपूण दिलीप खळे, किशोर पाठारे, संस्कृत आणि हिंदू संस्कृती अभ्यासाचे प्राध्यापक डॉ. माधव देशपांडे, अमेरिकन दूरदर्शनवर झळकणारा मराठी चेहरा सुनील नारकर, शास्त्रीय संगीत गायक महेश काळे...

मराठी भाषिकांसाठी जवळपास तीन दशके अव्याहतपणे कॅनडाहून प्रकाशित होत असलेले 'एकता' त्रैमासिक, गेल्या चार दशकांहून अधिक काळ सुरू असलेले शिकागो येथील महाराष्ट्र मंडळ, १९७८ पासून सुरू केलेली सेवाभावी संस्था म्हणजे महाराष्ट्र फाउंडेशन, यांची स्थापना, प्रेरणा, कार्य आणि यात सहभागी झालेल्या व्यक्ती, यांचा परिचय उद्बोधक वाटतो. या विषयी वाटणारे कुतूहल समाधानात पाझरत जाते. सेवाभावी वृत्तीने कार्य करणारे डॉ. जगन्नाथ वाणी, यशवंत कानिटकर, विनायक आणि प्रतिभा हे गोखले दाम्पत्य, यांच्या परिचयातून सेवाभावाचा वेगळाच अर्थ उमगत जातो.

या संग्रहातील सर्वच लेख हे व्यक्तीनिष्ठ आहेत. त्यातल्या व्यक्ती या उच्च विद्याविभूषित आहेत, तशाच आपापल्या क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेल्या आहेत. त्यांचे क्षितिज लेखाच्या आवाक्यात पकडणे तशी कठीण गोष्ट. तरी देखील लेखिकेने त्याला जास्तीत जास्त कवेत घेण्याचा केलेला प्रयत्न स्तुत्य म्हणायला हवा. प्रत्येकाचा पैलू वेगळा आहे, तो चमकदार दिसेल याची घेतलेली दक्षता सहज लक्षात येते. अमेरिकेसारख्या खंडप्राय देशात दीर्घकाळ राहूनही आपल्या मातृभाषेचे वैभव टिकवून ठेवता येते, याचा प्रत्यय हा संग्रह वाचताना येतो. आवश्यक तेथेच इंग्रजी शब्दांचा वापर केलेला आहे.

ज्येष्ठ साहित्यिक आणि पत्रकार, पद्मश्री कुमार केतकर यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे. ही प्रस्तावना म्हणजे मोत्याच्या हारात गुंफलेला हिरा. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठही आकर्षक झाले आहे. महाराष्ट्राचे तारे पश्चिमेच्या क्षितिजावर चमकताना दाखवलेले आहेत.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



## ग्रंथपान

# झोके अमेरिकेतले

डॉ. अनंत लाभसेटवार




''मनुष्य कधीच जन्मतः अप्रामाणिक नसतो. नंतर परिस्थिती त्याला तसं बनवते हेच खरं.''

''आपण मुलगा म्हणजे वृद्धापकाळाची काठी समजतो. ती मानसिकता या देशात लोप पावली आहे. मुलगा किंवा मुलगी कमावती झाली किंवा त्यांचे हात पिवळे झाले की स्वतंत्र घर थाटायची इथे प्रथा आहे. घर सोडून गेलेली मुलं कधीच परत येत नाहीत.'' ''एकदा मत्ता संपादन केली की, माणसाला सत्ता हातात असावी असं वाटतं.''

ही व यासारखी मनाला स्पर्श करणारी अनेक वाक्ये ज्या पुस्तकात आहेत, त्याचे नाव आहे, 'झोके अमेरिकेतले.' आणि त्याचे लेखक आहेत, डॉ. अनंत लाभसेटवार. अनंतरावांचा परिचय त्यांच्या नियमित लेखनातून आपणास आहेच. कथा, कादंबरी,प्रवास अनुभव, चरित्र, लेखसंग्रह अशा विविधतेने नटलेल्या जवळपास २० प्रकाशित पुस्तकांतून यापूर्वीच ते आपल्या भेटीला आलेले आहेत. 'अमेरिकेतील धावपळ ' या चरित्रातून त्यांच्या लौकिकाचा परिचय झालेला आहे. 'लाभसेटवार प्रतिष्ठान'च्या कार्यामुळे या लौकिकाला वेगळेच परिमाण लाभलेले आपण पाहात आहोत. दीर्घकाळापासून अमेरिकेत स्थायिक झालेले असूनही आपल्या मातीशी असलेली नाळ त्यांनी तुटू दिलेली नाही. हेच त्यांच्या कार्यातून आणि विपुल मराठी लेखनातून अधोरेखित होत आहे.

दीर्घकाळ अमेरिकेत वास्तव्य आहे, म्हणून दिसले ते लिहिले असे या पुस्तकाचे स्वरूप नाही. वरवर दिसणारा अद्भुत देखावा वाचकांच्या समोर मांडावा, असा हेतू त्यात नाही. तर वरवर दिसणाऱ्या नितळ पाण्याखाली किती गाळ आहे, स्वप्ननगरी वाटणाऱ्या देशात किती खाचखळगे आहेत, याचे वास्तव म्हणजे हे पुस्तक आहे. अमेरिका हा जगावर राज्य करायला निघालेला देश. महासत्ता म्हणून तिची ओळख. परंतु याच अमेरिकेच्या माथी असलेला कर्जाचा डोंगर पाहता लेखक वर्णन करतात, 'अमेरिकन सरकारचे पाय अंथरुणाबाहेर पडलेले आहेत. ते स्वतः दरवर्षी १२०० अब्ज डॉलर कर्ज काढून कसंबसं जगतं.' या देशात मजूरवर्ग हा सर्वात महागडा प्रकार आहे. म्हणून त्यांनी यांत्रिकीकरणावर भर देऊन मजूरवर्ग कमी केला. तसेच कामांचे आऊटसोर्सिंग केले. किराणा दुकान, बँका, विमान, पेट्रोलपंप या सेवा देणाऱ्या संस्थांमध्ये ग्राहकांसाठी स्वयंसेवा लागू केली.

इथली राजकीय पद्धती, निवडणूक पद्धती, अध्यक्ष-राज्यपाल यांना कराव्या लागत असलेल्या कसरती यांची माहिती; इथले सामाजिक प्रश्न आणि अनिवासी स्थलांतरांचे प्रश्न; गरिबी आणि द्याव्या लागत असलेल्या सुविधा; उच्च गुणवत्ताधारकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली व्हिसा पद्धती, तिथले वृत्तपत्र, ग्रंथ प्रकाशन आणि इ-बुक संकल्पना; अमेरिकन कुटुंब व्यवस्था, विवाह व्यवस्था, आणि स्त्रीचं व्यक्तिमत्व व तिचे प्रश्न; शिकागो शहराने फिनिक्स पक्ष्याप्रमाणे घेतलेली भरारी; झालेली वादळे, वित्त घोटाळे आणि तेलकांड यांची माहिती आकडेवारीसह लेखकाने सादर केलेली आहे. अमेरिकेचे अंतःकरण उलगडून दाखवले आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. हे करत असताना त्यांनी प्रत्येकवेळी भारताची तुलनाही केलेली आहे. त्यामुळे भारत आणि अमेरिका कोणत्या क्षेत्रात प्रगत आहेत किंवा मागासलेले आहेत याचे चित्र नजरेसमोर उभे राहते.

भारतातून अमेरिकेत गेलेल्या अनिवासी भारतीयांची संख्या, त्यांचा तिथला एकूण दर्जा, त्यांच्यामुळे भारतावर होणारे परिणाम याचेही तपशील लक्षवेधक म्हणावे लागतील इतके ठळक आहेत. तसेच तिथे झालेल्या वित्त घोटाळा प्रकरणात सहभागी असलेले भारतीय वशांचे राजरतनम आणि राजत गुप्ता, यांच्यावरील लेख वाचताना आपल्याकडील हर्षद मेहताची आठवण येते. जगातल्या अब्जाधीशांच्या यादीतील मित्तल आणि अंबानी, राष्ट्राध्यक्ष पदासाठी उभे राहिलेले मिट रॉमनी यांच्यावरील लेखही वेगळेपण दाखवतात.

'झोके अमेरिकेचे' हा लेखसंग्रह आहे. यात सुमारे ३२ लेख आहेत. ते बहूतेक सारे ताजे वर्तमान दाखवणारे आहेत. त्यामुळे आजची अमेरिका कशी आहे याचे चित्र नजरेसमोर उभे राहते. सारेच चकाकणारे सोने नसते असे म्हणतात. अर्थात त्यालाही अपवाद असतात. जे चांगले आहे त्याचाही उल्लेख लेखकाने कलुषित वृत्ती न दाखवता केलेला आहे. सर्वच लेख स्वतंत्र आहेत. सुटसुटीत तरी अभ्यासपूर्ण आहेत. अमेरिकेत असूनही इंग्रजी शब्दाना जास्तीत जास्त समर्पक शब्द योजना केलेली आहे. आवश्यक तेवढाच शब्द इंग्रजीत दिलेला आहे. भारतापेक्षा मी अमेरिकेत जास्त पावसाळे काढले, असे लेखक म्हणतात. तरीही त्यांनी मातृभूमीच्या मृदाचा गंध पावसात सोडून दिलेला नाही हे विशेष!

सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठ सुरेख झाले आहे. राष्ट्रीय ध्वजाचे चित्र असलेल्या कॉफीच्या कपातला अमेरिकन माणूस गळ्यापर्यंत बुडाला तरी खूश आहे. कपाचा दांडा तुटला आहे, याची खंत ना त्याच्या हसऱ्या चेहऱ्यावर आहे ना टपोऱ्या निळ्या डोळ्यांत आहे. पुस्तक वाचून समाधान वाटत असले तरीही एक वाक्य मनातून जात नाही, 'त्यावेळी ब्रिटनला अमेरिकेनं कर्ज देऊन तरंगतं ठेवलं होतं. आता तेच काम चीन करत आहे. तो अमेरिकेचा सर्वात मोठा सावकार झाला आहे. ( ८९० अब्ज डॉलर) अमेरिकेची मान चीनच्या मुठीत आहे.'

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

## माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३

नारायण विष्णू आठवले

संकलन : डॉ. रजनी भिसे





महात्मा गांधींनी ९ ऑगस्ट १९४२ रोजी 'चले जाव'चा इशारा इंग्रज सत्तेला दिला. तसा 'करेंगे या मरंगे' हा नाराही दिला. देशातला देशप्रेमी तरुण पेटून उठला. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात स्वतःला झोकून दिले. प्रत्येकाची कृती वेगवेगळी होती. कुणी शिक्षणाला रामराम ठोकला, कुणी सरकारी नोकरीला. तर काहींनी सरकारी नोकरीत राहून बिटिश सरकारच्या धोरणात खीळ घालण्याचा प्रयत्न केला. यात घातपाताच्या कृत्यांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. अशाच एका घातपाताच्या कृतीची आणि त्यापायी सोसाव्या लागलेल्या हालअपेष्ठांची हकीगत सांगणारे पुस्तक वाचण्यात आले. त्याचे नाव आहे, 'माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३. त्याचा नायक आहे, नारायण विष्णू आठवले.

१९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले. ब्रिटिश सरकार यात सहभागी झाले होते. पुण्याच्या देहूरोड येथे मिलिटरीचा डेपो होता. यात युद्धसामग्रीचा साठा मोठ्या प्रमाणात करण्यात येत होता. हँडग्रेनेड्स, निरनिराळ्या वजनाचे बॉम्ब, सुरुंग, विमानविरोधी तोफांचे गोळे असा दारुगोळा होता. या साठ्याचा उपयोग युद्धासाठी करण्यात येत होता. या डेपोत काम करणारे अनेक तरुणांनी 'चलेजाव'ची हाक आपले ध्येय मानले होते. युद्धप्रयत्नात व्यत्यय आणणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्याचाच एक भाग म्हणून ही सामग्री युद्धआघाडीवर न पाठवणे, पाठवण्यात दिरंगाई होईल अशी परिस्थिती निर्माण करणे, साहित्य निकामी करणे, यावर त्यानी लक्ष केंद्रित केले. ते तरुण होते, नारायण आठवले, अनंत आगाशे, भालचंद्र बेंद्रे, लालजी कुलकर्णी, गणपत तेलंग. यांनी डेपोत ही युद्ध सामग्री उद्ध्वस्त करण्यासाठी स्फोट घडवून आणला. घातपाती कृत्यासाठी उपयोगी पडावी म्हणून डेपोतून दारुगोळ्याची चोरी केली. परंतु त्याचा सुगावा लागला आणि सगळेच पकडले गेले. प्रत्येकाला शिक्षा झाली. येरवडा, आर्थररोड, विसापूर, नाशिक अशा तुरुंगशाळांचा प्रवास सुरू झाला. या सगळ्याच प्रकरणाचा साद्यंत वृत्तांत आपल्याला या पुस्तकातून वाचायला मिळतो. एक गाजलेला खटला नव्याने आपल्यासमोर उभा राहतो.

नारायण आठवले यांचा बॉम्बस्फोट खटला, एवढीच या पुस्तकाची मर्यादा नाही. त्यानिमित्ताने त्यांची जडणघडण, संस्कार, आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटलेल्या व्यक्ती, जेजुरीचा दरोडा, मूषक महाल यांचाही मागोवा यात घेण्यात आलेला आहे. तळहाताचे/बोटांचे ठसे यांचे महत्त्व सांगणारे 'हर्षलचे ठसे' हे प्रकरण विषयाचे कुतूहल निर्माण करते. तसा भास्कर पांडुरंग कर्णिक यांचा धाडशीपणा आणि त्याग अनेक थोर क्रांतिकारकांची आठवण ताजी करून जातो. डॉ. रजनी भिसे यांनी त्यांच्या वडिलांच्या या आठवणी संकलित करण्याचे अवघड काम उत्तम रीतीने पार पाडले आहे. त्यामुळे या खटल्याची इत्थंभूत माहिती, स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास आणि त्यावेळची सामाजिक परिस्थिती वाचकापर्यंत पोचण्यास मदत झाली. डॉ. भिसे बाबांना लाभलेले दीर्घ आयुष्य आणि त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात केलेले कार्य, याची माहिती त्या प्रस्तावनेच्या स्वरूपात वाचकांच्या समोर नम्रपणे ठेवतात, हे विशेष! स्वातंत्र्याच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त दिलेला ताम्रपट पुस्तकाच्या सुरुवातीलाच दिलेला आहे. तो आठवलेंच्या कर्तृत्वाची सरकारने घेतलेली नोंद दाखवतो तसा पुस्तकाच्या ऐश्वर्यात भर देखील घालतो. बॉम्बस्फोट, आग, तुरुंग आणि ब्रिटिश ध्वजाच्या सोबतीने त्यांचे सशस्त्र सैनिक यांची एकत्रित केलेली गुंफण मुखपृष्ठावर दिसते. आशयाला साजेशी ही गुंफण सतीश खानविलकर यांनी सुरेखपणे केलेली आहे.

- **मूल्य २२५ रु. सवलतीत १२५ रु.**




## दृष्टीपलीकडील सृष्टी

**उमेश कदम**

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

आफ्रिका – एक अगम्य आणि अद्भुत खंड! तेथील जनता शतकानुशतके हिंसाचाराने व अत्याचाराने गांजलेली नि गूढ चालीरीतींच्या दुष्ट चक्रात गुरफटलेली. आजही तेथील कित्येक रहिवाशांचा चेटूक, करणी, पिशाच्चबाधा, मंत्र-तंत्र, जादूटोणा नि चमत्कार यांच्यावर विश्वास आहे व त्यामुळे ते कर्मकांड व बुवाबाजीच्या आहारी गेले आहेत, हे लेखकास सहा वर्षांपूर्वी आफ्रिकेस स्थलांतर केल्यानंतर प्रकर्षाने जाणवले. 'दृष्टीपलीकडील सृष्टी'मध्ये आहेत आफ्रिकेतील अंधश्रद्धांच्या अमानुष विळख्याची व्याप्ती आणि निष्पत्ती सिद्ध करणाऱ्या बारा मनोरंजक सत्यकथा. त्यातील काही आहेत चकित नि अस्वस्थ करणाऱ्या तर काही भयावह नि अंगावर शहारे आणणाऱ्या. त्यांच्या माध्यमातून लेखकाने आफ्रिकी मानसिकतेचा शोध घेतला आहे व तो साध्या, सोप्या नि उत्कंठावर्धक शैलीत सादर केला आहे. अंधश्रद्धांनी निर्मिलेली मानसिक गुलामगिरी – मग ती जगाच्या कोणत्याही भागातील असो – कशी समाजविघातक असते हे या संग्रहातील बहुतेक साऱ्या कथांचे सूत्र आहे.

---




## गौटी व पिंटू

**सु.गो. तपस्वी**

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु**

लेखकाची भाषा सरळ, सुबोध, सोपी आणि मुलांपर्यंत सहज पोचेल अशी आहे… कौटुंबिक वातावरण (जे त्यांना प्रत्यक्षात मिळण्याची वानवा असते) किती प्रसन्न व आधारदायी असू शकते, हेही मुलांना कळले पाहिजे. या दृष्टीने तपस्वी यांच्या 'गौटी व पिंटू' यासारख्या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल.

**– रत्नाकर मतकरी**

---




## सल

**प्रगती कोळगे**

**मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

'सल'मधील कथा वाचून अंतर्मुख व्हायला होतं. वैवाहिक जीवनातील वेगवेगळे अनुभव आणि त्यांची आंदोलनं यांच्या काहीशा नकारात्मकतेतून, स्वत: लेखिका ही लिखाणाद्वारे इतरांसाठी/वाचकांसाठी सकारात्मकता जपण्यास धडपडते हे फार महत्त्वाचं. स्वत:च्या मनातली खुद्द स्वत: जगत असलेली सखी असो अथवा इतरत्रांमध्ये जाणवणाऱ्या काही सख्या असोत, पण त्यांची नाळ मात्र एकच असते. ही नाळ अनुभूतींची. अशा अनुभूती वा अनुभवांमधून अंतर्मनातल्या 'सलीला'/'सलींना' लेखिकेने लिखाणाच्या विशिष्ट ओघवत्या शैलीमधून, न राहवून, मनाच्या तगमगीतून परिणामकारक शब्दांनी 'बोलकं' केलेलं आहे.

**– प्रदीप गुजर**

**ग्रंथाली**

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५०
• granthali01@gmail.com, granthali02@gmail.com • वेळ : सकाळी ११ ते ६

# दोन ग्रंथसंच योजना सूची

**सोबतच्या यादीतील पुस्तके सुटी हवी असल्यास ४०% सवलतीत मिळतील.**
**चेक/डी.डी./म.ऑ. 'ग्रंथाली' नावे पाठवावा.**

**संच क्रमांक १ - १९७ पुस्तके, संचाची मूळ किंमत २८१५५ सवलतीत किंमत १४००० रु.**

१. **खेळ साडेतीन टक्क्यांचा**
लक्ष्मण माने • १६० रु.
२. **राजकीय पक्षनिष्ठा मानसिक-बौद्धिक गुलामी**
दि. म. संत • ८० रु.
३. **अंधश्रद्धा निर्मूलन-प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
संदीप जावळे • १२० रु.
४. **प्रर्वतन**
संदीप जावळे • १२० रु.
५. **विचारवेध**
डॉ. विजय/जयश्री जोशी • १८० रु.
६. **विचारवेध : भाग ३**
डॉ. विजय/जयश्री जोशी • २५० रु.
७. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-अनुभववाद**
दि.य. देशपांडे • २०० रु.
८. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान प्रज्ञावाद**
दि.य. देशपांडे • १८० रु.
९. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-कांट**
दि.य. देशपांडे • १२० रु.
१०. **विवेकवाद**
दि.य. देशपांडे • १०० रु.
११. **रिल्केची दहा पत्रे**
अनिल कुसुरकर • १०० रु.
१२. **मी हिंदू झालो!**
डॉ. रविन थत्ते • १०० रु.
१३. **विज्ञानाचे तत्त्वज्ञान**
संपादक : शरद देशपांडे, प्रदीप गोखले, सदानंद मोरे • ३०० रु.
१४. **नेगल - (भाग १)**
विलास मनोहर • १२० रु.
१५. **नेगल -(भाग २) हेलकशाचे सांगाती**
विलास मनोहर • १२० रु.
१६. **एक पूर्ण-अपूर्ण**
नीला सत्यनारायण • १२५ रु.
१७. **सत्तरीचे बोल...**
डॉ. पी. एस. रामाणी • १०० रु.
१८. **पथदर्शी**
भारत गजेंद्रगडकर • १०० रु.
१९. **जे देखिले...**
भारत गजेंद्रगडकर • १०० रु.
२०. **एक दिवस (जी)वनातला**
नीला सत्यनाराण • २०० रु.
२१. **ध्यास आणि प्रवास**
सुलभा वर्दे • २०० रु.
२२. **माझ्या वकिलीची पन्नासी**
एस.आर. चिटणीस • १६० रु.
२३. **आमचा बान आन् आम्ही - स्वरूप आणि समीक्षा**
संपा. शैलेश त्रिभुवन • ४०० रु.
२४. **झपाटलेली झाडे**
सरोज जोशी • २५० रु.
२५. **चिं.त्र्यं. खानोलकर**
(ललित चरित्र)
दीपक घारे • १८० रु.
२६. **व्हिन्सेंट व्हॅन गॉच्या आठवणी**
अनिल कुसुरकर • १२५ रु.
२७. **गुन्हेगारांच्या मागावर**
यशवंत व्हटकर • १५० रु.
२८. **सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**
यशवंत व्हटकर • २५० रु.
२९. **नृत्यसौदामिनी दमयंती जोशी**
प्रा. सुहासिनी पटवर्धन • १०० रु.
३०. **पालावरचं जग**
लक्ष्मण माने • १४० रु.
३१. **बंद दरवाजा**
लक्ष्मण माने • १८० रु.
३२. **उद्ध्वस्त**
लक्ष्मण माने • १०० रु.
३३. **भटक्याचं भारूड**
लक्ष्मण माने • १५० रु.
३४. **नियतीशी करार**
संदीप जावळे • ३०० रु.
३५. **घटना नारायणपूरची**
शशी देशपांडे, अनु. मोहिनी दातार • १०० रु.
३६. **हॅरिसबाई**
कृ.ना. कुडाळकर • १२० रु.
३७. **स्वदेश**
भूषण केळकर • १६० रु.
३८. **टकिला टकाटक**
भूषण केळकर • ३०० रु.
३९. **संघर्ष नागरी निवाऱ्याचा**
संपा. जयंत धर्माधिकारी, अमरेंद्र धनेशर • १२५ रु.
४०. **विकासाची रूपरेषा-परिसंवादांच्या अनुभवातून**
सु.गो.तपस्वी • ३०० रु.
४१. **क्षितिजावरील शलाका**
शारदा साठे • २०० रु.
४२. **मुलगी झाली हो...**
ज्योति म्हापसेकर • ६० रु.
४३. **ही आपलीच माणसं**
मंगला खाडिलकर, गजानन सबनीस • २५० रु.
४४. **कोहम् धावा**
अनुवाद संजीव दहिवदकर • १०० रु.
४५. **पैलूंविना हिरकणी**
सुधा सोनाळकर • ८० रु.
४६. **जग जनुकांचे**
डॉ. हेमा पुरंदरे • १०० रु.

४७. **वृद्धत्वाची शान**
पद्माकर नागपूरकर ● १२५ रु.
४८. **मनातलं काहीसं**
सुधा सोमण ● १२० रु.
४९. **पानीकम**
संजय पवार ● १०० रु.
५०. **वारस होऊ अभिमन्यूचे**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
५१. **न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा**
(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सहकार्याने) ● ४०० रु.
५२. **सोन्याच्या धुराचे ठसके**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २७५ रु.
५३. **सौदीच्या अंतरंगात**
पद्मा कऱ्हाडे ● २०० रु.
५४. **मौन होई बोलके**
रोहिणी लिमये ● २०० रु.
५५. **गांगल ७० ग्रंथाली ३५**
संपादन सुदेश हिंगलासपूरकर ● ३०० रु.
५६. **संकल्प**
संपादन संजीव खांडेकर ● ३०० रु.
५७. **भिडू**
भगवान इंगळे ● २५० रु.
५८. **पंखाविना भरारी**
प्रसादची आई (शरयू घाडी) ● २०० रु.
५९. **स्वास्थ्यवृत्त**
डॉ. शरदिनी डहाणूकर ● १०० रु.
६०. **कानोसा**
डॉ. राणी बंग ● २५० रु.
६१. **आयुर्वेदातील स्त्रीविज्ञान**
शुभदा वेलणकर ● ४०० रु.
६२. **अंगणातले आभाळ**
यशवंत पाठक ● ३०० रु.
६३. **आभाळ माझं**
विमल कुलकर्णी ● १०० रु.
६४. **गोष्ट झऱ्याची**
सुधा वर्दे ● १५० रु.
६५. **कोल्हाट्याचं पोर**
किशोर शांताबाई काळे ● १०० रु.
६६. **आमचा बाप आन् आम्ही**
(१६१ आवृत्ती)
नरेंद्र जाधव ● १२० रु.
६७. **बलुतं**
दया पवार ● १०० रु.
६८. **उपरा**
लक्ष्मण माने ● १०० रु.
६९. **आयदान**
उर्मिला पवार ● २२० रु.
७०. **हृदयस्थ**
डॉ. अलका मांडके ● २५० रु.
७१. **ताठ कणा**
डॉ. पी.एस. रामाणी ● २५० रु.
७२. **मैत्र जीवाचे**
विदुर महाजन ● २०० रु.
७३. **पाचट**
योगीराज बागूल ● २५० रु.
७४. **जगायचंय प्रत्येक सेकंद**
मंगला केवळे ● ८० रु.
७५. **वन फॉर सॉरो**
अनुराधा कुलकर्णी ● १२५ रु.
७६. **उदई**
प्रकाश चव्हाण ● १६० रु.
७७. **जय हो**
कमल देसाई ● ३०० रु.
७८. **क्लोरोफॉर्म**
डॉ. अरुण लिमये ● २०० रु.
७९. **असुरेंद्र**
ना.बा. रणसिंग ● ४०० रु.
८०. **फोडणी**
रामदास फुटाणे ● १०० रु.
८१. **एका शहराच्या खुंटीवर**
चंद्रशेखर सानेकर ● ७५ रु.
८२. **पाऊस**
अरुण शेवते ● ६० रु.
८३. **शोधवर्तन**
नरेंद्र बोडके ● ८० रु.
८४. **बावनकशी**
हॅमेलिआ ● ६० रु.
८५. **सफिया बेगम**
अरुण शेवते ● १०० रु.
८६. **सत्ता**
चंद्रशेखर भुयार ● ७५ रु.
८७. **एका ऊन्हाची कैफियत**
चंद्रशेखर सानेकर ● ६० रु.
८८. **कॉमन मॅन**
हेरंब कुलकर्णी ● ८० रु.
८९. **स्वत:तील अवकाश**
ज्ञानेशर मुळे ● १२५ रु.
९०. **निरंतर**
उषा मेहता ● २०० रु.
९१. **संशयास्पद टिपणे आणि इतर कविता**
संजीव खांडेकर ● ६० रु.
९२. **चॅनेल : डी–स्ट्रॉयरी**
श्रीधर तिळवे ● १२५ रु.
९३. **काही अनुभव काही आठवणी...**
रणजीत शहा ● ५० रु.
९४. **शांती अवेदना...**
पुष्पाग्रज ● ८० रु.
९५. **बदलत गेलेली सही...**
अंजली कुलकर्णी ● १२० रु.
९६. **उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
गोविंद काजरेकर ● ७५ रु.
९७. **या दशकाचा सातबारा कोराच राहील**
शंकरराव दिघे ● ८० रु.
९८. **आईच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
९९. **...माझ्या काळाचा अनुवाद**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
१००. **कवितेच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०१. **वाटेवरच्या कविता**
अशोक नायगावकर ● ५० रु.
१०२. **सैतानाची खुशी**
राकेश भडंग ● ८० रु.
१०३. **बाईच्या कविता**
किरण येले ● ८० रु.
१०४. **प्रत्ययपर्व**
मनोहर जाधव ● ७० रु.
१०५. **सुगंध उरले, सुगंध उरले**
अरुणा ढेरे ● १६० रु.
१०६. **गारुड गझलचे**
सदानंद डबीर ● १२० रु.
१०७. **अन्वय**
उषा मेहता ● १०० रु.
१०८. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००५**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
१०९. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००८**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११०. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००९**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
१११. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२०१०**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११२. **उर्मिला**
डॉ. वसंत वऱ्हाडपांडे ● १०० रु.
११३. **धमधोकार**
प्रकाश पेठे ● १२० रु.
११४. **हाक/प्रतिसाद**
निदा फाजली,
अनुवाद–इब्राहीम अफगाण ● २०० रु.
११५. **काचेपाठचा समुद्र**
स्मिता भागवत ● १६० रु.
११६. **निशाणी – डावा अंगठा**
रमेश इंगळे–उत्रादकर ● ३०० रु.

११७. **रानभूल**
प्रल्हाद जाधव ● १२५ रु.
११८. **विवेकीजनीं ह्या मज जागविलें**
प्र.ब. कुळकर्णी ● २०० रु.
११९. **सिंहासन**
अरुण साधू ● २५० रु.
१२०. **मोरपिस**
अनुराधा गानू ● १६० रु.
१२१. **प्रकाशवाट**
वंदना करंबेळकर ● १२५ रु.
१२२. **संचिताची कोजागिरी**
यशवंत पाठक ● ३०० रु.
१२३. **लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य**
प्रा. द.ता. भोसले ● ३०० रु.
१२४. **विज्ञान विशारदा**
वसुमती धुरू ● १२५ रु.
१२५. **भारतातील स्टेनलेस स्टील संस्कृतीचे जनक**
संकलन-संपादन
शरयू ठाकूर, दिनकर गांगल ● २५० रु.
१२६. **महारूद्र**
(आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!)
जी.बी. देशमुख ● १२० रु.
१२७. **गांधी**
नलिनी पंडित ● २०० रु.
१२८. **लालबाग**
आदिनाथ हरवंदे ● ४०० रु.
१२९. **विज्ञानशिक्षण – नव्या वाटा**
डॉ. हेमचंद्र प्रधान ● १६० रु.
१३०. **का कराचं शिकून?**
लक्ष्मण माने ● ५० रु.
१३१. **शिक्षण : आनंदक्षण**
रमेश पानसे ● २०० रु.
१३२. **शिक्षणातील लावण्य**
लीला पाटील ● १०० रु.
१३३. **बालकहक्क**
लीला पाटील ● २२५ रु.
१३४. **शाळा आहे शिक्षण नाही**
हेरंब कुलकर्णी ● १०० रु.
१३५. **सुरवंटाचे फुलपाखरू**
डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले ● १२० रु.
१३६. **कळी उमलताना**
अनुराधा गोरे ● २०० रु.
१३७. **आजीच्या गोष्टी (भाग १)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१३८. **आजीच्या गोष्टी (भाग २)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१३९. **टेलिफोन ते मोबाईल**
चिन्मय थत्ते ● ६० रु.
१४०. **गोईण**
राणी बंग ● १६० रु.
१४१. **शीळ**
सरोज जोशी ● १५० रु.
१४२. **वाहतूक ठप्प**
अशोक दातार ● १२० रु.
१४३. **हत्या**
राकेश भडंग ● ३५० रु.
१४४. **संत तुकोबाची रोजनिशी**
रवींद्र पाटील ● ४०० रु.
१४५. **आभरान**
पार्थ पोळके ● २०० रु.
१४६. **असाही एक महाराष्ट्र**
संदेश भांडारे ● ३५० रु.
१४७. **आरोग्याचा अर्थ**
डॉ. आनंद नाडकर्णी ● २०० रु.
१४८. **धुंद-स्वच्छंद**
वसंत वसंत लिमये ● ६० रु.
१४९. **ध्येयनिष्ठ कर्मयोगी**
अरविंद पोतनीस ● २५० रु.
१५०. **जगप्रसिद्ध पुलांच्या कहाण्या**
सुधीर शं. कुलकर्णी ● १५० रु.
१५१. **मनोहारी**
विठ्ठल देशपांडे ● १२५ रु.
१५२. **आठवणीतले बाबासाहेब**
योगीराज बागूल ● ३०० रु.
१५३. **चंदनाची पाखर**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५४. **आभाळाचे अनुष्ठान**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५५. **येणे बोधे आम्हा**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५६. **खेळ मांडला**
विभावरी दांडेकर ● १५० रु.
१५७. **देवांसि जीवे मारिले**
लक्ष्मण लोंढे
चिंतामणी देशमुख ● २०० रु.

## ग्रंथाली-ज्ञानयज्ञ पुस्तके

१५८. **पहिला भारतीय वैमानिक**
रत्नाकर वाशीकर,
आ.रा. मराठे ● ४५ रु.
१५९. **सदानंद!**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१६०. **आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी**
भवरलाल जैन ● ४५ रु.
१६१. **परराष्ट्रधोरण : भारत व जागतिक संबंध**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१६२. **परराष्ट्रधोरण : आपले शेजारी**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१६३. **सागर-महासागर**
शैलजा सांगळे ● ४५ रु.
१६४. **लहरी हवामान**
डॉ. कुमार कुलकर्णी ● ४५ रु.
१६५. **वेळंब**
डॉ. कमलाकर देवधर ● ४५ रु.
१६६. **पिंपरी-चिंचवड : जुनं-नवं**
मीरा जोशी ● ४५ रु.
१६७. **संख्यादर्शन**
स. पां. देशपांडे ● ४५ रु.
१६८. **कांगारूंचे मराठी आप्त**
कमलिनी काटदरे
निरंजन उजगरे ● ४५ रु.
१६९. **फळांचा राजा**
स्मिता देवधर ● ५० रु.
१७०. **एक आटपाट लोकमान्य नगर**
दिलीप काटदरे ● ५० रु.
१७१. **सहनैसर्गिक जीवनशैली**
डॉ. श्याम जोशी ● ५० रु.
१७२. **क्षुधाशांती ते मॅकडोनाल्ड**
सु.गो. तपस्वी ● ५० रु.
१७३. **प्रगती पुलांची**
सुधीर शं. कुलकर्णी ● ५० रु.
१७४. **प्रार्थनाविचार**
माधवी कवी/
घनश्याम कवी ● ५० रु.
१७५. **सुशेगाद् गोवा**
नंदिनी महाडेश्वर ● ५० रु.
१७६. **पुस मॉथ ते डॅश-४००**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१७७. **एड्स-कथा आणि व्यथा**
डॉ. दीप्ती डोणगावकर ● ५० रु.
१७८. **इस्रायलची मराठी लेकरे**
संध्या जोशी ● ५० रु.
१७९. **आकाशगामी**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८०. **देव जाणिला कुणी?**
प्रेमला काळे ● ५० रु.
१८१. **आधुनिक एकलव्य**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१८२. **स्वीय शेती**
गो. ह. दंडवते ● ५० रु.

१८३. **नेवासे**
संजय बोरुडे ● ५० रु.
१८४. **नाटळ**
मनोहर सावंते ● ५० रु.
१८५. **आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
यशवंत पंडितराव ● १०० रु.
१८६. **बालकल्याण ते बालहक्क**
माधुरी भिडे ● ५० रु.
१८७. **इराण**
पद्मा कऱ्हाडे/
पुरुषोत्तम कऱ्हाडे ● ५० रु.
१८८. **चांगलं मरण**
डॉ. कमलाकर देवधरे ● ५० रु.

१८९. **वृद्धत्वः देशोदेशी**
पी. के. मुत्तगी/
पद्माकर नागपूरकर ● ५० रु.
१९०. **चित्रसंवाद**
संदीप देवल ● ८० रु.
१९१. **कऱ्हाड**
विजय माळी ● १०० रु.
१९२. **रँग्लरचं ग्लॅमर**
स.पां. देशपांडे ● ४५ रु.
१९३. **मनाचे मनोगत**
साधना कामत ● ५० रु.
१९४. **स्वप्नांची बाग**
डॉ. उषा हरदास ● ८० रु.

## मातृभूमी सेवा ट्रस्ट पुस्तके

१९५. **ओऽ कॅनडा!**
स्मिता भागवत ● १२० रु.
१९६. **स्थानभ्रष्ट**
डॉ. शांतिलाल धनिक,
शब्दांकन : स्मिता भागवत ● ३०० रु.
१९७. **पहिला स्वातंत्र्यसंग्राम आणि तात्या टोपे**
स्मिता भागवत ● ६० रु.

## संच क्रमांक २ – १७६ पुस्तके, संचाची मूळ किंमत ३५,३७० रु. सवलतीत किंमत १७५०० रु.

१. **शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस ● २५० रु.
२. **दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर ● २२५ रु.
३. **नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर ● २०० रु.
४. **टिळक ते गांधी मार्गेखाडिलकर**
मुकुंद वझे ● १२० रु.
५. **मराठी भाषेतीलअसभ्य म्हणी आणि वाक्प्रचार**
अ.द. मराठे ● २५० रु.
६. **अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे ● १५० रु.
७. **आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● १८० रु.
८. **माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू ● २७५ रु.
९. **संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे ● १५० रु.
१०. **परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत ● १५० रु.
११. **तेजस्विनी**
स्मिता भागवत ● १५० रु.
१२. **मनातल्या वावटळी**
प्रगती कोळगे ● १०० रु.
१३. **आकार**
सदाशिव साठे ● २५० रु.
१४. **तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल ● २५० रु.
१५. **आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे ● १६० रु.

१६. **गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
१७. **बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल ● ६० रु.
१८. **भारतीय सृष्टी**
अनुराधा गांगल ● १२० रु.
१९. **संस्कार**
अनुराधा गांगल ● ६० रु.
२०. **रांगोळी**
अनुराधा गांगल ● १८० रु.
२१. **महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे ● १८० रु.
२२. **मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई ● १२० रु.
२३. **शांबरिका खरोलिक**
श्रीकांत पेटकर ● ६० रु.
२४. **प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
बाबासाहेब पाटील ● १८० रु.
२५. **आनंदाकार**
प्रकाश पेठे ● १०० रु.
२६. **हवा, पानी और...**
भारत गजेंद्रगडकर ● ७५ रु.
२७. **एका पत्रकाराची दुनिया**
भारत गजेंद्रगडकर ● १५० रु.
२८. **भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन
डॉ. नरेंद्र जाधव ● ५०० रु.
२९. **आठवणींच्या जगात : जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
निरुपमा सोनाळकर ● ३०० रु.


३०. **ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर ● १८० रु.
३१. **ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर ● २०० रु.
३२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
३३. **अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे ● १८० रु.
३४. **अजब सहवास**
गो.आ. भट ● १०० रु.
३५. **सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे ● १२० रु.
३६. **ना खंत कशाची**
भगवान पंत ● १०० रु.
३७. **वेचक व्हिएतनामी लोककथा**
प्रभा पुरोहित ● ७५ रु.
३८. **कथा जगप्रसिद्ध पुलांच्या**
सुधीर कुलकर्णी ● ३५० रु.
३९. **विचारवंतांचा विवेकविशेष**
शरद बेडेकर ● १०० रु.
४०. **उंबरठ्यावरचे दिवस**
भाऊ गावंडे ● ५०० रु.
४१. **आठवा चिरंजीव**
डॉ. प्रतिभा मुडगेरीकर ● १५० रु.
४२. **वडोदरा**
प्रकाश पेठे ● ८० रु.
४३. **दीपस्तंभ**
दीपक घारे/रंजन र. जोशी ● ३५० रु.
४४. **आधुनिक युगातील विचारसरणी**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १०० रु.


४५. **साहित्य : आस्वाद आणि अनुभव**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.
४६. **मनस्वी**
बाबूराव चंदावार ● ५०० रु.
४७. **झुंज आणि झेप**
गो.मा. वाघमारे (गुरुजी) ● १०० रु.
४८. **एका कवीचे जीवनगाणे वामन कर्डक यांची चरित्रकथा**
बबन लोंढे ● १६० रु.
४९. **आठवणीतील पाऊले**
डॉ. मो.शि. तथा बापुसाहेब रेगे ● ३०० रु.
५०. **अखेर न्याय मिळाला**
नीलिमा कानेटकर ● ३५० रु.
५१. **नाझी नरसंहार**
कुमार नवाथे ● १५० रु.
५२. **डायरी**
प्रवीण बर्दापूरकर ● १८० रु.
५३. **लॉक ग्रिफिन**
वसंत वसंत लिमये ● ५०० रु.
५४. **दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स**
कर्नल सुधीर नाफड ● २२५ रु.
५५. **पश्चिम घाट बचाओ मोहीम**
जगदीश गोडबोले ● २०० रु.
५६. **जीवन आणि स्वास्थ्य**
डॉ. प्रेमानंद रामाणी ● १२० रु.
५७. **जेनेटिक्स कशाशी खातात?**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २५० रु.
५८. **नाही चिरा नाही पणती**
स्मिता भागवत ● २०० रु.
५९. **वानुळा**
साहेबराव चवरे ● १०० रु.
६०. **आत्मा हा भ्रम, परमात्मा हा महाभ्रम, तर मग अध्यात्म ते काय?**
शरद बेडेकर ● १२० रु.
६१. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१२**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
६२. **पहाटसरी**
यशवंत पाठक ● ३५० रु.
६३. **अंतरीचे धावे**
यशवंत पाठक ● १५० रु.
६४. **वेगळा विदर्भ**
श्रीपाद जोशी ● २०० रु.
६५. **तिचं अवकाश**
नीलिमा कानेटकर ● ३०० रु.
६६. **हुंदके टाळण्यासाठी**
नीलिमा कानेटकर ● २०० रु.
६७. **शोध**
डॉ. बी.जी. शेखर ● १५० रु.
६८. **कालिदास : एका गुराख्याचे महाकाव्य**
मयूर देवल ● १०० रु.
६९. **देश, परदेश आणि मी**
गजानन सबनीस ● २०० रु.
७०. **समाजरंग**
ज्ञान मयूर अनिता कुलकर्णी ● २५० रु.
७१. **माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
नारायण आठवले ● २२५ रु.
७२. **रंग दे बसंती चोला**
स्मिता भागवत ● २०० रु.
७३. **कथा इन्सुलिनच्या शोधाची**
विजय आजगांवकर ● १५० रु.
७४. **अॅबसर्ड थिएटर**
माणिक कानेड ●१६० रु.
७५. **नगरमंथन**
प्रकाश पेठे ● २०० रु.
७६. **घडत गेलेली गोष्ट**
विजया राजाध्यक्ष ● २२५ रु.
७७. **माझं साहित्यिक खटलं**
अॅड. यशवंत हडप ● २२५ रु.
७८. **दत्तकवेणा**
प्रगती कोळगे ● १५० रु.
७९. **क्षितिज पश्चिमेचे**
विनता कुलकर्णी ● २५० रु.
८०. **यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका**
लक्ष्मण माने ● २५० रु.
८१. **तांडव हरवताना**
रवी परांजपे ● २५० रु.
८२. **लसावि**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.
८३. **सारांश शून्य**
संजय कळमकर ● ३०० रु.
८४. **मनाचे कवडसे**
विश्वास काकडे ● १०० रु.
८५. **१९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे ● ३५० रु.
८६. **अंतरंग**
विजया राजाध्यक्ष ● १२५ रु.
८७. **ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर ● १२५ रु.
८८. **प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे ● ८० रु.
८९. **कवडसे**
महेश केळुस्कर ● ७० रु.
९०. **वर्तुळ पुसून टाकताना...**
शारदा नवले ● ८० रु.
९१. **ओळखीची वाट**
नीला सत्यनारायण ● १५० रु.
९२. **दुःख माझे कोवळे**
प्रतिभा सराफ ● ६० रु.
९३. **मनोमनी**
जयश्री भिसे ● ७५ रु.
९४. **अरूपाचे रूप**
माणिक गुट्टे ● १२५ रु.
९५. **एक अजब कोलाहल**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
९६. **कालिजगुंफा**
सदानंद डबीर ● ७५ रु.
९७. **कवितेची वही**
सलोनी धुरी ● ८० रु.
९८. **फुलवेडी**
अरुण शेवते ● ६० रु.
९९. **शब्द तर कुली आहेत**
राजेंद्र काटदरे ● १०० रु.
१००. **तृष्णाकाठ**
वैभव देशमुख ● १०० रु.
१०१. **रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.
१०२. **रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३०० रु.
१०३. **बोल महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● २५० रु.
१०४. **बोल महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● ६०० रु.
१०५. **बोल महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.
१०६. **प्रज्ञा महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.
१०७. **प्रज्ञा महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● २०० रु.
१०८. **प्रज्ञा महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● २२५ रु.
१०९. **प्रज्ञा महामानवाचे भाग ४**
डॉ. नरेंद्र जाधव ● ७५ रु.
११०. **आंबेडकरी विचारधारा**
बबन लोंढे ● ६०० रु.
सुधाकर गायकवाड

१११. **काळोखगर्भ**
बबन लोंढे ● २५० रु.
सुधाकर गायकवाड
११२. **निर्णायक युद्धानंतर**
बबन लोंढे ● १२५ रु.
सुधाकर गायकवाड
११३. **संकल्पना कोश भाग १**
सुरेश वाघे ● ६०० रु.
११४. **संकल्पना कोश भाग २**
सुरेश वाघे ● ७५० रु.
११५. **संकल्पना कोश भाग ३**
सुरेश वाघे ● ५५० रु.
११६. **संकल्पना कोश भाग ४**
सुरेश वाघे ● ५५० रु.
११७. **संकल्पना कोश भाग ५**
सुरेश वाघे ● ७५० रु.
११८. **जीवनदान**
राजीव जोशी ● १०० रु.
११९. **मी मवाली तुझ्या हवाली**
सुभाषचंद्र मयेकर ● १२० रु.
१२०. **निरन्वय**
नीरजा ● १०० रु.
१२१. **स्त्रीगणेशा**
नीरजा ● १०० रु.
१२२. **बुद्ध परंपरा आणि बोधीवृक्ष**
हेमा साने ● १५० रु.
१२३. **जॅक ऑफ ऑल**
अनुराधा गोरे ● १३० रु.
१२४. **परिक्षेची भीती कशाला?**
अनुराधा गोरे ● २५० रु.
१२५. **ताबंट**
प्रल्हाद जाधव ● १५० रु.
१२६. **जिद्द**
सरोज जोशी ● ८० रु.
१२७. **फिदा स्वत:वर**
सरोज जोशी ● ८० रु.
१२८. **भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता डॉ. रघुनाथ माशेलकर**
अ.पां. देशपांडे ● २२५ रु.
१२९. **जैतापूरचे अणुमंथन**
राजा पटवर्धन ● ३०० रु.
१३०. **हुमान**
संगीता धायगुडे ● ३५० रु.
१३१. **शापित भूमी**
उमेश कदम ● २५० रु.
१३२. **मला समजलेले पाच हिंदू धर्म**
शरद बेडेकर ● १६० रु.
१३३. **सव्वाशे बोधकथा भाग २**
दिलीप पांढरपट्टे ● १५० रु.
१३४. **नोबेलनगरी नवलस्वप्ने २०१३**
सुधीर/नंदिनी थत्ते ● ८० रु.
१३५. **गुलजारांच्या कविता**
रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ
अनुराधा मोहनी ● १२५ रु.
१३६. **स्पर्श हरवलेले**
डॉ. सुलभा कोरे ● १०० रु.
१३७. **पंजाबराव देशमुख जीवनकालपट**
डॉ. रमेश अंधारे ● १२० रु.
१३८. **झोके अमेरिकेतले**
डॉ. अनंत लाभसेटवार ● २५० रु.
१३९. **विकासाचे निष्कर्ष**
सु.गो. तपस्वी ● ३०० रु.
१४०. **संस्कारहीन**
निर्मला डांगे ● १०० रु.
१४१. **ॲबगेल ॲडम्स**
माणिक कानेड ● ८० रु.
१४२. **चाफ्याचं फूल**
जितेंद्र कुवर ● १०० रु.
१४३. **संवाद**
डॉ. नीना सावंत ● १०० रु.
१४४. **साकुरा**
पूजा मलुष्टे ● २०० रु.
१४५. **बोलावें ते आम्ही**
श्रीकांत देशमुख ● १८० रु.
१४६. **मे आय कम इन**
कु. तन्वी दिनेश डोके ● १२५ रु.
१४७. **बी.एन.**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१४८. **ग्रामीण बोलीचा शब्दकोश**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.
१४९. **हाँगकाँग सफारी**
पद्मा कऱ्हाडे ● १२० रु.
१५०. **वैश्विक उपचार**
विपिन मेहता, अनुवाद-विजया बापट
संपादन : अपर्णा वेलणकर ● १८० रु.
१५१. **चॅनेल 4 लाईव्ह**
समीरण वाळवेकर ● ४०० रु.
१५२. **आस्तिकता नास्तिकता दोन्ही अंधश्रद्धा**
दि.म. संत ● १२५ रु.

**दोन्ही संच एकत्रित घेतल्यास ३०,००० रुपयांत!**

१५३. **पडघम**
अरुण साधू ● १२५ रु.
१५४. **सोल्जर इन मी**
शिल्पा जितेंद्र खेर ● २५० रु.
१५५. **सत्यकथा**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.
१५६. **तसा मी.. असा मी**
डॉ. बाळ खरे ● २५० रु.
१५७. **ढोर**
भगवान इंगळे ● ३०० रु.
१५८. **काही तरी सांगायचंय म्हणून**
प्रकाश हरी कार्लेकर ● १२५ रु.
१५९. **नेटक्या कविता**
मिलिंद लांजेवार ● १०० रु.
१६०. **मंदिर-शिल्पे**
डॉ. माया पाटील ● ३०० रु.
१६१. **माझ्या काळजाची गोष्ट**
सुनीता संगवई ● १५० रु.
१६२. **हरित वसईचा लढा**
मार्कुस डाबरे ● १५० रु.
१६३. **सनद**
नारायण सुर्वे ● १०० रु.
१६४. **हृदयसंवाद**
अलका मांडके ● २२५ रु.
१६५. **हृदयबंध**
अलका मांडके ● १६० रु.
१६६. **मुंबई ते काश्मीर**
अरुण वेढीकर ● ४०० रु.
१६७. **एका शिक्षिकेची शिदोरी**
सुधा देसाई ● २५० रु.
१६८. **रत्नागिरी ते आईनस्टाइन**
सर्वोत्तम ठाकूर ● २५० रु.
१६९. **कथा माझ्या घडण्याची**
प्रभाकर राणे ● १६० रु.
१७०. **वाघ आणि माणूस**
रमेश देसाई ● २५० रु.
१७१. **अमेरिकेच्या दुर्बिणीतून भारत**
डॉ. अनंत लाभसेटवार ● २०० रु.
१७२. **जन्मरहस्य**
डॉ. आनंद नाडकर्णी ● ७५ रु.
१७३. **तणावमुक्त जीवन**
डॉ. पी.एस. रामाणी ● १३० रु.
१७४. **सल**
प्रगती कोळगे ● ८० रु.
१७५. **दृष्टिपलीकडील सृष्टी**
उमेश कदम ● २०० रु.
१७६. **गौटी व पिंटू**
सु.गो. तपस्वी ● १२५ रु.





ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

वार्षिक वर्गणी १०० रुपये
तीन वर्षासाठी २५० रुपये


आजच्या काळातील सामाजिक-सांस्कृतिक प्रश्नांचा मागोवा घेणारे माहितीपर विचारप्रवर्तक व मनोवेधक मासिक. चाळीस वर्षांची अखंड परंपरा

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० granthali01@gmail.com

ग्रं था ली

## कथा माझ्या घडण्याची

प्रभाकर राणे




हे लेखन शिक्षणविषयक आस्था बाळगणाऱ्या साऱ्यांनी आवर्जून वाचावं असं आहे.

मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.

## रत्नागिरी ते आइनस्टाइन

सर्वोत्तम ठाकूर




या पुस्तकातील लेख, त्यातील विचार,उदाहरणांतून वाचकाला अंतर्मुख करणारे आणि धक्का देणारे आहेत.

मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.

## Net क्या कविता

मिलिंद लांजेवार




इंटरनेट हे माध्यम बहरले आहे. 'नेटक्या कवितांचा एक एल्गारच येऊ घातला आहे आणि त्यातील भरीव शब्द आहे मिलिंद लांजेवार यांचा

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.

ग्रं था ली

## चॅनल 4 Live

समीरण वाळवेकर



टीव्ही, न्यूज चॅनेल्सचं वेगवान, धावणारं जग या माध्यमांच्या पार्श्वभूमीवर घडणारी, अस्वस्थ करणारी बेधडक कादंबरी...

मूल्य ४०० रु.
सवलतीत २४० रु.

## एका शिक्षिकेची शिदोरी

सुधा देसाई




ज्ञानदानासह विद्यार्थ्यांना शिक्षक जीवनशिक्षणही देतात, तेव्हा ते विद्यार्थ्यांच्या जन्मभराचे आदरस्थान होतात. ही त्या शिक्षकाची शिदोरी कशी होते त्याचे हे चित्रण.

मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.

## मुंबई ते काश्मीर : सायकलसफर

अरुण वेढीकर



विलक्षण आरस्पानी तरलतेनं आनंदाचा दाटून आलेला अमृतघन अनेक मनांवर बरसावा या ओढीनंच अरुण वेढीकर यांनी हे प्रवासवर्णन लिहिले आहे.

मूल्य ४०० रु.
सवलतीत २४० रु.


RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




संगीता उत्तम धायगुडे लिखित 'हुमान' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन नुकतेच झाले. प्रकाशनसमयी नीरजा, लेखिका संगीता उत्तम धायगुडे अविनाश धर्माधिकारी आणि प्रदीप भिडे




सर्वोत्तम ठाकूर लिखित 'रत्नागिरी ते आइनस्टाइन' या पुस्तक प्रकाशनसमयी भानू काळे, किरण ठाकूर, मधु मंगेश कर्णिक, लेखक सर्वोत्तम ठाकूर आणि प्रभाकर भिडे




डॉ. आनंद नाडकर्णी लिखित 'जन्मरहस्य' या पुस्तक प्रकाशनसमयी लेखक डॉ. आनंद नाडकर्णी डॉ. अद्वैत पाध्ये, इला भाटे आणि अमिता खोपकर सोबत शुभारती (पेशंट) शुभांकर (केअर गिव्हर)




आविष्कार फाउंडेशनच्या सातव्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात 'न्यायमूर्ती बी.एन.' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले, न्यायमूर्ती बी.एन. देशमुख, उद्योजक एम.बी. शेख, ॲड. सूर्यकांत कडाकणे, पत्रकार संजय पवार, पंडितराव चेडे, गजानन जाधव, लेखक भारत गजेंद्रगडकर, उदयसिंह देशमुख आणि ॲड. सुखदेव शेळके

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.